# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह

मा. महासभा दि. १५/०१/२०२१

आज शुक्रवार दि. १५/०१/२०२१ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा सकाळी ११.०० वाजता सभा सुचना क्र. ०६ दि. **०७/०१/२०२१** रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता Video Conferencing द्वारे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित केली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | हसनाळे ज्योत्सना जालींदर | महापौर |
| २) | गेहलोत हसमुख मोहनलाल | उपमहापौर |
| ३) | दळवी प्रशांत ज्ञानदेव | सभागृह नेता |
| ४) | तिवारी अशोक सूर्यदेव | सभापती, स्थायी समिती |
| ५) | पाटील प्रविण मोरेश्वर | विरोधी पक्षनेता |
| ६) | भोईर सुनिता शशिकांत | सदस्या |
| ७) | शाह रिटा सुभाष | सदस्या |
| ८) | पांडेय पंकज सूर्यमणि | सदस्य |
| ९) | कांगणे मीना यशवंत | सदस्या |
| १०) | सिंह मदन उदितनारायण | सदस्य |
| ११) | ढवण निलम हरीश्चंद्र | सदस्या |
| १२) | कदम अर्चना अरुण | सदस्या |
| १३) | नलावडे दिनेश दगडु | सदस्य |
| १४) | भोईर गणेश गजानन | सदस्य |
| १५) | पाटील प्रभात प्रकाश | सदस्या |
| १६) | गुप्ता कुसुम संतोष | सदस्या |
| १७) | पाटील धनेश परशुराम | सदस्य |
| १८) | रावल मेघना दिपक | सदस्या |
| १९) | शाह राकेश रतिशचंद्र | सदस्य |
| २०) | धृवकिशोर मन्साराम पाटील | सदस्य |
| २१) | जैन गीता भरत | सदस्या |
| २२) | जैन सुनिता रमेश | सदस्या |
| २३) | भूप्ताणी रक्षा सतीश (शाह) | सदस्या |
| २४) | व्यास रवि वासुदेव | सदस्य |
| २५) | रकवी वैशाली गजेंद्र | सदस्य |
| २६) | अग्रवाल सुशील गोपीकिशन | सदस्य |
| २७) | खंडेलवाल सुरेश जगदीश | सदस्य |
| २८) | परदेशी गिता हरीश | सदस्या |
| २९) | पाटील नरेश तुकाराम | सदस्य |
| ३०) | सय्यद नुरजाहॉ नाझर हुसेन | सदस्या |
| ३१) | शेख अमजद गफार | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ३२) | पाटील जयंतीलाल गुरूनाथ | सदस्य |
| ३३) | पांडे स्नेहा शैलेश | सदस्या |
| ३४) | पाटील वंदना विकास | सदस्या |
| ३५) | पाटील संध्या प्रफुल्ल | सदस्या |
| ३६) | डिम्पल विनोद मेहता | सदस्या |
| ३७) | शेट्टी अरविंद आनंद | सदस्य |
| ३८) | शिंदे रुपाली वसंत (मोदी) | सदस्या |
| ३९) | थेराडे संजय अनंत | सदस्य |
| ४०) | मुखर्जी अनिता बबलू | सदस्या |
| ४१) | चंद्रकांत सिताराम वैती | सदस्य |
| ४२) | पारधी सुजाता यशवंत | सदस्या |
| ४३) | म्हात्रे सचिन केसरीनाथ | सदस्य |
| ४४) | यादव मिरादेवी रामलाल | सदस्या |
| ४५) | म्हात्रे मोहन गोपाळ | सदस्य |
| ४६) | सोनार सुरेखा प्रकाश | सदस्या |
| ४७) | भोईर विणा सुर्यकांत | सदस्या |
| ४८) | पाटील अनिता जयवंत | सदस्या |
| ४९) | भोईर भावना राजू | सदस्या |
| ५०) | भोईर राजू यशवंत | सदस्य |
| ५१) | मांजरेकर आनंद दत्ताराम | सदस्य |
| ५२) | अरोरा दीपिका पंकज | सदस्या |
| ५३) | बेलानी हेमा राजेश | सदस्या |
| ५४) | गजरे दौलत तुकाराम | सदस्य |
| ५५) | नाईक विविता विवेक | सदस्या |
| ५६) | राय विजयकुमार सिस्थन नारायण | सदस्य |
| ५७) | शेख रुबीना फिरोझ | सदस्या |
| ५८) | डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| ५९) | सावंत अनिल दिवाकर | सदस्य |
| ६०) | मेहरा राजीव ओमप्रकाश | सदस्य |
| ६१) | परमार हेतल रतिलाल | सदस्या |
| ६२) | भट दीप्ती शेखर | सदस्या |
| ६३) | कासोदारिया अश्विन शामजीभाई | सदस्य |
| ६४) | जैन दिनेश तेजराज | सदस्य |
| ६५) | भावसार वंदना संजय | सदस्या |
| ६६) | शाह सीमाबेन कमलेश | सदस्या |
| ६७) | दुबे मनोज रामनारायण | सदस्य |
| ६८) | विराणी अनिल रावजीभाई | सदस्य |
| ६९) | सपार उमा विश्वनाथ | सदस्या |
| ७०) | अहमद साराह अकरम | सदस्या |
| ७१) | इनामदार जुबेर अब्दुल्ला | सदस्य |
| ७२) | शेख अशरफ मोहम्मद इब्राहीम | सदस्य |

७३) भोईर जयेश भानुदास सदस्य
७४) म्हात्रे नयना गजानन सदस्या
७५) भानुशाली वर्षा गिरधर सदस्या
७६) गोविंद हेलन जॉर्जी सदस्या
७७) बगाजी शर्मिला विन्सन्ट सदस्या
७८) बांड्या एलायस दुमिंग सदस्य

<u>गैरहजर सदस्य -</u>

१) पाटील रोहिदास शंकर सदस्य
२) गोहिल शानू जोरावर सिंह सदस्या
३) शेट्टी गणेश गोपाळ सदस्य
४) पाटील वंदना मंगेश सदस्या
५) सिंग श्रीप्रकाश जिलेदार सदस्य
६) जैन राजेंद्र भवरलाल सदस्य
७) रॉड्रीकस मोरस जोसेफ सदस्य
८) मोकाशी दिपाली आनंदराव सदस्या
९) परेरा कॅटलीन एन्थोनी सदस्या
१०) घरत तारा विनायक सदस्या
११) शिर्के अनंत गेणू सदस्य
१२) डॉ. पाटील प्रिती जयप्रकाश सदस्या
१३) भोईर कमलेश यशवंत सदस्य
१४) म्हात्रे परशुराम पदमाकर सदस्य
१५) सोंस नीला बर्नाड सदस्या
१६) म्हात्रे विनोद काशिनाथ सदस्य

<u>रजेचा अर्ज -</u> निरंक

नगरसचिव :-

सर्व सन्मा. सदस्यांचे आजच्या महासभेमध्ये स्वागत आहे. सर्वांनी राष्ट्रगीत वंदे मातरमसाठी जागेवर उभे राहायचे आहे.

मा. महापौर :-

सचिव साहेब सभेला सुरुवात करा.

नगरसचिव :-

मा. महापौरांच्या मान्यतेने या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येतेकी, सभासुचना टाईप करणे. आजच्या सभेच्या कामकाजाला सुरुवात करताना आपण आधी प्रश्नोत्तर घेणार आहोत. प्रश्नोत्तराच्या तासाचा सुरुवात होते. 11.37 मिनीटे झालेली आहेत. अनिल सावंत यांचा प्रश्न आहे.

अनिल सावंत :-

सर्वांना नमस्कार. आजच्या ह्रा वर्षाच्या मिटींगमध्ये प्रथम आज परक्रम सेनादिवस ह्रा निमित्त सर्व शहिदांना भावपूर्ण आदरांजली. सचिव साहेब वच्र्युअल मिटींगच्या गेल्या 3-4 मिटींगचा अनुभव आहे की प्रायॅर प्रोटोकॉल ह्रा वच्र्युअल मिटींगमध्ये पाळला जात नाही. आताच बघा तुम्ही टेक्नीकल साऊंड चालू व्हायला 45 मिनिटेघेतली. तुम्ही जी सुचना पाठवता त्या सुचनेमध्ये सहा नंबरची सुचना आहे की ज्या सदस्यांना सभेत बोलायचे असेल तेव्हा मोरमधील रोज हॅंग बटणावर

क्लीक करावे. सहा नंबरची सुचना आहे परंतु गेल्या तीन ते चार मिटींगचा असा अनुभव आहे कित्येक सदस्य तिथे क्लीक करतात रेंजच थम्ब येतो तरी सुध्दा सदस्यांना मिटींग संपेपर्यंत बोलायला दिलं जात नाही आणि हे तुम्ही वच्र्युअल मिटींगच पूर्ण व्हायलेशन आहे आणि तुम्ही करता काय महापौर असु दे. उपमहापौर असू दे कोणी कोणी हात वर केले. प्रॅक्टीकली तुम्हाला बघायचं नाही कोणी कोणी हात वर केले सहा नंबरच्या सुचनेप्रमाणे फॉलो करायचे आहे की ज्यांनी हात रेंज केले असतील त्यांना बोलायला द्यायचे आहे. तरच ह्या वच्र्युअल मिटींगला अर्थ आहे. आपण बोलायला देत नाही.

मा. महापौर :-

तुम्हाला बोलायला दिलं आहे आणि तुम्ही बोलत नाही तुम्ही विषयावर बोला.

अनिल सावंत :-

विषयावर बोलणार मी तेवढाच वेळ घेणार आहे.

मा. महापौर :-

शासनाकडून मंजूरी आली की मी सभागृहामध्ये सभा घ्यायला तयार आहे. आता ही सभा ऑनलाईन असल्यामुळे तांत्रिक अडचण असणार आहेत.

अनिल सावंत :-

ऑनलाईन घ्या. बट यू हॅव फॉलोद प्रोटोकॉल.

मा. महापौर :-

आता सध्या प्रश्नोत्तराचा तास आहे. तुम्ही तुमचा वेळ वाया घालवत आहेत.

अनिल सावंत :-

माझा स्पष्ट आरोप आहे. वेळ वाया घालवत नाही. अर्धातास आहे मला माहित आहे. आणि माझा स्पष्ट आरोप तुमच्यावर आम्हाला बोलायला देत नाही.

मा. महापौर :-

आता कोण बोलते?

अनिल सावंत :-

माझा प्रश्नोत्तराचा तास आहे. म्हणून आम्हाला प्रश्न टाकावा लागतो.

मा. महापौर :-

आता कोण बोलते. अस कसं म्हणता प्रोसिडिंग येईल त्याच्यामध्ये तुम्हीच लोक जास्त बोललेले आहेत.

अनिल सावंत :-

नाही तुम्हीच लोक म्हणू नका. जे हात रेज करतात सहा नंबरची सुचना फॉलोकरा.

मा. महापौर :-

बोलायला देणार. तो माझा अधिकार आहे. इथे दिसला पाहिजे कोण हात वर करतात. त्या पध्दतीने बोलायला देतो. तुम्हाला प्रश्नोत्तरामध्ये इंट्रेस नाही का दुसरा प्रश्न घ्या.

अनिल सावंत :-

दुसरा प्रश्न कसा घेणार तुम्ही. प्रश्नोत्तर चालू आहेत.

मा. महापौर :-

मग चालू आहे तर बोला तुम्ही प्रश्नोत्तरावरती.

अनिल सावंत :-

प्रश्नोत्तराच्या तासावरच बोलणार.

मा. महापौर :-

तुम्ही प्रश्नोत्तराच्या तासावर बोला.

अनिल सावंत :-

दरवेळी तुम्ही बोलायला देत नाही म्हणून आम्हाला बोलावं लागते.

मा. महापौर :-

अस कसं तुमचे सदस्य बोलत नाही का तुम्ही बघा.

अनिल सावंत :-

महापौर मॅडम मी प्रश्नोत्तराच्या तासाला सुरुवात करतो.

मा. महापौर :-

तुम्हाला बोलायचं असेल तर प्रश्नोत्तराच्या तासावरती बोला. अन्यथा दुस-या प्रश्नोत्तराच्या तासाला वाचन केलं जाईल.

अनिल सावंत :-

मॅडम माझा प्रश्नोत्तर आहे. डिसेंबर 2019 मी हा प्रश्न दिला होता आणि मला उत्तर मिळाले 20 नोव्हेंबर 2020 म्हणजे जवळ जवळ एक वर्षाने ह्या प्रशासनाने उत्तर दिलेल आह आणि ते उत्तर सुध्दा पूर्ण नाही. नाही तर जर उत्तर पूर्ण असतं तर सभागृहाचा वेळ मी वाया घालवलाच नसता. प्रशासनाने ह्या एक वर्षामध्ये जो मी प्रश्न टाकला होता त्या अनुषंगाने काय कारवाई केली मला जरा प्रशासनाला विचारायचं आहे. जो प्रश्न मी टाकला होता त्याअनुषंगाने काय कारवाई केली.

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो, साहेब आपण तीन प्रश्न विचारले आहेत. त्या तीन्ही प्रश्नांचे उत्तर लेखी आपणाला दिले आहे. पहिला प्रश्न होता महापौर वर्षा मॅरेथॉन 2019 साठी किती रक्कम खर्च झाली आहे. तर महापौर वर्षा मॅरेथॉन 2019 साठी महापालिकेचे 24 लाख 3 हजार 622 हजार रुपये इतकी रक्कम खर्च करण्यात आलेली आहे. दुसरा प्रश्न होता महापौर वर्षा मॅरेथॉन 2019 किती कोणाकडून व कोणत्या स्वरुपात प्रयोजनाकडून रक्कम जमा झाली हा प्रश्न आपला होता. त्याचे उत्तर दिले आहे. आपण महापौर वर्षा मॅरेथॉन 2019 करीता मोजणी शुल्क रक्कम 18 लाख 11 हजार 890 रुपये जमा झालेली होती तसेच किती व कोणाकडून व कोणत्या स्वरुपात प्रयोजनाकडून रक्कम जमा झाली ह्याबाबत तपशील निरंक आहे. आम्ही जनरल प्रयोजनाकडून डिमांड केले होते. अहवाल केला होता. स्पॉन्सरसाठी जे काही आम्हाला साहित्य स्वरुपात जसे पाणी मिळाले आहे, टीशर्ट मिळाली ते आम्ही परस्पर लोकांना दिले आहेत. तिसरा प्रश्न होता महापौर वर्षा मॅरेथॉन 2019 साठी खर्चनिहाय किती रक्कम खर्च करण्यात आली त्याचा तपशील आपणांस सविस्तर देण्यात आलेला आहे. टीशर्ट, मेडल, किट्स बॅग त्याच्यासाठी आवश्यक 27 चिन्ह होती त्यासाठी खर्च झाला 16 लाख 24 हजार 860 रुपये टाईमींग चीपसाठी जवळपास 1210 आवश्यक होती त्यासाठी 2 लाख 99 हजार 838 रुपये खर्च झाला. ट्रॉफीसाठी 72 ट्रॉफी घेतल्या त्यासाठी 3 लाख 7 हजार 747 रुपये खर्च झाला. इन्श्युरन्ससाठी जवळपास 95 हजार 580 रुपये खर्च झाला. इंडीकेटर वॉचसाठी 82 हजार 600 रुपये असे 24 लाख 3 हजार 622 रुपये खर्च झालेला आहे.

अनिल सावंत :-

आयुक्त साहेब, महापौर मॅडम हेच छापील उत्तर डी.एम.सी. साहेबांनी दिलं. दोन नंबरच्या उत्तरामध्ये त्यांनी लिहिलं आहे. कोणाकडून, कोणत्या स्वरुपात प्रयोजकाकडून रक्कम जमा झालेल्या बाबतच्या तपशील निरंक आहे. महापौर मॅरेथॉन् हा महापालिकेचा कार्यक्रम, महापौर ह्या शहराचे प्रथम नागरिक त्यांच्या नावाने महापौर मॅरेथॉन होते. महापालिका ती ऑर्गनाईज करते. आयुक्त साहेब तत्कालीन आयुक्तांच्या मान्यतेने ह्या शहरामध्ये सर्व वॉर्ड ऑफिसरने रायटिंगमध्ये लेटर काढले होते. ह्या शहरातील हॉटेल्स, बिझनेसमन, बिल्डर यांना रायटींगमध्ये लेटरगेल होत वॉर्ड ऑफिसरचंकी मॅरेथॉनला तुम्ही डोनेशन द्या. लाखो रुपये त्यावेळी जमा केले गेले हा आमचा स्पष्ट आरोप आहे मग ते पैसे गेले कुठे? त्याचा अकाऊंट कोण ठेवणार गेल्या वर्षभरामध्ये ऑडिटरने किंवा अकाऊंट किंवा

याचे जे इनचार्ज होते त्यांनी ह्याबाबत कधी गेल्या वर्षभरामध्ये चौकशी केली का किती पैसे जमा केले, कोणाकडून पैसे जमा केले. दुसरी गोष्ट तुम्ही छापील उत्तर दिले, टीशर्ट, मेडल, किट्स बॅग 601 रुपये महापालिकेने लोकांच्या प्रॉपर्टी टॅक्स मधला त्यावेळी 24 लाख रुपये खर्च केला आणि जे टीशर्ट, मेडल तुम्ही पूर्ण खर्च केलात ना मग त्याच्यावर प्रयोजकाचे स्पॉन्सरचे नाव कसं काय आलं त्याला जबाबदार कोण. पैसे लोकांचे पब्लीसीटी एका प्रयोजकाची मग तुम्ही खर्च केलेला कुठे गेला. तुम्ही ह्या ठिकाणी टीशर्ट दाखवला आहे 601 रुपये म्हणजे महापालिकेने खर्च केला. मग प्रयोजकाचं नाव कसं काय आलं याला कोण जबाबदार आहे आम्ही प्रश्न विचारतो काहीतरी कारवाई होण्याच्या दृष्टीकोनातून आम्हाला छापील उत्तर नको आहेत. जर तुम्ही ते पैसे जमा केले कशाप्रकारे जमा केले, ते पैसे कुठे गेले ज्यावेळी तुम्ही पत्र दिले त्यावेळी पालिकेचा जी.एस.टी. नंबर सुध्दा दिलेला आहे. मग शहरामध्ये एकही रुपया तुम्हाला जमा झालेला नाही पैसे मग ते प्रयोजकाने वस्तुच्या स्वरुपात असू दे, कॅश स्वरुपात असू दे पालिकेमध्ये ते अकाऊंट राहायला पाहिजे ती महापौर मॅरेथॉन आहे. पालिकेचा जी.एस.टी नंबर सर्व ठिकाणी डिसप्ले केलेला होता. आयुक्त साहेब माझी आपल्याला विनंती आहे ह्या सर्व प्रकरणाची चौकशी झाली पाहिजे आणि जे कोणी अधिकारी जबाबदार असतील ह्याला त्यांच्यावर कारवाई झालीच पाहिजे. आज एक पारदर्शक कारभाराच्या दृष्टीकोनातून चांगला ट्रान्सफर तुम्ही केलेला आहे. अजूनही काही अधिकारी अशाच वर्षानुवर्ष अशाच डिपार्टमेंटमध्ये बसलेले आहेत. त्यांना सुध्दा ही पारदर्शकता याच्यामध्ये साहेब आपल्याकडून उत्तर पाहिजे याच्यापूर्वी सुध्दा बरेच प्रश्न विचारले बरीच चर्चा झाली लॉजिंग होर्डिग्जच्या बाबतीत असू दे, शहरातील जे गॅरेजेस आहेत महापौरांनी आदेश देऊन सुध्दा त्या गॅरेजेसवर काही कारवाई होत नाही. त्यांच्या जवळून महापालिका काही वसूली करत नाही त्यानंतर बाजार फी चा प्रश्न विचारला होता. आयुक्त साहेब लाखो रुपयाचे धनादेश ह्या बाजार वसुलीच्या ठेकेदारांचे रिटर्न गेलेले आहेत. त्या ठेकेदारांवर कारवाई झालीच नाही. पण तरी सुध्दा आज बाजार वसुलीचा ठेका सुध्दा त्यांनाच देण्यात आला. आयुक्त साहेब मला ह्याबाबतीत कारवाईचे आपल्या जवळून आश्वासन हवे आहे. महापौर मॅडम गेल्या महासभेमध्ये प्रश्न विचारला होता. वर्धमान फॅन्टासीच्या बाबतीत लवकर त्यावेळी तुम्ही नव्हते.

मा. महापौर :-

सन्मा. नगरसेवक सावंत साहेब तुमचा आजचा प्रश्न कुठला आहे. त्याच्यावरती तुम्ही आता चर्चा करा.

अनिल सावंत :-

चर्चा झालेली आहे. मला आपल्या जवळून आदेश पाहिजे. याच्यावर तुम्ही नेमक काय करणार.

मा. महापौर :-

बाकीचे जे विषय तुमचे आहेत ते निवेदन तुम्ही घेऊन या. आपण त्या संबंधित अधिका-यांना आपल्या दालनात बोलवून आणि तुमच्या प्रश्नावरती कसे समाधान होईल आणि कारवाई कशा पध्दतीने होईल याचा आपण कारवाई करु त्याबाबत.

अनिल सावंत :-

मला समाधान नको.

मा. महापौर :-

मग काय पाहिजे.

अनिल सावंत :-

पालिकेचा कारभार सुधारायला पाहिजे. ह्या शहरातील लोकांना.

मा. महापौर :-

पालिकेचा कारभार सुधारेल ना. का नाही सुधारणार.

अनिल सावंत :-

अजूनपर्यंत वर्षभर ह्या विषयावर काही कारवाई झाली नाही. आजचा जो माझा प्रश्न आहे.

मा. महापौर :-

आता तुमचा प्रश्न महापौर चषकाचा चालू आहे ना तुमचा.

अनिल सावंत :-

एक वर्षामध्ये काही कारवाई झाली का?

मा. महापौर :-

महापौर चषकाचा विषय चालू आहे.

अनिल सावंत :-

महापौर चषकाचेच बोलतोय. वर्षभर माझ्या प्रश्नावर कारवाई झाली नाही.

मा. महापौर :-

मग तुमच्याकडे तसे पेपर आले नाही का?

अनिल सावंत :-

कसले पेपर हे छापील उत्तर आहे.

मा. महापौर :-

महापालिकेने काय कारवाई केली किंवा तशा पध्दतीने समाधानकारक उत्तर दिले नाही का?

अनिल सावंत :-

समाधानकारक उत्तर नाही ना. छापील उत्तर पानपट्टे साहेबांनी वाचून दाखवले तर विचार मला आलेला आहे म्हणजे पालिकाएवढी निरळावलेले आहे प्रशासन सदर करिता जमा झाली ह्याबाबतचा तपशील निरंक आहे. म्हणजे पालिकेच्या नावावर जे डोनेशन जमा केल गेलं त्याच ह्या अधिका-यांना काही माहितीच नाही. किंवा त्या अधिका-यांनी जमा केलं असेल आणि पर्सनल अकाऊंटमध्ये टाकले असेल असा माझा स्पष्ट आरोप आहे कसे काय अधिकारी लिहू शकतात निरंक.

मा. महापौर :-

पानपट्टे साहेब तेजे आरोप करत आहेत त्याच्यावरती खरोखर तशा पध्दतीचा काही झालेला आहे का? प्रशासनामार्फत त्याचा खुलासा करा तुम्ही.

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो मा. महासभेने ठराव घेतला होता की स्पॉन्सरशीप घ्या म्हणून वस्तु स्वरुपामध्ये 23 नंबरचा ठराव झाला होता त्या ठरावानुसार स्पॉन्सरशीप घेतले. परस्पर त्या लोकांना त्याच वाटप केलं पाण्याचे असो, स्टेज असो, काही टीशर्ट घेण्याचे असो. अशा गोष्टी स्पॉन्सरशीपच्या मार्फत केले.

अनिल सावंत :-

साहेब तुम्ही जबाबदार अधिकारी आहात. काय उत्तरदेत आहेत तुम्हाला कळत काय? उद्या पालिकेच्या नावावर कोणी काही जमा करेल आणि परस्पर वाटेल हे चालेल का? तुम्ही जबाबदार अधिकारी आहात, तुम्ही मान्य करत आहेत की स्पॉन्सरशीप मिळाली आणि परस्पर आम्ही वाटले. एखाद्याने 10 लाख जमा केले. 5 लाखाचे तुम्हाला स्पॉन्सशीप दिले काय कळणार आहे तुम्हाला वॉर्ड ऑसिरच्या नावाने ज्या वेळेला डोनेशनसाठी पत्र काढलं त्यावेळी तुमचा कंट्रोल का नव्हता.

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

वस्तु स्वरुपात टीशर्ट मिळाले होते पाण्याचे बॉटल मिळाले होते.

अनिल सावंत :-

टीशर्टचा खर्च दाखवत आहेत सत्तावनशे टीशर्ट.

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

ते महापालिकेच्या फंडातून जेवढे केले तेवढे केले उरलेले साठी स्पॉन्सरशीप केले.

अनिल सावंत :-

उरलेले किती टीशर्ट आले काही आहे. तुमच्याजवळ स्पॉन्सरशीपच अकाऊंट मग ते उत्तर निरंक का लिहिले तुम्ही? महासभेमध्ये विचारलेल्या प्रश्नाला तुम्ही आज उत्तर देत आहेत. महापालिकेच्या पैशाच्या खर्चावर स्पॉन्सरशीपचं नाव कशाला आलं. ट्रॉफी तुम्ही खर्च केल्या 72 ट्रॉफी स्पॉन्सरच नाव कस आलं.

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

आपल्याकडे स्पर्धक जवळपास 7935 स्पर्धक आपल्याकडे भाग घेतले होते. त्याच्यात 5 कि.मी. स्पर्धेमध्ये जवळपास 6554 स्पर्धक भाग घेतले होते. 10 कि.मी. मध्ये 979 स्पर्धक भाग घेतले होते.

अनिल सावंत :-

साहेब मला हे सर्व माहित आहे. त्याच्यात माझा काही प्रश्न नाही. स्पॉन्सरशीप किंवा स्पॉन्सरशीपच्या काईंडमध्ये किंवा पैशामध्ये जे तुम्ही डोनेशन घेतलं आहे, पालिकेच्या नावावर त्याचा अकाऊंट का नाही इथे तिथे निरंक कसं दिलं तुम्ही.

संजय दोंदे :-

ते पैसे स्वरुपात घेतले नाहीत सावंत साहेब ते फक्त टीशर्ट स्वरुपात घेतले आहेत कारण 8 हजार स्पर्धकांनी भाग घेतला होता फक्त 2 हजार 700 स्पर्धक आपले कार्पोरेशन असलेल्या फंडातून त्यांना टीशर्ट दिले उर्वरीत सगळ्यांना 600 लोकांना आपण स्पॉन्सरशीप मधून टीशर्ट दिले आणि स्पॉन्सरशीप घेण्याबद्दला ठराव मा. महासभेने 23 नंबरचा ठराव दि. 7/6/2019 रोजी केलेला असल्यामुळे ठरावाच्या अनुषंगाने ते स्पॉन्सरशीप स्वीकारलेली आहे. ती स्विकारताना आपणत्या ठेकेदाराला स्विकारायला लावली होती.

अनिल सावंत :-

महासभेने ठराव केला पण स्पॉन्सरशीप येत आहे. कुठच्या काईंडमध्ये येत आहे. ही जबाबदारी तुमची नाही. परस्पर कोणी काही वाटायचे.

संजय दोंदे :-

आपण आपल्या फंडाचा व्यवस्थित हिशोब ठेवलेला आहे. साहेब आपण पैशा स्वरुपात कुठलेही स्विकारलेले नव्हते. आपण वस्तु स्वरुपात चॉकलेट, किट्स बॅग, टीशर्ट.

अनिल सावंत :-

साहेब पैशा स्वरुपात शहरातील मी सांगितले ना सर्व बिझनेसमन ना तुमचे वॉर्ड ऑफिसरचे आयुक्तांच्या मान्यतेने डायरेक्ट लेटर गेले आहे.

संजय दोंदे :-

असे कुठले लेटर पाठवलेले नव्हते.

मा. महापौर :-

तशी काही माहिती तुमच्याकडे असेल तर तुम्ही आयुक्तांना त्या संदर्भामध्ये भेटा आणि त्याबद्दल चर्चा करा. तुमच्याकडे तशी माहिती असेल तर.

अनिल सावंत :-

आयुक्तांना भेटून झाले मॅडम बोलून झाले हा विषय झालेला आहे त्यापूर्वीच नविन आयुक्तांना फक्त हा महासभेच्या मान्यतेतुन कळतो. ज्यावेळी मॅरेथॉन झाली त्याचवेळी हा विषय चर्चेला मी घेतला होता. आयुक्त साहेबांजवळ आणि आता दोंदे धडधडीत खोट बोलत आहेत की आम्ही असे लेटर

पाठवले नाही. वॉर्ड ऑफिसरचे सहीचे लेटर मॅडम माझ्याजवळ आहे की महापौर मॅरेथॉनला तुम्ही..........

संजय दोंदे :-

पण असा फंड सावंत साहेब कुठला जमा झालेला नाही.

अनिल सावंत :-

असा फंड जमा झालेला नाही असे तुम्ही म्हणत आहेत. टीशर्ट वगैरे आणि कोणाच्याही काही अकाऊंट ठेवले नाही तसेच कॅश तुम्ही जमा केली असणार आणि त्याचे सुध्दा तुम्ही काही अकाऊंट ठेवलेले नाही हा माझा स्पष्ट आरोप आहे.

मा. महापौर :-

आरोप ना करु तुमच्याकडे माहिती असेल ती सादर करा. तुमच्याकडे तशा पध्दतीची माहिती आहे का की ह्यांनी कॅश स्वरुपामध्ये पैसे घेतलेले आहेत ते म्हणतात की आम्ही वस्तु स्वरुपामध्ये घेतले तुम्ही म्हणता की आम्ही कॅश स्वरुपामध्ये घेतले.

अनिल सावंत :-

मॅडम कॅश स्वरुपात वस्तु स्वरुपात महापालिकेच्या नावावर एखादी गोष्ट तुम्ही घेता त्याचे अकाऊंट नको ठेवायला. जबाबदार कोण उद्या महापालिकेच्या नावाने कोणी काही करेल.

मा. महापौर :-

कॅश स्वरुपात घेतला असेल तसा तुमचा आरोप असेल तर तुम्ही आयुक्तांशी निर्देशनात ती गोष्ट आणून द्या.

अनिल सावंत :-

हे सांगत आहेत ना पत्र दिले नाही म्हणून कर निर्धाकर आणि संकलक त्यांचे पत्र आहे माझ्या हातात. विषय महापालिका महापौर वर्षा मॅरेथॉन 2019 करीता प्रयोजक म्हणून महापालिकेस सहकार्य करणेबाबत. दरम्यान इच्छूक व्यक्तीने जाहिरात करणे याकरिता कार्यक्रमाचे प्रयोजक नियुक्त करण्यात येणार असून महापालिका परिसरात व तसेच स्पर्धकांच्या टीशर्ट बॅग याच्यावर प्रयोजकाची जाहिरात करण्यात येणार आहे. तरी सदर कार्यक्रमाकरिता आवश्यक निधी उभारण्या करिता आपण सदर कार्यक्रमाचे प्रायोजक म्हणून सहभागी होऊन महापालिकेस सहकार्य करावे. हे साहेब तुमचे महापालिकेचे लेटर आहे आणि आता दोंदे साहेब धडधडीत ह्या महासभेमध्ये खोटं बोलत आहेत की आम्ही असे काही लेटर दिले नाही. किती खोटारडेपणा कराल. पालिकेचा तुम्ही जी.एस.टी. नंबर दिला आहे. अकाऊंट नंबर दिला आहे म्हणजे कोण चेक देणार असेल त्यांना सांगायचे चेक नका देऊ कॅशच द्या. ऑफिशीयली तुम्ही लेटर काढता. आयुक्त साहेब माझी आपणांस विनंती आहे त्यावेळी महापालिकेच्या नावाचा हा महापालिकेचा कार्यक्रम असते वेळी महापालिकेच्या नावाचा त्या ठिकाणी दुरुपयोग झालेला आहे. लाखो रुपयाचे डोनेशन कॅशमध्ये काईडमध्ये घ्या लोकांनी जमा केलेले आहे त्याचे कुठचे ही अकाऊंट ह्या ठिकाणी देण्यात आलेले नाही. 24 लाख रुपये खर्च केले 24 लाख खर्चामध्ये महापालिकेने टीशर्ट दिले. ट्रॉफीज दिल्या त्या ट्रॉफीज टीशर्टवर सुध्दा प्रयोजकाचे नाव होते त्या प्रयोजकाचे नाव महापालिकेच्या ट्रॉफीजवर कसं काय आले? माझी आपणाला विनंती आहे ह्या सर्व प्रकरणाची चौकशी करा आणि जे दोषी असतील त्याच्यावर कडक कारवाई करा हा पूर्ण हिशोब नगरपालिकेच्या अकाऊंटमध्ये यायला पाहिजे जे काही स्पॉन्सरशीप जी काही मिळाली असेल ती.

मा. महापौर :-

ठिक आहे. मला असे वाटते आपले सन्मा. नगरसेवक यांनी विचारलेल्या प्रश्नावरती ह्या प्रकरणाची प्रशासनाने आणि आयुक्त साहेबांनी पूर्णपणे चौकशी करावी आणि जो कोणी दोषी असेल याच्यावरती कारवाई करायची. पुढचा विषय घ्या.

अनिल सावंत :-

धन्यवाद.

नगरसचिव :-

प्रश्न संपलेले आहेत. आजच्या महासभेकरिता दोन लक्षवेधी प्राप्त झालेल्या आहेत. पहिली लक्षवेधी सन्मा. सदस्य मदन उदित नारायण सिंग यांनी मिरा भाईंदर हद्दीतील सर्व खाजगी शाळा माफी आकारण्यात येणारे अतिरिक्त शालेय शुल्क कमी करणेबाबत एक लक्षवेधी सादर केलेली आहे आणि दुसरी लक्षवेधी सन्मा. सभागृह नेता प्रशांत दळवी यांची अधिकृत अनधिकृत मोबाईल टॉवरची 53 कोटी रुपयाचा थकबाकी वसुली बाबत होत असलेल्या दिरंगाई संदर्भात 15/1/2021 रोजी मा. महासभेकरिता लक्षवेधी स्विकारणेस विनंती अशा दोन लक्षवेधी आलेल्या आहेत. त्या मी मा. महापौरांकडे सादर करीत आहे.

प्रशांत दळवी :-

महापौर मॅडम दोन ज्या लक्षवेधी आलेल्या आहेत मदन सिंग आणि माझी लक्षवेधी आहे. त्यामध्ये प्रशासनाने आपला खुलासा केलेला आहे. त्याची उत्तरे दिलेली आहेत त्यामुळे आम्ही ह्या दोन्ही लक्षवेधी मागे घेत आहोत.

मा. महापौर :-

ठिक आहे. दोन्ही लक्षवेधी मागे घेतलेल्या आहेत. त्यामुळे आता विषयाला सुरुवात करावी.

नगरसचिव :-

आजच्या महासभेकरिता असलेल्या विषय पत्रिकेवरील विषयांना स्वरुपात करण्यापूर्वी प्रशासनाकडून 2 के खाली 2 विषय प्राप्त झालेली आहेत. पहिला विषय आहे मिरा भाईंदर महापालिका शिक्षण विभागातील प्राथमिक शिक्षकांना व सेवा निवृत्ती धारक शिक्षकांना तसेच कुटुंब निवृत्ती धारकांना दि. 1/1/2016 पासून 7 वा वेतन आयोगानुसार वेतन तथा सेवानिवृत्ती वेतन व इतर भत्ते लागु करणेबाबत गोषवारा महासभेत सादर झालेला आहे. 2 के खाली हा विषय 2 के खाली घ्यावा किंवा कसे याबाबत महासभेची मान्यता आहे काय? कृपया याबाबत गटनेत्यांनी आपल्या पक्षाच्या वतीने मान्यता देणेस विनंती.

जुबेर इनामदार :-

सन्मा. महापौर मॅडम, तुम्ही गटनेता पदाधिका-यांना म्युट करुन ठेवल्यानंतर कस कामकाज चालायचे प्रशासकीय, महासभेचे कामकाज चालवताना तुम्ही पदाधिकारी गटनेत्यांचीच आवाज बंद केले तर महापौर अशी महासभा चालवल्याला काही अर्थ राहत नाही.

मा. महापौर :-

तुमचा जर आवाज बंद केला तर आता तुम्ही कसे काम बोलता.

जुबेर इनामदार :-

आता चालू केला. सचिवांना मी परत फोन लावला.

मा. महापौर :-

राज घरत साहेब तुम्ही त्यांचा आवाज बंद करु नका. मी आदेश दिलेले आहेत आवाज कोणाचाही बंद करु नये.

जुबेर इनामदार :-

तुमचा आदेश ऐकत नसतील तर त्यांना घरी पाठवा.

मा. महापौर :-

एकाचाच नाही कोणालाही बंद करु नये.

जुबेर इनामदार :-

तसे ते का करतात?

मा. महापौर :-

तुमच्या समोरच सांगितले कोणाचा आवाज बंद करायचा नाही.

जुबेर इनामदार :-

ठिक आहे धन्यवाद. त्यांना सांगा तुम्ही दिलेल्या आदेशाची त्यांनी अंमलबजावणी करावी.

मा. महापौर :-

नक्की.

जुबेर इनामदार :-

शिरवळकर साहेब तुम्ही आता क चा जो प्रस्ताव आलेला आहे. प्रशासकीय प्रस्ताव कमीत कमी तुम्ही व्हॉट्स ॲपचा ग्रुपवरती तो प्रस्ताव टाका म्हणजे आम्ही तरी तो वाचून तरी खरं.

मा. महापौर :-

तुमच्या प्रश्नाचे समाधान करते मिरा भाईंदर महापालिका शिक्षण विभागाकरिता प्राथमिक शिक्षकांना व सेवानिवृत्ती धारक शिक्षकांना तसेच कुटुंब निवृत्ती धारकांना दि. 1/1/2016 पासून 7 पे वेतन आयोगानुसार वेतन तथा सेवा निवृत्ती वेतन व इतर भत्ते लागु करणेबाबत गोषवारा प्रशासनाच्या मार्फत देण्यात आलेला आहे. परंतु सदर विषयाबाबत कोणत्याही पध्दतीने पूर्ण कल्पना नसल्यामुळे हा विषय रितसर पुढच्या महासभेमध्ये घेण्यात यावा.

जुबेर इनामदार :-

ठिक आहे. गोषवारा देताना महापौर मॅडम त्यांना सांगा. शासनाचे त्याच्यामध्ये काय निष्कर्ष आहेत शासनाच्या काय सुचना आहेत ते तरी त्यांच्या बरोबर द्या. आता कोविड परिस्थितीमध्ये शाळाच बंद आहेत तर कसला 7 वा वेतन आयोग त्यांना द्यायचा आहे.

मा. महापौर :-

दुसरा एक प्रस्ताव प्रशासनाच्या माध्यमातून आलेला आहे. ठराव क्र. 3 दि. 13/8/2020 अन्वये मिरा भाईंदर महापालिकेत दैनिक वृत्तपत्रे, साप्ताहिके, पाक्षीके, दिवाळी अंक व मासिके इत्यादी एकाच ठिकाणी सुरु करणेबाबत घेतलेला निर्णय फेर निर्णयास्तव सादर करणे बाबतचा गोषवारा महासभेमध्ये आजच्या आणलेला असून याबाबतची माहिती लोकप्रतिनिधींना नसल्यामुळे हा विषय सुध्दा आपण पुढच्या महासभेत रितसर घेणार आहोत. पुढचा विषय घ्या.

नगरसचिव :-

प्रकरण क्र. 44, दि. २६/०२/२०२० व दि. १३/०८/२०२० रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

प्रशांत दळवी :-

दि. २६/०२/२०२०, व दि. १३/०८/२०२० रोजींच्या मा. महासभेचे इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

वर्षा भानुशाली :-

माझे अनुमोदन आहे.

जुबेर इनामदार :-

कोणी दुरुस्त्या सुचवल्या?

प्रशांत दळवी :-

त्यांनी सुचवलेल्या दुरुस्त्यांसह.

जुबेर इनामदार :-

कुठे सुचविलेले आहे. सभागृहामध्ये तर कोणी अजून सुचवले नाही.

प्रशांत दळवी :-

सुचवले नसेल तर सुचवा.

जुबेर इनामदार :-

तसे नाही पण सुचवलेले नाही कोणी तुम्ही काय सुचवाल ते आम्हाला कसं समजेल.

प्रशांत दळवी :-

विषय आता सचिवांनी मांडला होता आणि सचिवांनी सांगितले होते.

जुबेर इनामदार :-

सन्मा. सभागृह नेता साहेब इतिवृत्तांतामध्ये काही दुरुस्ती करायची असेल ती सुचवायला पाहिजे.

मा. उपमहापौर :-

जुबेर भाई आपकी बात सही है।

जुबेर इनामदार :-

हमारी बात हमेशा सही रहती है अभी आप लोग उसमें क्या काला कांड करे हमको क्या मालुम पडेगा।

मा. उपमहापौर :-

इसलिए आपको बोल रहा हूँ आपके पास और दिशा निर्देश है तो बताईए।

जुबेर इनामदार :-

हमारी सुचना नही और किसी की है क्या असे बोला कोणाचीच सुचना नाही आणि ती मंजूर म्हणजे त आहे तशीच मंजूर.

मा. महापौर :-

आहे तशीच मंजूर करण्यात येत आहे.

प्रकरण क्र. 44 :-

दि. २६/०२/२०२० व दि. १३/०८/२०२० रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

ठराव क्र. 35 :-

दि. २६/०२/२०२०, व दि. १३/०८/२०२० रोजींच्या मा. महासभेचे इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

सुचक :- श्री. प्रशांत दळवी अनुमोदन :- श्रीम. वर्षा भानुशाली

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. 45, मिरा भाईंदर महानगरपालिका शाळांतील विद्यार्थ्यांना सन २०२०-२०२१ या शैक्षणिक वर्षाकरीता शालेय गणवेश व पिटी युनिफॉर्मचा पुरवठा करणेकामी प्रशासकीय व आर्थिक मंजूरी मिळणेबाबत.

मदन सिंग :-

उपरोक्त प्रस्तावित गोषवाऱ्यानुसार शासनाने दिलेल्या निर्देशानुसार कोरोना प्रादुर्भावामुळे सध्या शाळा बंद असून आजमितीपर्यंत शाळा सुरु करणेबाबत शासनाने कोणतेही धोरण निश्चित केलेले नाही.

तसेच सन 2020-21 हे आर्थिक वर्ष संपत येत आहे तसेच निविदा प्रक्रिया करणेकरीता कमीत कमी एक ते दोन महिन्यांचा अवधी लागत असल्याने सन 2021-22 या आर्थिक वर्षाकरीता मिरा भाईंदर मनपा शाळेतील विद्यार्थ्यांना गणवेश पुरवठा व पिटी युनिफॉर्म पुरवठा करणेकामी ही मा. महासभा प्रशासकीय व आर्थिक मंजुरी देत आहे असा ठराव मांडत आहे.

गणेश भोईर :-

माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर :-

ठराव मंजूर.

प्रकरण क्र. 45 :-

मिरा भाईंदर महानगरपालिका शाळांतील विद्यार्थ्यांना सन २०२०-२०२१ या शैक्षणिक वर्षाकरीता शालेय गणवेश व पिटी युनिफॉर्मचा पुरवठा करणेकामी प्रशासकीय व आर्थिक मंजूरी मिळणेबाबत.

ठराव क्र. 36 :-

उपरोक्त प्रस्तावित गोषवाऱ्यानुसार शासनाने दिलेल्या निर्देशानुसार कोरोना प्रादुर्भावामुळे सध्या शाळा बंद असून आजमितीपर्यंत शाळा सुरु करणेबाबत शासनाने कोणतेही धोरण निश्चित केलेले नाही.

तसेच सन 2020-21 हे आर्थिक वर्ष संपत येत आहे तसेच निविदा प्रक्रिया करणेकरीता कमीत कमी एक ते दोन महिन्यांचा अवधी लागत असल्याने सन 2021-22 या आर्थिक वर्षाकरीता मिरा भाईंदर मनपा शाळेतील विद्यार्थ्यांना गणवेश पुरवठा व पिटी युनिफॉर्म पुरवठा करणेकामी ही मा. महासभा प्रशासकीय व आर्थिक मंजुरी देत आहे असा ठराव मांडत आहे.

सुचक :- श्री. मदन सिंग           अनुमोदन :- श्रीम. गणेश भोईर

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. 46, मिरा भाईंदर महानगरपालिका पूर्व प्राथमिक बालवाडी शाळांतील विद्यार्थ्यांना सन २०२०-२०२१ या शैक्षणिक वर्षाकरीता शालेय गणवेश पुरवठा करणेकामी ई-निविदा प्रक्रियेस प्रशासकीय व आर्थिक मंजूरी मिळणेबाबत.

दिनेश जैन :-

उपरोक्त प्रस्तावित गोषवाऱ्यानुसार शासनाने दिलेल्या निर्देशानुसार कोरोना प्रादुर्भावामुळे सध्या शाळा बंद असून आजमितीपर्यंत शाळा सुरु करणेबाबत शासनाने कोणतेही धोरण निश्चित केलेले नाही. तसेच सन 2020-21 हे आर्थिक वर्ष संपत असुन निविदा प्रक्रिया करणेस कमीत कमी एक ते दोन महिन्यांचा कालावधी लागत असल्याने सन 2021-22 या आर्थिक वर्षाकरीता मनपा शाळेतील पुर्व प्राथमिक बालवाडी विद्यार्थ्यांना गणवेश पुरवठा करणेकामी ई-निविदा प्रक्रिया करणेस व शालेय गणवेश खरेदी करणेकामी लागणाऱ्या खर्चास ही मा. महासभा प्रशासकीय व आर्थिक मंजुरी देत आहे असा ठराव मांडत आहे.

राकेश शहा :-

माझे अनुमोदन आहे.

जुबेर इनामदार :-

याच्याआधी 2021-22 केला होता ना.

दिनेश जैन :-

हा.

जुबेर इनामदार :-

याच्या आधीचा ठराव झाला त्याला 2021-22 केला आहे ना.

मा. महापौर :-

हो. ह्या सर्व मान्यता आपण 2021-22 साठी देत आहोत.

जुबेर इनामदार :-

धन्यवाद.

रुबीना शेख :-

मॅडम बोलने का मौका दिया उसके लिए बहुत बहुत शुक्रीया। सबसे पहले में आपसे रिक्वेस्ट करना चाहूँगी की नेक्स्ट जो भी महासभा रहे वो फ्राय डे ना होते किसी और दिन रखी जाए। मॅम दुसरा पॉईंट यह है की, अभी अगर ऑफलाईन मिटींग की शुरु करे तो बहुत बेहतर होगा क्योंकी यह ऑनलाईन मिटींग में हम लोगो को जो बात रखनी है या जितनी अच्छे से समज आना चाहिए उतना नही होता है। आज जो स्कुल का विशय मॅम उठा है वो एक सेन्सीटीव्ह विषय है जिस पे मैं चाहती हूँ की मैं कुछ बोलू और आप लोगो को उसकी सुचना दूँ मॅम 2017 और 2018 मैं में महिला बालकल्याण की सदस्या थी और वहाँ पे हम को स्कुल के लिए काम करने का मौका मिला जो हमारे अंगणवाडी वगैरा है उसकी मॅडम मैंन यह पुरी रिपोर्ट बनाई थी जिनमें कुछ और आपको सुचना देना है। मॅम हमारी अंगणवाडी और प्रायमरी स्कुल मिलाके कमसे कम हमारे पास 36 स्कुल है और 6300 तक हमारे पास बच्चे है तालिम के ऐहिमीयत ऐज्युकेशन की ऐहीमीयत आप समज सकती है क्योंकी आप भी खुद एक टिचर है और हमारे बहुत सारे सन्मा. सदस्य ऐज्युकेटेड है और वो समज सकते है की ऐज्युकेशन की क्या ऐहिमियत होती है। हमारे पास जो म्युन्सिपल स्कुल है उनके यहाँ पढनेवाले बच्चे भी इतने ही ब्राईट और इंटेलिजेन्ट है जितने की दुसरे स्कुल मैं आते है मैं खुद अपने एन.जी.ओ के मार्फत से इन स्कुल मैं व्हिजीट करती हूँ और उनसे बात करने का और उनसे मिलने का मौका मिलता है और वो बच्चो की इंटलिजेंट देखके हैरियत होती है की उनको उतनी अच्छी माहोल नही मिलने के बावजुद भी वो बच्चे पढाई में इतने शानदार है। मॅम यहाँ पे मैं एक छोटासा उदाहरण देना चाहूँगी मेरी मदर का जो के बॉम्बे की हायस्कूल में 40 साल प्रिन्सीपल रही और उसके बाद हमारे रिटायर्डमेंट के बाद वो हमारे नेटिव्ह प्लेस गई और वहाँ पे उनहोंने इलेक्शन लढा और महापौर बनी मैं मेरी डॅडी का भी जिकर करना चाहूँगी मॅम जो सोलापूर के उर्दु म्युन्सीपल स्कूल में पढे है आप समजीए की किस जमाने की मैं बात कर रही हूँ। जब उन्होंने सोलापूर जैसी छोटे शहर की उर्दु म्युन्सीपल स्कुल से एज्युकेशन हासील करते हुए वह बॉम्बे के टाईम्स ऑफ इंडिया के एडिटर बने और फ्री प्रेस पेपर के एडिटर बने मेरा यह बताने का मकसद यह है की जो मॉड ऑफ इंस्ट्रक्शन रहता है चाहे वो इंग्लीश हो हिंदी हो मराठी हो ऊर्द हो या आपके स्कुल होते है चाले वो म्युन्सीपल स्कुल हो या हायस्कूल हो हमारी तरक्की की राह में कभ आडा नही बनते यह मेरी पेरेन्स की एक मिसाल है। ऐसे बहुत सारे बच्चे मॅम हमारे स्कुल मैं यहा मिरा भाईंदर मैं मौजुद है। जो आगे चल के उतनी ही तरक्की हासील कर सकते है जैसे की, कई सारे लोगोने की है। इसे अलावा मॅडम इन बच्चो की तालिम पे हमारा एक ऐस्सीकल रिस्पॉन्सीबीलीटी है, हमारी अकेली की जिम्मेदारी है की इन बच्चो को हम अच्छी से अच्छी तालीम दे। इस स्कुल में व्हिजीट के दौरान मॅडम कुछ बातो का मुझे पता चला मैं आपके यह रिपोर्ट भी मैं आपको फिर से पेश करुंगी जिनके युनिफॉर्म, बॅग, बुक्स, शुज यह सब जो हमारी पालिका के तरफ से दिए जाते है वो वक्त में नही पहुँचते आधा आधा साल गुजरने के बाद उनको बुक्स मिलती है। आधा साल गुजरने के बाद उनको एक युनिफॉर्म मिलता है, जुते मिलते है जो की बिल्कुल भी मुनासिब बात नही है की आधा साल गुजरने के बाद उनको यह सारी चिजे मिलती है। इसके अलावा मॅडम सिलॅबस है स्पेशली अंगणवाडी और प्रायमरी स्कुल के सिलॅबस कुछ भी फॉलो नही होता है और वो ही सिलॅबस रिपीटेडली स्कुल में पढाया जाता है। जो के

टीचर्स की मैं कहूँगी वहाँ के टीचर्स पे हमको थोडा ध्यान देना पडेगा की वो इन बच्चो के सिलेबस को रिव्हाईज करते रहे और सिलेबस पे जादा ध्यान देकर उनको आगे का कुछ पढाने का मौका दे क्योंकी मॅडम वही चिज पु साल बच्चे से दो का टेबल, 4, 3 का टेबल या साधा अ,क,ग इतना ही पढते है। इस के अलावा पढते नही है। जब प्रायमरी स्कुल में यह बच्चे जाते है अंगणवाडी के तो वहाँ के स्कुलो को बहुत तकलीफ होती है इन बच्चो को वापस उसमें लाने की या उनको पढाने की तो में आज आपके मार्फत से यह रिक्वेस्ट आपको करना चाहूँगी मॅडम के यह बच्चे हमारे देश का भविष्य है यह आनेवाले हिंदुस्तान को चलाने वाली नस्ल है। इनका अगर हमने ध्यान नही रखा तो फिर शायद हम बहुत बडी गलती करेंगे और हम रिस्पॉन्सीबल है इस बात के लिए तो मैं आपसे रिक्वेस्ट करुंगी की यह सारे सामान जो हम उनको दे रहे है वो तो आप आगे आनेवाले सालो में दिजीए ही मगर उनके पढाई पे जैसे अपॉईटमेंट ऑफ टीचर है मैंन इसके पहले आयुक्त को भी यह रिक्वेस्ट कि थी और उन्होंने प्रोसिजर शुरु भी किया था पर अनफॉच्र्युनेट यह कोविड का काल यह सब आ गया तो अपॉईंटमेंट ऑफ टिचर पे मेरी रिक्वेस्ट रहेगी की टीचर अपॉईंट किए जाए स्कुल में सिलॅबल पे ध्यान दिया जाए मॅम और यह सारा सामान हम बच्चे को दे रहे है वह किसी तरह ऐसा आप अरेंज करीए की साल के शुरु में ही वह उनके यह सारी सुविधा पे मिल जाए।

मा. महापौर :-

ठिक आहे मॅडम आपण फार चांगली सुचना केली. पहिला जे आपण उपस्थित केला होता सभेच्या संदर्भामध्ये त्या बद्दल मी आपणांस सांगु इच्छिते की आमची सर्वांची इच्छा आहे की ही सभा ऑनलाईन होऊ नये परंतु शासनाचे आदेश आपल्याकडे आहेत त्या पध्दतीनेच आपण आपला हे कामकाज करत असतो आणि त्या पध्दतीने आज आपली ही सभा ऑनलाईन होत आहे आणि दुसरी गोष्ट तुम्ही सांगितल्या प्रमाणे मुलांना चांगल्या पध्दतीची तालिम द्यावी शिक्षणावर भर द्यावा तसेच शुज, बुट, पुस्तके ही सर्व वेळेवर मिळण्याकरिताच हा विषय आपण आताच्या महासभेला आणलेला आहे. कारण शाळा आता बहुतेक जुन महिन्यापासून सुरु होतील की मध्यंतरी सुरु होतील हे आपल्याला माहित नाही. शासनाने त्या बाबतचा आदेश आपल्याकडे प्रापत नाहीत परंतु आपण जास्त वेळ न थांबता याबद्दलची तयारी असते टेंउर प्रोसिजरची किंवा इतर जी काही प्रशासनातर्फे तयारी करायची असते ती तयारी करणे करिता आपण आजचा हा विषय घ्या महासभेमध्ये आणलेला आहे.

नयना म्हात्रे :-

महापौर मॅडम, तुमच्या परवानगीने बोलते मॅडम खुपच शाळांचा विषय होता. खुप चांगला विषय होता आणि त्याच्यावर प्रत्येक नगरसेविकेने प्रत्येक चांगले नगरसेवकांनी त्याच्यावर खुप चांगले बोलले की मुलांचे भवितव्य चांगले घडले पाहिजे. मॅडम आता मी दुस-या विषयावर येते मॅडम वर्ष झाला आपण कुठपर्यंत ठेका दिला आहे मॅडम त्या कुत्र्यांची एवढे हाल चालले आहेत आपण लाखो रुपये ठेकेदारांना मोजलेत पण..................

मा. उपमहापौर :-

नयना ताई विषय असा आहे............

नयना म्हात्रे :-

उपमहापौर साहेब माझा विषय पण गंभीरच आहे सगळ्या अधिका-यांकडे फिरतो पण काम कोणीच करत नाही.

मर्लिन डिसा :-

नयना ताई विषय संपु द्या शाळेचा विषय संपु द्या नंतर तुम्ही बोला.

नयना म्हात्रे :-

100 टक्के मुलांचे भवितव्य आहे. पण प्रत्येक गल्लीमध्ये कुत्र्यांना लोक त्यांना मारतात. त्याचा पण विचार पण विचार करा. हा एकदा महासभेला तरी विषय घ्या.

प्रशांत दळवी :-

नयनाताई आपला विषय घेतला जाईल.

नयना म्हात्रे :-

मला तुम्ही फसवू नका. मला ह्या विषयाचा अगदी कंटाळा आलेला आहे.

मा. उपमहापौर :-

ठिक आहे ताई हा माझा शब्द आहे. तुमचा विषय मी नक्कीच घेणार आणि तो निकाल पण बाहेर काढणार..................

नयना म्हात्रे :-

पुढच्या महासभेला जर हा विषय आला नाही याच्यावर जर निर्णय लागला नाही तर मी पुढच्या महासभेत डायरेक्ट खाली बसेल किंवा उपोषणाला बसेल.

मा. उपमहापौर :-

मी पण तुमच्या बरोबर. ठिक आहे सध्या विषय शाळेचा आहे.

प्रशांत दळवी :-

महापौर मॅडम माझी तुम्हाला विनंती असेल शिक्षणाचे आणखीन दोन ठराव आहेत ते दोन्ही ठराव झाले की शिक्षणाविषयी ज्यांना कोणा सन्मा. नगरसेवकांना बोलायचे आहे त्यांना आपण बोलू द्यावे.

मा. महापौर :-

ठिक आहे. पुढचा विषय घ्या.

प्रकरण क्र. 46 :-

प्रकरण क्र. 46, मिरा भाईंदर महानगरपालिका पूर्व प्राथमिक बालवाडी शाळांतील विद्यार्थ्यांना सन २०२०-२०२१ या शैक्षणिक वर्षाकरीता शालेय गणवेश पुरवठा करणेकामी ई-निविदा प्रक्रियेस प्रशासकीय व आर्थिक मंजूरी मिळणेबाबत.

ठराव क्र. 37 :-

उपरोक्त प्रस्तावित गोषवाऱ्यानुसार शासनाने दिलेल्या निर्देशानुसार कोरोना प्रादुर्भावामुळे सध्या शाळा बंद असून आजमितीपर्यंत शाळा सुरु करणेबाबत शासनाने कोणतेही धोरण निश्चित केलेले नाही. तसेच सन 2020-21 हे आर्थिक वर्ष संपत असुन निविदा प्रक्रिया करणेस कमीत कमी एक ते दोन महिन्यांचा कालावधी लागत असल्याने सन 2021-22 या आर्थिक वर्षाकरीता मनपा शाळेतील पुर्व प्राथमिक बालवाडी विद्यार्थ्यांना गणवेश पुरवठा करणेकामी ई-निविदा प्रक्रिया करणेस व शालेय गणवेश खरेदी करणेकामी लागणाऱ्या खर्चास ही मा. महासभा प्रशासकीय व आर्थिक मंजुरी देत आहे असा ठराव मांडत आहे.

सुचक :- श्री. दिनेश जैन अनुमोदन :- श्री. राकेश शाह

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. 47, सन २०२०-२०२१ या वर्षात मनपा शाळेतील विद्यार्थ्यांना विविध कल्याणकारी योजनेअंतर्गत डी.बी.टी. या योजनेद्वारे वाटप वस्तुस्वरुपात मिळणा-या लाभाचे हस्तांतरण रोख स्वरुपात थेट विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात जमा (DBT) करणेकरीता आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

आनंद मांजरेकर :-

उपरोक्त प्रस्तावित गोषवाऱ्यानुसार शासन निर्देशानुसार कोविड-19 च्या प्रादुर्भावामुळे शाळा सुरु झालेल्या नसुन आजमितीपर्यंत शाळा सुरु करणेबाबत शासनाने कोणतेही धोरण निश्चित केलेले नाही. तसेच सन 2020-21 हे आर्थिक वर्ष संपत असल्याने मनपा शाळेतील विद्यार्थ्यांना विविध कल्याणकारी योजने अंतर्गत डी.बी.टी. या योजनेद्वारे वाटप वस्तु स्वरुपात (शालेय दप्तरे, बुट, मोजे इ.) मिळणाऱ्या लाभाचे हस्तांतरण सन 2021-22 या वर्षात रोख स्वरुपात थेट विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात जमा (DBTDBT) करणेस ही मा. महासभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे असा ठराव मांडत आहे.

डिम्पल मेहता :-

माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर :-

शाळेच्या संदर्भामध्ये आणखीन एक विषय क्र. 48 ते झाल्यानंतर नंतर ज्यांना बोलायचे आहे या विषयावर बोलायला आपण संधी देत आहोत.

प्रकरण क्र. 47 :-

सन २०२०-२०२१ या वर्षात मनपा शाळेतील विद्यार्थ्यांना विविध कल्याणकारी योजनेअंतर्गत डी.बी.टी. या योजनेद्वारे वाटप वस्तुस्वरुपात मिळणा-या लाभाचे हस्तांतरण रोख स्वरुपात थेट विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात जमा (DBT) करणेकरीता आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

ठराव क्र. 38 :-

उपरोक्त प्रस्तावित गोषवाऱ्यानुसार शासन निर्देशानुसार कोविड-19 च्या प्रादुर्भावामुळे शाळा सुरु झालेल्या नसुन आजमितीपर्यंत शाळा सुरु करणेबाबत शासनाने कोणतेही धोरण निश्चित केलेले नाही. तसेच सन 2020-21 हे आर्थिक वर्ष संपत असल्याने मनपा शाळेतील विद्यार्थ्यांना विविध कल्याणकारी योजने अंतर्गत डी.बी.टी. या योजनेद्वारे वाटप वस्तु स्वरुपात (शालेय दप्तरे, बुट, मोजे इ.) मिळणाऱ्या लाभाचे हस्तांतरण सन 2021-22 या वर्षात रोख स्वरुपात थेट विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात जमा (DBTDBT) करणेस ही मा. महासभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे असा ठराव मांडत आहे.

सुचक :- श्री. आनंद मांजरेकर अनुमोदन :- श्रीम. डिम्पल मेहता

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. 48, मिरा भाईंदर महानगरपालिका शाळांतील विद्यार्थ्यांना सन २०२०-२०२१ या शैक्षणिक वर्षाकरीता वह्या व पाण्याच्या बाटल्या पुरवठा करणेकामी ई-निविदा प्रक्रियेस प्रशासकीय व आर्थिक मंजूरी मिळणेबाबत.

वंदना भावसार :-

उपरोक्त प्रस्तावित गोषवाऱ्यानुसार शासनाने दिलेल्या निर्देशानुसार कोरोना प्रादुर्भावामुळे सध्या शाळा बंद असून आजमितीपर्यंत शाळा सुरु करणेबाबत शासनाने कोणतेही धोरण निश्चित केलेले नाही. सन 2020-21 हे आर्थिक वर्ष संपत आहे तसेच निविदा प्रक्रिया करणेकरीता कमीत कमी एक ते दोन महिन्यांचा अवधी लागत असल्याने सन 2021-22 या आर्थिक वर्षाकरीता मिरा भाईंदर मनपा

शाळेतील विद्यार्थ्यांना वह्या व पाण्याच्या बाटल्या पुरवठा करणेकामी ही मा. महासभा प्रशासकीय व आर्थिक मंजुरी देत आहे असा ठराव मांडत आहे.

दिनेश जैन :-

माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर :-

आता शाळेच्या संदर्भामध्ये ज्यांना बोलायचे आहे त्यांनी थोडक्यात बोला.

मदन सिंग :-

महापौर मॅडम मी आपणांस धन्यवाद देतो नगरपालिकेच्या मुलांना न भेटणारी वस्तू आपण वेळेवरच विषय आणला आणि पुढच्या 2021-22 च्या जुनमध्येच त्यांना सर्व मिळेल त्याबाबत आपल्याला धन्यवाद. पण मॅडम मी एक विषय आणू इच्छितो तो की आपण ह्या शाळेवरती मुलांवरती एवढा खर्च करतो ठिक आहे पण मुलांना शिकवणार कोण? आपले शिक्षकांवर आपले लक्ष नाही. त्यांना आपण सांभाळत नाही. महापौर मॅडम, आयुक्त साहेब मी आपल्या निदर्शनास आणु इच्छितो सध्या वर्षभर कोरोनामध्ये गेला आहे. कोरोना पिरेडमध्ये जे कोरोनासाठी आपल्याला मदत दिली तर त्या कोरोना वॉरयर्सना आपण धन्यवाद देतो. त्यातील एक पार्ट आपले शिक्षक पण आहेत. आपले मिरा भाईंदर महापालिकेचे शिक्षक वर्ग आहेत. त्यांनी पण कोरोनासाठी घरोघरी जाऊन शासनाला मदत केलेली आहे. पण एक खेदाची बाबत आहे त्या शिक्षकांना एप्रिल महिन्याचे भत्ता मानधन किंवा पगार मिळालेला नाही तसेच आपल्या महापालिकेच्या शिक्षकांपैकी 1819 शिक्षकांचे अजून इम्पलीमेंट पण देण्यात आलेले नाही. त्याबद्दल तुम्ही काय म्हणता.

संभाजी वाघमारे (मा. उपायुक्त) :-

आदरणीय महापौर सन्मा. सदस्यांनी जो प्रश्न विचारलेला आहे यामध्ये आपण शिक्षकांचे वेतन जे आहे आता सन्मा. सदस्यांनी जे विचारले आहे, आता जे इन्क्रीमेंटचा जो विषय होता ह्याच्यामध्ये आपण ज्यावेळेला कोविडच्या वेळेला सर्व शिक्षकांच्या ऑर्डर काढल्या होत्या. तर काही शिक्षकांनी त्या वेळेला कामामध्ये भाग घेतलेला नव्हता. त्यामुळे आपण तात्पुरत्या स्वरुपात ते इन्क्रीमेंट स्टॉप केले होते. त्यानंतर ते सर्व शिक्षकांनी परत आपल्याकडे पत्रव्यवहार केलेत आणि नंतर त्या कामामध्ये परत ते जॉईंट पण झालेले आहेत. तर पुर्ण उच्चार करावा म्हणून आपल्याकडे निवेदन वगैरे दिलेले आहे. त्याप्रमाणे आपण फाईल पुटअप केलेली आहे.

मदन सिंग :-

वाघमारे साहेब जे काही शिक्षक त्यामध्ये नव्हते त्यांनी त्यांचे काम मे मध्ये केले आहे आणि एप्रिलमध्ये शिक्षकांना पण आपण इन्क्रीमेंट किंवा पगार दिलेली नाही. त्यांचा पगार बाकी असेल ज्यांचे इन्क्रीमेंट बाकी असेल ते करण्यात यावे असे मी निवेदन करतो. त्यानंतर मिरा भाईंदर महापालिकेचे जे काम करत असलेले शिक्षकांपैकी सगळ्यांचे अजून पी.एफ. चा उतारा पण दिलेला नाही त्यांच्याकडे रेकॉर्डच नाही त्यांच्या पी.एफ मध्ये किती रक्कम आहे किंवा किती रक्कमची वाढ होत आहे. तसेच आपल्या शिक्षकांना सर्व महाराष्ट्रातल्या महापालिकेत सर्व शिक्षकांना 7 वा वेतन आयोगानुसार वेतन आपण देतो पण आपल्या मिरा भाईंदर महापालिकेतील शिक्षकांना 7 वा वेतनवाढ ही लागू नाही. सर्व विषयावर लक्ष देण्यात यावे आणि त्यांना त्वरीत जे काही त्यांना मिळणारी सुविधा आहे ती देण्यात यावी. महापौर मॅडम अजून एक माझा विषय आहे प्रायव्हेट शाळेबद्दल मी लक्षवेधी दिली होती मला उत्तर मिळाले नाही पण माझे असे म्हणणे आहे कोरोना काळात महाराष्ट्र शासनाने एक शासन आदेश काढला आहे. 8 मे 2020 रोजी त्या शासन आदेशाच्या 3 नंबर कॉलममध्ये असे म्हटले आहे शैक्षणिक वर्ष 2020-21 साठी जर काही शैक्षणिक सुविधांचा वापर करावा लागला नाही व त्याबाबतचा खर्च कमी होणार असल्यास पालकांच्या कार्यकारी समितीमध्ये ठराव करुन त्याप्रमाणे योग्य प्रमाणात फीज कमी करावी. तर मी आपले आयुक्तांना महापौर मॅडम आपल्याला शिक्षण

अधिका-यांना निवेदन करतो की ह्या शासन आदेशाचे सर्व शाळांनी अंमलबजावणी करावी असे आपण त्यांना निर्देश द्यावा आणि ते निर्देश दिल्यानंतर ही ते करत नसेल तर त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी असे माझे निवेदन आहे.

मा. महापौर :-

आयुक्त साहेब ब-याच शाळांबाबत माझ्याकडे सुध्दा तक्रार केलेली आहे. जस आता मदन सिंग यांनी सांगितले की, मुलांनी फी भरली नाही म्हणून त्यांना परिक्षेला बसु देत नाही किंवा पालकांना त्यांचा रिझल्ट दाखवत नाही. फीज भरली नाही म्हणून त्यांना दहावीच्या परिक्षेला सुध्दा बसु न देण्यासाठी पण त्यांचे प्रयत्न चालू होता. तर अशा पध्दतीचे जर त्या शाळा आहेत तर त्यांच्यावरती आपण आपला आदेश किंवा आपले परिपत्रक सर्व खाजगी शाळांना जावे अशा पध्दतीचे बंधन करु नये आणि मुलांना शिक्षणापासून वंचित ठेऊ नये तर याबाबतचा निर्णय मला वाटते आजच्या महासभेमध्ये तर चर्चा तर होणारच आहे. सगळे सन्मा. सदस्य बोलत आहेत पण ब-याच लोकप्रतिनिधीकडे यांच्याकडे सुध्दा अशा तक्रारी येत असतील त्यांच्या त्यांच्या प्रभागामधून तर याबाबतचा आदेश आपल्याकडून व्हावा अशी माझी सुध्दा तुम्हाला विनंती आहे.

मर्लिन डिसा :-

महापौर मॅडम मी नगरसेवक बनायच्या अगोदरपासून मिरारोडची आपली 21 नंबरची शाळा आहे. त्या शाळेत मी नेहमी नोटिस करायची मुलांना सोशल सÐव्हस ॲक्टीव्हिटीज म्हणून तिकडे घेऊन जायची विद्याथ्र्यांना तिथे पहिली ते चौथी पूर्ण वर्ग एकाच क्लासमध्ये बसतात सगळे स्टूडंट स्टॅन्डर्ड फस्ट टू फस्ट सगळे एकाच वर्गात बसतात. काही कंबाईन असतात मग मी तिकडे मोर्वा गावाला तिकडे एक डोमेस्टीक व्हायलेंट केसच्यासाठी तिकडे हेअरींग होती तर प्रोटेक्शन ऑफिसरकडे तिथे ती शाळा मी व्हिजीट केली. तिथे पण 2-2, 3-3 वर्ग एकत्र बसतात आणि टीचर्स बरोबर नाही. मग त्यांना जे एज्युकेशन द्यायचे आहे. ह्या विद्याथ्र्यांना आपण कशाप्रकारे देतो. सर्व शिक्षा अभियाना अंतर्गत कमीत कमी 40 विद्यार्थी असयला पाहिजे एका वर्गात एवढे विद्यार्थी आपल्याकडे आहेत नाही आहेत तर त्याची आपण काय अरेंजमेंट करतो? प्रत्येक वर्गात 40 विद्यार्थी असावेत आणि प्रत्येक वर्गाला एक इंडीपेंडंट टिचर असावी. सब्जेक्ट व्हाईज एक्सपर्ट टिचर असावी. सायन्सला वेगळी, मॅथ्सला वेगळी, इंग्लिश सब्जेक्टला प्रॉपर इंग्लिश टीचर नॉट थ्रु व्हर्नाक्युलर मिडियम. हे मी आपल्या मिरा भाईंदरचे सर्व शिक्षा अभियांना अंतर्गत ते एक 2004 मध्ये मी ठाण्याला गेली होती. तिकडे जे ऑफिसर आले होते एच.एस.सी. बोर्डचे सेक्रेटरी आले होते अभयंकर साहेब त्यांनी तिकडे करेक्शन केले होते. जे व्हर्नाक्युलम मिडियममध्ये इंग्लिश शिकतात ते इंग्लिश एक्सपर्ट नसतात. मी इंग्लिश एक्सपर्ट म्हणून एकदा गेली होती तर प्रॉपर इंग्लीश टीचर अपॉईंट करायची आपण जेवढी सॅलरी देतो एवढे पगार देतो लोकांचा टॅक्स आपण यूज करतो पुढची जनरेशन ती गरीब मुले ह्यांना एज्युकेशन देण्यासाठी तर मग आपण याच्यात कॉम्प्रमाईज कशाला करतो? एज्युकेशन शुड नॉट बी कर्मशीयल शुड नॉट बी कॉम्प्रमाईज आणि हे आपले पुढे मोठे होणारे कोणी लिडर असतील आम्ही जेव्हा सिनियर सिटीझन होणार जास्त वयात होणार ही मुले आपला भविष्य असणार आहेत. ही मुले आपली रखवाली करणार म्हणजे आमच्यासाठी देशासाठी दे वील डू गुड व्हॉट एवर इज गुड तर हे एज्युकेशनमध्ये बिलकुल कॉम्प्रमाईज करायचे नाही. माझी रिक्वेस्ट आहे आणि आता आपण एक्स्ट्रा टीचर बोललो की 7 पे कमिशन ॲन्ड ॲट ऑल किती मुलांना शिकवतात. काही वर्गात 4 मुले असतात काही वर्गात 11 मुले असतात तर इज जस्ट टू पे द सेम सॅलरी टू द टीचर टीचींग 14 ॲडव्हान्स स्टूडंट आणि जे टीचर 10-11 मुलांना शिकवतात हे पण मॅडम काहीतरी तुम्ही एक अरेंजमेंट करा. जिथे सर्व शिक्षा अभियानचे रुल आपण फॉलो करु. रुबीना मॅडमने चांगले एक्झाम्पल दिली. त्यांच्या आई वडीलांबरोबर पण मी आपले मोठे नेता प्रेसिडेंट आपले फ्रॉम प्रेसिडेंट डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम हे तर एकदम रुलर व्हिलेजमध्ये शिकुन टॉप पोझिशन प्रेसिडेंट होऊन मिसाईल मॅन ऑफ इंडिया झाले. एवढा मोठा

रेज्युकेशन मिळाला त्यांना दॅट मिन्स यु निड वेरी डेडीकेट कमिटेड अॅन्ड व्हेल एज्युकेटेड टिचर्स विथ द फॅशन फॉर अ एज्युकेशन म्हणजे जे एकदम फॅशनेट असतील की विद्याश्र्यांना कसं आपण शिकवावं कसे त्यांना मोल्ड करावे प्लीज लुक इन टू दी एक स्पेशल कमिटी बनवा मॅडम याच्यात म्हणजे टीचर सिलेक्शन बरोबर होईल. जस्ट नॉट कॉम्प्रमाईज एनी बडी कमिंग अंडर 3 रेबर ओव्हर 6 टेबल पैशे देऊन एन्ट्री घेतात. दॅट शुल्ड नॉट बी डन अॅन्ड हे आपण जेव्हा पण ठराव आणतो तर त्याच्यात आम्हाला जे दर वेळी सांगतात की 10 टक्के वाढ होते ही वाढ होते का? तिथे शिक्षणाचे जारी आहेत त्यांनी सांगावं ही 10 टक्के वाढ होते का? मला कर्नाटक मधल्या ज्या टीचर्स आहेत महाराष्ट्र मधल्या रुलर व्हिलेज एकदम जवळ विरारमध्ये मी ऐकलेले आहे की टीचर घरीघरी जाऊन विद्याश्र्यांना घेऊन येतात. कारण त्यांची नोकरी त्यांना राखावी लागते त्यांना पगार पाहिजे म्हणून ते स्वत:च्या पगारातून खर्च करुन मुलांना आणतात आपल्या शिक्षिका असे करतात का? ते पण जरा बघुन घ्या. आता हा पूर्ण अॅकेडमिक इयर ऑनलाईन शिक्षण झाले. प्रायव्हेट स्टूडंन्सची मुलांबरोबर त्यांना शिकायला होत नाही. त्यांना किती तरी त्रास होतात यस टिचर, नो टिचर अंडस्टूड, एव्हरी थिंग अंडस्टूड ऑल कन्सेप्ट क्लियर असे म्हणून सांगतात मोठी मुले छोटी मुले सगळी पण हे मुले ह्यांना काय फॅसिलिटी दिलेली आहे. ऑनलाईन इज्युकेशन साठी ह्यांना काय प्रोव्हिजन दिलेले आहे. मुलांना मोबाईल्स दिलेले आहेत का? लॅपटॉप प्रोव्हिजन केलेले आहे का? एरिया व्हाईज त्यांना शिकविलेले आहे का मला जरा शिक्षण अधिकारी मॅडम येऊन जरा एक्सप्लेन केले तर बर होईल. आम्हाला कळू द्या की आपल्या हे विद्यार्थी यांनी हे पूर्ण वर्ष कसं शिक्षण घेतलेले आहे मॅडम माझी रिक्वेस्ट आहे तुम्हाला विनंती आहे की हे जरा मॅडमला पूर्ण सभेला एक्सप्लेन करु द्या की त्यांनी काय प्रयत्न केलेले आहेत आणि कशामुळे आपले विद्यार्थी तयार होत आहेत पुढील अॅकॅडमिक वर्षासाठी..............

मा. महापौर :-

ठिक आहे मॅडम, शिक्षण अधिकारी मॅडम जरा सांगा पुढच्या वर्षासाठी तुमच्याकडे त्याच्यामध्ये काय प्लानिंग आहे. थोडक्यात सांगा.

मर्लिन डिसा :-

मॅडम आतापर्यंत ह्या अॅकॅडमिक वर्षामध्ये त्यांनी काय प्रयत्न केले.

मा. महापौर :-

ह्या वर्षामध्ये तुम्ही काय प्रयत्न केले?

शिक्षण अधिकारी :-

मा. महापौर मॅडम, सन्मा. नगरसेवक मॅडम यावर्षी पूर्ण राज्यामध्येच ऑनलाईन शिक्षण सुरु आहे. तसेच आपल्या मिरा भाईंदर महापालिकेच्या ही स्कुलमध्ये ऑनलाईन शिक्षण आपण सुरु केलेले आहे. ह्या वर्षी आपल्याकडे टोटल शाळेचे विद्यार्थी संख्या 6 जार 151 एवढे विद्यार्थी आपल्याकडे आलेले आहेत आणि त्यातील 1894 विद्यार्थी परगावी गेलेले आहेत. त्यापैकी आपल्याकडे आपण सुरुवातीला एक सव्हे केला होता की अॅन्ड्राईड मोबाईल किंती जणांकडे आहे. साधे फोन किती जणांकडे आहेत. व्हॉट्स अॅप द्वारे किती विद्यार्थी शिकत आहेत आणि राज्यातुन महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन परिषद आहे तिथे मात्र पूर्ण वर्षाचे एक कॅलेंडर राज्यातल्या सगळ्या विद्याश्र्यांना तयार करुन दिलेले होते आणि त्या कॅलेंडर द्वारे आपण ही आपले नियोजन केलेले होते. आपल्याकडे जे विद्यार्थी आहेत 2692 विद्यार्थी ज्यांच्याकडे आज अॅन्ड्राईड मोबाईल आहेत त्यांना मात्र आपले ऑनलाईन क्लासेस आज ही सुरु आहे. आजही आम्ही महापौर मॅडमच्या समोर एका क्लासला जॉईंट करणार होतो परंतु आता यावेळेत ही एक क्लास आपला 7 वी चा सुरु आहे. आपल्या विद्याश्र्यांमध्ये महापालिका म्हणजे महाराष्ट्र राज्यामध्ये ही आपल्या महापालिकेचे ऑनलाईन शिक्षण उत्तम रितीने चालू आहे. त्याची आपण पी.पी.टी. तयार करुन राज्य स्तरावर सादर केलेली आहे. साधारण 3500 विद्यार्थी आज आपले ऑनलाईन द्वारे शिकत आहेत. महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन परिषदेने

आता सध्या खेळणी उद्बोधन वर्गाचे राज्यस्तरीय प्रशिक्षण विद्याथ्र्यांसाठी ठेवलेले होते आणि जी लिंग आहे शैक्षणिक संशोधन परिषद आमच्या ज्या एज्युकेशनच्या ग्रुपवर सर्व अधिका-यांसाठी पाठवते ती लिंक मी दररोज विद्याथ्र्यांना पाठवते तर आपल्या विद्याथ्र्यांनी खुप सुदर एक कार्यानुभवाची कप बोर्ड, फोन किंवा एक संदेश देणारा एक रोबो असे तयार केलेले आहेत. खुप चांगल्या पध्दतीने आपले ऑनलाईन शिक्षण चालू आहे.

मर्लिन डिसा :-

मॅडम ऑलाईन शिक्षण घेण्यासाठी डेटा पाहिजे नाही तर वायफाय पाहिजे ही विद्याथ्र्यांकडे सुविधा आहे का?

शिक्षण अधिकारी :-

हो मॅडम 2692 जे काही विद्यार्थी आहेत त्यांच्याकडे आहेत.

मर्लिन डिसा :-

डेटा घेण्यासाठी पैसे लागतात. त्यांच्या पालकांकडे ते अफॉर्ड करु शकतात का?

शिक्षण अधिकारी :-

हो मॅडम, आहे. आजही आपली लिंक चालू आहे. मॅम एक सजेस्ट करते की काही विद्याथ्र्यांकडे आपल्या विद्याथ्यांकडे फोन नाही असेही विद्यार्थी आपल्याकडे 600-700 आहेत की ज्यांच्याकडे साधा फोनही नाही. पॅरेन्टसकडे अशा विद्याथ्र्यांकसाठी आपण एक सहयोगी संस्था होती ती आपल्याकडे समोर आलेली होती. त्यांनी एक रिक्वेस्ट केली होती की आम्ही जे विद्यार्थी जिथे राहतात तिथे त्या भागामध्ये जाऊन प्रोजेक्टद्वारे एक 4-5 विद्यार्थी एकत्र करुन त्यांना शिक्षण देऊ आणि आपण ही मा. उपायुक्त आणि आयुक्त साहेबांनी त्यांना परवानगी दिली होती. परंतु मध्यंतरीच्या कोविड कालावधीमध्ये मात्र त्या ठिकाणी संबंधित ठिकाणी त्यांना येण्यासाठी त्या गावामध्ये बंदी घालण्यात आल्यामुळे तो कोळसा आपला प्रकल्प राहिलेला आहे आणि आजही आताही आपले विद्यार्थी ऑनलाईनमध्ये चांगले शिक्षण घेत आहेत.

मर्लिन डिसा :-

मॅडम तुम्ही सांगितले 3500 मुले शिक्षण घेत आहेत. बाकीचे विद्यार्थी काय करत आहेत? 3500 मुले ऑनलाईन घेत आहेत बाकीचे विद्यार्थी?

शिक्षण अधिकारी :-

मॅडम आता दुरदर्शनवर काही कार्यक्रम आपले सुरु होते. बाकीच्या विद्याथ्र्यांसाठी दुरदर्शन शासनानेच कार्यक्रम घेतलेले होते तर 2386 विद्यार्थी आपले ह्या दुरदर्शवरच्या शिक्षणाचा लाभ घेत आहेत. एक गोष्टीच शनिवार म्हणून आहे. त्याच्यामध्ये आपले 1496 विद्यार्थी सहभागी आहेत. गल्ली गल्ली सिम सिम नावाची एक मालिका दुरदर्शनवर सुरु होती तिच्यातही आपले 595 विद्यार्थी सहभागी झालेले आहेत.

मर्लिन डिसा :-

राज्यस्तरीय खुप प्रोग्राम आहेत पण ते प्रोग्राम बघण्यासाठी त्या प्रोग्रामचा फायदा घेणेसाठी त्यांच्या सुविधा असायला पाहिजे प्रॉपर टिव्ही असायला पाहिजे नेटवर्क असायला पाहिजे. केबल चार्जेस त्यावेळी त्यांना.....................

शिक्षण अधिकारी :-

त्या संस्थेमार्फत काम सुरु केलेले आहे.

मर्लिन डिसा :-

मॅडम तुम्हाला माझी रिक्वेस्ट आहे की तुम्ही आम्हाला कळवा की त्या विद्याथ्र्यांना काय त्रास होतात किती फॅमिली अशा आहेत ते अफोर्ड करत नाहीत त्यांना ते केबल चार्जेस अफोर्ड नाही होणार. डेटा अफोर्ड काही होणार इनपुटेड फॅसिलिटी अफोर्ड नाही होणार हे सगळे आम्हाला कळवा

बरोबर असेच ब्लॅक म्हणजे कलरफुल पिक्चर देऊन नाही चालणार. प्रॅक्टीकली तिथे काय आहे ते महापौर मॅडम आयुक्त साहेब मी तुम्हाला रिक्वेस्ट करते की एक कमिटी बनवा ज्याच्यात जाऊन आपण बरोबर सुपर विहजन करुन आम्हाला कळवू शकतो. टीचर्सची काय कॅपेसिटी आहे काय करत आहेत. टीचर पर्फामेन्स कसा आहे, विद्याथ्यांचा पर्फामेन्स कसा असतो ते आपण एक व्हॅल्युएट करण्यासाठी एक कमिटी करा जेव्हा पण शाळेबद्दल काही असा तुम्ही गोषवारा पाठवतात तेव्हा क्लास व्हाईज किती विद्यार्थी आहेत. स्टॅन्डर्ड व्हाईज किती विद्यार्थी आहेत. याची आम्हाला सगळी माहिती द्या. सेमी इंग्लिश वर्ग किती आहेत. मराठी किती आहेत हे सगळ आम्हाला कळवा.

मा. महापौर :-

सन्मा. नगरसेविका डिसा मॅडम तुमचा एक तर इंटरनेटचा प्रॉब्लेम आहे. स्पष्टपणे आवाज ऐकायला येत नाही. बराच वेळ तुम्ही आधीच तुम्हाला दिलेला आहे. इतर सन्मा. नगरसेवक सुध्दा हात वर करत आहेत. मला असे वाटते आपण त्यांना संधी द्यावी. तुम्हाला जी माहिती पाहिजे असेल प्रशासनाकडून तुम्ही लेखी स्वरुपात घ्या.

मर्लिन डिसा :-

मॅडम एक्स्ट्रा कोचिंग जे विक विद्यार्थी आहेत त्यांच्यासाठी एक्स्ट्रा कोचिंगसाठी काहीतरी प्रयत्न करावेत.

मा. महापौर :-

नक्की.

निलम ढवण :-

महापौर मॅडम गोषवा-याच्यावर जी माहिती पाहिजे ती मी घेणारच आहे. परंतु आता जो आपण विषय घेतला खाजगी शाळांची मनमानी आणि त्यावर अंकुश ठेवणे या संदर्भात खरच आपण महत्वाचा विषय जो चार दिवसांपूर्वी आम्ही आयुक्त साहेबांबरोबर देखील हा विषय डिस्कस केला होता आणि आज गरज होती की, या संदर्भात महासभेतच निर्णय लागणे गरजेचे आहे आणि योग्य आहे कारण त्यानुसार इम्पलीमिंटेश करणे देखील सोप जाईल सर्व सन्मा. सदस्यांना ह्या गोष्टीचा त्रास आणि जाणीव आहेच प्रत्येक खाजगी शाळांमध्ये एवढी मनमानी चालू आहे की त्यांना पाहिजे त्यांना त्याच विद्याथ्यांना ॲडमिशन देणार इव्हन महापालिकेचे आयुक्त साहेब असु देत किंवा इतर अधिकारी असु देत त्यांच्याकडे शैक्षणिक अधिका-यांकडून जरी एक दोघांची शिफारस गेली तरी त्याच्यावर विचार केला जात नाही. परंतु त्यांना जे इतर सोई सवलती महापालिकेच्या माध्यमातून पाहिजे असतात त्या आपण महापालिकेच्या माध्यमातून त्यांना दिलेले आहेत. टॅक्स मध्ये सवलत असु देत किंवा इतर सवलती असु देत मग एवढी मेहरबानी आपण तरी त्यांच्यावर का करावी जर त्या शाळांचा उपयोग आणि त्या शाळांचा शैक्षणिक फायदा जर सर्वसामान्य लोकांना मिळत नसेल आणि आता ब-याच शाळांमधल्या जसे आता एका सन्मा. सदस्यांनी सांगितले की दहावीचे वर्ष असुन देखील त्यांना फी भरल्या शिवाय परिक्षेला बसता येणार नाही. अशा पध्दतीने जी मनमानी चालू आहे तर अशा शाळांवर आपण कारवाई काही ना काही करणं अंकुश ठेवणे आपले काम आहे आणि आज आपल्या महासभेच्या माध्यमातून आपण आवश्यक ह्या संदर्भातला निर्णय घ्यावा एक तर कोरोनामध्ये सगळ्या लोकांची आर्थिक परिस्थिती सगळा विषय सगळ्यांसमोर आहे आणि असे असताना काही खरोखर आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या पॅरेंट्सना अशा पध्दतीने वेढीस धरणे ही फार मोठी चुक आहे. गव्हमेंटने त्यांना डोनेशन संदर्भात न घेण्या संदर्भात देखील बरेच से आदेश सर्कुलर काढलेली आहेत परंतु हे सगळ कागदावरच राहिलेले आहे. यानुसार मनमानी जे डोनेशन आहे ते डोनेशन अवाढव्य घेतले जातेच परंतु त्यांच्या फिजमध्ये देखील त्यांना कन्सेशन दिले जात नाही किंवा त्यांना परिक्षेला बसू देत नाहीत. महापालिकेने सुचविलेल्या काही विद्याथ्यांना तिथे ॲडमिशन देखील मिळत नाही अशा ज्या शाळा आहेत त्या शाळांवर कठोर कारवाई महापालिकेच्या माध्यमातून झाली पाहिजे

आणि दुसरी गोष्ट महापालिकेने त्यांना त्या सोयी सवलती दिलेल्या आहेत त्या सगळ्या कॅन्सल कराव्यात अशी मी आपणांसमोर सुचना देत आहे आणि याच्यावर ठोस कारवाई महापौर मॅडम, आयुक्त साहेब आणि सर्व सन्मा. सदस्य मिळून नक्की करा अशी मी आशा बाळगते. त्यानंतर ह्या संदर्भातील माहिती आपण नंतर द्यायला कारवाई करणार आहात ती परंतु आता गोषवा-यामध्ये जे आपण 2021-22 साठी ठराव केला तर तो आर्थिक मंजूरी आपल्या ह्या 2019-20 चे जे बजेट होते त्या बजेटमधून आपण करतो की पुढच्या वर्षाच्या याच्यातून आपण करणार आहोत. महापौर मॅडम 2019-20 च्या हेडखाली आपण हे करणार आहोत. सगळी तयारी का 2021 च्या याच्यात करणार का 2021-22 च्या याच्यात करणार.

जुबेर इनामदार :-

2021-22 आणि त्याची आर्थिक प्रशासकीय मंजूरी आता पासून दिली आहे.

मा. महापौर :-

हे आपण 2021-22 साठी करणार आहोत.

निलम ढवण :-

अच्छा मग 2020-21 चा आपला जो एज्युकेशनचा फंड आहे.

मा. महापौर :-

तो आपण वापरला नाही आपण कोविडमध्ये वापरला. शाळा चालू नव्हत्या त्याच्यामुळे आपल्याला तसा काही खर्च झाला नाही म्हणून आपण तो निधी वापरला नाही आपण हा 2021-22 साठी करतोय.

निलम ढवण :-

अच्छा म्हणजे 2020-21 चा निधी वापरुन झालेला आहे.

मा. महापौर :-

नाही आपण वापरला नाही. शाळेसाठी वापरला नाही.

निलम ढवण :-

शाळेसाठी नाही 2020-21 चा आपण कोरोनासाठी वापरला आहे असे आपले मत आहे.

मा. महापौर :-

वाघमारे साहेब उत्तर द्या.

संभाजी वाघमारे (मा. उपायुक्त) :-

आपण 2019-20 ह्या आर्थिक वर्षामध्ये आपण शालेय शिक्षणासाठी ते विषय ठेवलेले होते त्यामध्ये आपण काही खर्च केलेला नाही. आता मंजूर झालेला ठराव प्रमाणे आपण हे जे विषय प्रस्तावित केलेले होते 2019-20 साठी केले होते आणि आपण आता वर्ष संपत आलेले आहे त्यामुळे 2020-21 जे आपले येणारे आर्थिक वर्ष आहे त्यासाठी आपण हे मंजूर केलेले होते आणि ते 2020-21 ह्या आर्थिक वर्षामध्ये ते पैसे खर्च होतील आणि मुलांना शाळा सुरुवात होईल त्यावेळेलाच हे साहित्य वगैरे मिळून जाईल.

निलम ढवण :-

2020-21 मला तेच म्हणायचे आहे 2020-21 याचा अर्थ मार्च पर्यंतचा.

संभाजी वाघमारे (मा. उपायुक्त) :-

सॉरी मॅडम 2021-22.

निलम ढवण :-

2021-22 मध्ये ह्या निविदा काढणार आहोत. आता 2020-21 चा फंड वापरुन झाला असे उत्तर मिळाले आहे.

संभाजी वाघमारे (मा. उपायुक्त) :-

2020-21 मध्ये आपण खर्च केलेलाच नाही.

निलम ढवण :-

2020-21 ला आपण शालेय याच्यासाठी खर्च केला नाही. मग तो फंड काय केला.

संभाजी वाघमारे (मा. उपायुक्त) :-

मॅडम ते आपण रिअॅप्रोपेशनमध्ये ते होऊन जाईल.

निलम ढवण :-

होऊन जाईल नाही केले आहे का की पुढे करणार आहात तुम्ही?

संभाजी वाघमारे (मा. उपायुक्त) :-

मॅडम आपण याच्यामध्ये 2020-21 मध्ये शालेय शिक्षणाचा पगार आण यासाठी आपला खर्च झालेला आहे. आता जे हे विषय आपण ठेवले होते त्यासाठी आपण खर्च केलेला नाही. यामधला काही पार्ट आहे तो कोविडसाठी वगैरे याच्यामध्ये खर्च झालेला आहे.

निलम ढवण :-

मला तेच विचारायचे आहे की 2020-21 चा फंड तुमचा संपला का?

मा. महापौर :-

त्या हेडमधून आपण वापरला नाही मॅडम.

निलम ढवण :-

मॅडम शाळेसाठी नाही वापरला पण तो फंड आहे शिल्लक की संपला?

संभाजी वाघमारे (मा. उपायुक्त) :-

शिल्लक असु शकेल मॅडम. नक्की सांगता येणार नाही त्याच्यामध्ये.

निलम ढवण :-

साहेब एवढे शाळेचे विषय इथे आलेले असताना चार चार विषय आहेत त्या संदर्भातली माहिती न घेता इथे बसलात का? सांगता येणार नाही तुम्ही कसे म्हणता? त्या शैक्षणिक वर्षातले त्या बजेटच्या वर्षातले त्यांच्या हेड खाली जी अमाऊंट आहे ती आहे की नाही आहे हे तुम्ही ठामपणे सांगु शकत नाही.

मा. महापौर :-

सन्मा. नगरसेविका ढवण ताई, आयुक्त महोदय आपल्याला ह्या विषयाचे उत्तर देतील.

निलम ढवण :-

उत्तर एकत्रित देऊ देत मला हरकत नाही. मला त्या नंतरचा एक प्रश्न विचारायचा आहे. 2021-22 चा जो आपण इथे आणणार आहात पुढची जी निविदा काढणार आहात 2021-22 च्या याच्यामधून तर त्यावेळी ते शालेय शिक्षण शैक्षणिक वर्ष सुरु होताना त्यांना ते मिळेल का सगळ?

मा. महापौर :-

ठिक आहे तुम्हाला उत्तर देतील.

निलम ढवण :-

6 महिने होऊन गेल्यानंतर त्यांना ड्रेस आणि जे काही त्यांचे साहित्य असते ते त्यांना मिळते मग ते आता 2021-22 च्या याच्यात जर आर्थिक वर्षामध्ये तुम्ही ठेवलात तर त्यानुसार त्यांच्या निविदा होणार कधी आणि त्यांना मिळणार कधी.

मा. महापौर :-

आयुक्त महोदय तुम्हाला आता उत्तर देतील.

निलम ढवण :-

पटावर जी संख्या दाखवलेली आहे ती पटावरच्या संख्या हे पेपर जे आहेत त्या अस्तित्वात आहेत का तेवढ्या म्हणजे ह्या सगळ्या गोष्टींवर अंकुश कोणाचाच नाही.

मा. महापौर :-

नाही आयुक्त साहेब तुम्हाला उत्तर देणार आहेत. म्हणून तुमचे सगळे प्रश्न ऐकून घेतलेत आता जुबेर इनामदारजी बोलत आहेत.

जुबेर इनामदार :-

महापौर मॅडम मी आयुक्तांचे लक्ष वेधू इच्छितो आजच्या सभेमध्ये मला वाटते विषय क्र. 45 ते 48 हा शाळांचा विद्याथ्र्यांना देणारे म्हणजे सुखसुविधा त्यांना देतो त्यांना शाळेची फी किंवा त्यांना साहित्य ह्या विषयावर तो ठराव करण्यात आलेला आहे. आयुक्त महोदय थोडीशी तांत्रिक बाबी याच्यावर चुकली आम्ही नियोजन करतो कारण ह्या वर्षामध्ये कोविडमुळे महापौर मॅडम आपण काही खर्च करु शकलो नाही. तो विषय तिथेच संपला. पुढच्या वर्षाचे प्रोव्हिजन अजून आपण केले नाही. अर्थसंकल्पच तयार नाही. आयुक्त महोदय त्याची आर्थिक प्रशासकीय मंजूरी तुम्ही कशी देणार? हरकत नाही कमीत कमी त्या ठरावामध्ये महापौर मॅडम दुरुस्ती करावी.

मा. महापौर :-

ठिक आहे.

जुबेर इनामदार :-

त्या ठरावामध्ये दुरुस्ती करा की हे आम्ही प्रोव्हिजन करतो फक्त अंदाजित खर्च पकडलेला आहे. तो पुढच्या आर्थिक वर्षामध्ये अर्थसंकल्पामध्ये त्याची तरतूद करुन करण्यात यावी ह्या आर्थिक प्रशासकीय मंजूर ती तरतूद करण्यात यावी नाहीतर हे तुमच्या ऑडिट पॉईंटमध्ये हा अडचणीचा विषय आहे तुम्ही ऑडीटरला पाहिजे तर त्यांना विचारा. हे कुठेतरी आम्ही चुकीच्या पध्दतीचा हा अमाऊंट हा करायला निघाला म्हणजे हे आपल्याला याच्यामध्ये सुधार गरजेचे आहे. ठराव चुकीचे तुम्ही केले नाही. तुमची भावना चांगली आहे. सभागृहाची भावना चांगली आहे की पुढच्या वर्षामध्ये ह्यांना ती सुविधा लवकर उपलब्ध सुध्दा होतील. याच्यामुळे कामकाजाला सुरुवात होईल. त्या ठरावामध्ये महापौर मॅडम तुम्ही सुधार करुन घ्यावेत. दुसरं आयुक्त महोदय विषय थोड¬ाच वेळा आधी मर्लिन मॅडमने तो विषय बाकीच्या सदस्यांनी मदन सिंगजी ने तो विषय मांडला त्या शाळांमध्ये हा जो फी चा विषय चालू आहे. म्हणजे पालकांना त्याचा त्रास कोविड परिस्थितीमुळे लोक भरु शकले नाही फीज हे सगळ काही डोळ्याच्या समोर असताना सुध्दा आपण खाजगी शाळांवरती आपले कुठलेही अंकुश नाही म्हणून आपण त्याचे काही विशेष काही करुच शकत नाही. ही खरी परिस्थिती आहे. आयुक्त महोदय तुम्ही हा नोंदवून घेतला असला विषय तरी हा तुमच्या अधिकारात किती आहेत. तुम्हाला चांगली कल्पना द्यायची मात्र महापौर मॅडम आणि आयुक्त महोदय आपल्याकडे ह्या जितक्या काही खाजगी संस्था आहेत शाळा आहेत त्यांनी त्यांच्या असलेल्या वास्तूवर किती अनधिकृत बांधकाम केलेले आहेत त्यावर तरी महापालिका अंकुश आणू शकते ना. आयुक्त महोदय ह्या आपले टाऊन प्लानिंगचे इंजिनिअरीना ह्या सर्व शाळांमध्ये पाठवा हे तुमचे आणि आमचे ऐकत नाही. अवाढवी शुल्क वसुल करतात त्या विद्याथ्र्यांकडून आणि आपण कुठलीही त्यांना म्हणजे सुचना केली किंवा त्यांना रिक्वेस्ट सुध्दा केली निवेदन केले की बाबा हे विद्याथ्र्यांना तुम्ही द्या वर्षाची फी कमी करा माफ करा. ते पालिकेच्या कुठल्याही विश्वस्ताला जुमानत नाही. पालिका अधिका-यांना नाही जुमानत. आम्ही पालिकेचे विश्वस्त असताना सुध्दा आम्हाला कुठला मानसन्मान नाही ह्या विषयावर तर अशा शाळेची साहेब यादी करा त्यांच्याकडे टाऊन प्लानिंगचे इंजिनिअर पाठवा आणि त्यांनी केलेले अनधिकृत बांधकाम हे त्यांच्या लक्षात आणून द्या की हे महापालिकेचे तुमच्यावरती अंकुश लागु शकतो आणि बांधकाम निष्कासित करणे नाही करणे हा नंतरचा विषय आहे. अनधिकृत बांधकाम असेल तर ते निष्कासित केले पाहिजे

मात्र त्यांना सांगा की आम्ही डोळे बंद करतो याचा अर्थ असा नाही हे तुम्ही केलेले पाप आहेत ते कुठेतरी तुमच्या समोर येणार नाहीत. आयुक्त महोदय माझी ही एक गंभीर सुचना आहे कारण आपल्याला कुठेतरी ह्या विद्याथ्र्यांना ह्या कोविड परिस्थितीमध्ये कुठेतरी काही तरी फायदा पोहचविता येईल. या मार्गातुन तरी अशी जर तुम्ही कारवाई करावी.

नगरसचिव :-

आता सध्या 200 मिटींगमध्ये काही तांत्रिक बिघाड झाल्यामुळे आपल्याला थोडासा वेळ लागणार आहे. दरम्यान मा. महापौर मॅडमने जेवणाची सुट्टी जाहिर करण्यासाठी मला आदेश दिलेले आहेत. महापौरांच्या आदेशानुसार मी आजच्या महासभेकरिता जेवणाची वेळ जाहिर करीत आहे. आपली मिटींग पुन्हा 2 वाजता सुरु होईल.

मा. महापौर :-

सचिव साहेब पुढच्या विषयाला सुरुवात करा.

प्रकरण क्र. 48 :-

मिरा भाईंदर महानगरपालिका शाळांतील विद्यार्थ्यांना सन २०२०-२०२१ या शैक्षणिक वर्षाकरीता वह्या व पाण्याच्या बाटल्या पुरवठा करणेकामी ई-निविदा प्रक्रियेस प्रशासकीय व आर्थिक मंजूरी मिळणेबाबत.

ठराव क्र. 39 :-

उपरोक्त प्रस्तावित गोषवाऱ्यानुसार शासनाने दिलेल्या निर्देशानुसार कोरोना प्रादुर्भावामुळे सध्या शाळा बंद असून आजमितीपर्यंत शाळा सुरु करणेबाबत शासनाने कोणतेही धोरण निश्चित केलेले नाही. सन 2020-21 हे आर्थिक वर्ष संपत आहे तसेच निविदा प्रक्रिया करणेकरीता कमीत कमी एक ते दोन महिन्यांचा अवधी लागत असल्याने सन 2021-22 या आर्थिक वर्षाकरीता मिरा भाईंदर मनपा शाळेतील विद्यार्थ्यांना वह्या व पाण्याच्या बाटल्या पुरवठा करणेकामी ही मा. महासभा प्रशासकीय व आर्थिक मंजुरी देत आहे असा ठराव मांडत आहे.

सुचक :- श्रीम. वंदना भावसार  अनुमोदन :- श्री. दिनेश जैन

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. 49, सन २०२१-२२ या वित्तीय वर्षापासून दर दोन वर्षांनी महानगरपालिकेच्या वर्ग-४ कर्मचाऱ्यांकरीता छत्र्या, रेनकोट व गमबूट स्वरुपात मिळणाऱ्या लाभाचे हस्तांतर, रोख स्वरुपात थेट लाभार्थ्यांच्या थेट बँक खात्यात जमा करणेबाबत.

हेतल परमार :-

उपरोक्त प्रस्तावित गोषवाऱ्यानुसार सन 2021-22 या वित्तीय वर्षापासून दर दोन वर्षांनीemGememmem

Gem पोर्टलवरील दरानुसार दिलेल्या अनुदान रक्कमेच्या मर्यादेपर्यंत महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील स्थायी कर्मचारी वर्ग-4 चे 898 कर्मचारी कार्यरत असून विभागप्रमुखांनी केलेल्या शिफारसीनुसार जे कर्मचारी फिल्डवर्क करीत आहेत अशा कर्मचाऱ्यांकरीता वर्ग-4 dee**कर्मचाऱ्यांकरीता** छत्र्या, रेनकोट व गमबूट स्वरुपात मिळणाऱ्या लाभाचे हस्तांतर, रोख स्वरुपात थेट लाभार्थ्यांच्या थेट बँक खात्यात जमा करणेकामी सन 2021-22 या आर्थिक वर्षापासून दर दोन वर्षांनी “कर्मचारी गणवेश व पावसाळी साहित्य” या लेखाशिर्षा अंतर्गत अंदाजित रु.10,00,000/- पर्यंतच्या मर्यादेत येणाऱ्या

खर्चास मा. स्थायी समिती सभेची आर्थिक व प्रशासकीय मंजुरीच्या अधीन DBT धोरण निश्चित करणेस ही मा. महासभा मंजुरी देत आहे असा ठराव मांडत आहे.

आनंद मांजरेकर :-

माझे अनुमोदन आहे.

निलम ढवण :-

महापौर मॅडम, शैक्षणिक संदर्भात जे विषय मांडले होते त्याचे आयुक्त साहेब आपल्याला उत्तर देणार होते तर काही ते दिले नाही.

मा. महापौर :-

आयुक्त साहेब उत्तर देऊन टाका.

मा. आयुक्त :-

सन्मा. सभागृह आपण शिक्षणाविषयी जो प्रस्ताव सादर केला होता ई-निविदा खरेदी असेल किंवा डी.बी.टी असेल तर सन 2020-21 च्या 2017 साठी सादर केला होता आणि त्याच्या बद्दल ढवण मॅडमचे तीन प्रश्न होते त्याचे मी उत्तर देतो. 2020-21 म्हणजे कोविडच्या काळामध्ये ह्या हेडखाली पैसा खर्च केलेला नाही तर तो आता जो ठराव झाला त्याअनुषंगाने 2021-22 मध्ये आर्थिक तरतूद उपलब्ध होऊन त्याच्यानुसार तिथे डी.बी.टी. किंवा ई-निविदेची प्रक्रिया मॅडम आपण करणार आहोत. त्याच्या सोबतच ह्या 2021-22 साठी प्रशासकीय मान्यता आर्थिक मान्यता प्राप्त झाल्यानंतर शाळा सुरु होण्यापूर्वी आम्ही याची सगळी जी प्रक्रिया आहे डी.बी.टी ची प्रक्रिया असेल किंवा ई-टेंडरची प्रक्रिया आम्ही पूर्ण करुन शाळा सुरु व्हायच्या टाईमालाच त्या विद्याथ्र्यांना हे सगळ साहित्य उपलब्ध करुन द्यायचा प्रयत्न करणार आहोत आणि त्या सोबतच मॅडम आपण विचारले होते की पटसंख्या किती आहे आजच्या घडीला पटसंख्या शिक्षण अधिका-यांनी सांगितलीच आहे. परंतु ज्यावेळी शाळा चालू होईल त्यावेळेस पण जी पटसंख्या आहे त्याच्यानुसारच ती खरेदी किंवा ती डी.बी.टी. ची योजना राबविली जाईल मॅडम.

मा. महापौर :-

ठिक आहे.

निलम ढवण :-

आयुक्त साहेबांनी मगाशी काल दुस-या विषयावर पण एक धोरण निश्चित करण्या संदर्भात विषय झाला होता की, खाजगी शाळांच्या जी मुजोरी आहे त्या संदर्भात तर त्या संदर्भात काही आपण ठरवले आहे का?

मा. महापौर :-

त्या संदर्भात आयुक्तांनी परिपत्रक काढणार आहेत आणि आदेश देणार आहेत सर्व खाजगी शाळांना.

निलम ढवण :-

अंमलबजावणी नाही झाली तर?

मा. महापौर :-

आपण याशिवाय काही करु शकत नाही. पुढे शासनाचा आपण तसा आदेश आणावा.

जुबेर इनामदार :-

शासनाचे धोरण ठरलेले आहेत खाजगी शाळांसाठी मी सुचना केली होती आयुक्तांना आणि नगरविकास विभागाच्या कर्मचा-यांना जरा कामाला लावावे. त्या शाळांमध्ये केलेल्या अनधिकृत बांधकामाची यादी करावी.

मा. महापौर :-

ठिक आहे आपण ते ही करुया.

निलम ढवण :-

शासनाकडून जे अनुदान मिळते ते अनुदान देखील ह्या शाळा कशा वापरत आहेत कारण ते माझ्या माहितीप्रमाणे ते पैसे मुख्यध्यापकांच्या अमाऊंटला जात आहेत जे प्रिन्सीपल आहेत त्यांचा.

मा. महापौर :-

ठिक आहे तर त्याची पण माहिती घ्यावी. शिक्षणअधिका-यांनी पुढचे प्रकरण घ्या.

प्रकरण क्र. 49 :-

सन २०२१-२२ या वित्तीय वर्षापासून दर दोन वर्षांनी महानगरपालिकेच्या वर्ग-४ कर्मचाऱ्यांकरीता छत्र्या, रेनकोट व गमबूट स्वरुपात मिळणाऱ्या लाभाचे हस्तांतर, रोख स्वरुपात थेट लाभार्थ्यांच्या थेट बँक खात्यात जमा करणेबाबत.

ठराव क्र. 40 :-

उपरोक्त प्रस्तावित गोषवाऱ्यानुसार सन 2021-22 या वित्तीय वर्षापासून दर दोन वर्षांनीemGememmem

Gem पोर्टलवरील दरानुसार दिलेल्या अनुदान रक्कमेच्या मर्यादेपर्यंत महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील स्थायी कर्मचारी वर्ग-4 चे 898 कर्मचारी कार्यरत असून विभागप्रमुखांनी केलेल्या शिफारसीनुसार जे कर्मचारी फिल्डवर्क करीत आहेत अशा कर्मचाऱ्यांकरीता वर्ग-4 dee**कर्मचाऱ्यांकरीता** छत्र्या, रेनकोट व गमबूट स्वरुपात मिळणाऱ्या लाभाचे हस्तांतर, रोख स्वरुपात थेट लाभार्थ्यांच्या थेट बँक खात्यात जमा करणेकामी सन 2021-22 या आर्थिक वर्षापासून दर दोन वर्षांनी "कर्मचारी गणवेश व पावसाळी साहित्य" या लेखाशिर्षा अंतर्गत अंदाजित रु.10,00,000/- पर्यंतच्या मर्यादेत येणाऱ्या खर्चास मा. स्थायी समिती सभेची आर्थिक व प्रशासकीय मंजुरीच्या अधीन DBT धोरण निश्चित करणेस ही मा. महासभा मंजुरी देत आहे असा ठराव मांडत आहे.

सुचक :- श्रीम. हेतल परमार        अनुमोदन :- श्री. आनंद मांजरेकर

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. 50, भाईंदर (पु.) जैसल पार्क योगध्यान शेड दैनंदिन संचलन व देखभालीसाठी संस्थेस देण्यात मान्यता देणे.

शानु गोहिल :-

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (पुर्व) जेसलपार्क येथे योग ध्यान शेड असुन सदर जागा दैनदिन संचलन, देखभाल व दुरुस्तीसाठी संस्थेस देण्याकरीता मा.महासभा दि.7/6/2019 ठराव क्र.20 अन्वये निर्णय घेण्यात आलेला आहे. त्यानुसार निविदा प्रकिया करुन संस्थेची मा.महासभेच्या मान्यतेने निवड करण्यात आली होती. तथापि, सदर संस्थेने अनामत रक्कम भरुन करारनामा न केल्याने नव्याने वृत्तपत्रात जाहीर प्रसिध्दी देऊन अर्ज मागविण्यात आले आहेत. त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

**मे. योगध्यान धारणा फाऊडेंशन, भाईंदर (प.)**

सदर संस्थेने आवश्यक सर्व कागदपत्रांची पूर्तता केली असुन त्यांना तीन वर्ष मुदतीसाठी सदर शेडमध्ये योगध्यान चे संचलन करणेस, तसेच शेडची देखभाल व दुरुस्ती स्व-खर्चाने करण्याकरीता करारनामा करुन काम देण्यास शिफारस आहे.

मदन सिंग :-

माझे अनुमोदन आहे.

गिता जैन :-

महापौर मॅडम दरवर्षी एक किंवा दुसरी संस्थाना अशी वास्तु आम्ही देत असतो. मी व्हिजीट केलेली शेडमध्ये किंवा त्या शेडचे पत्रे तुटलेले होते. त्या संस्थेला द्या त्यात काही आमची हरकत नाही. पण जर त्यांनी ते मेन्टेन नाही केले तर आपण काय करु किंवा काहीतरी डिपॉझिट घेऊन आपण त्यांचे त्यात कापुन किंवा त्यांना आपण काय मोहलत देतो ते आपल्याला विना खर्च दराने देणार नाही तर ते कमर्शियल उपयोग करणार. मग ते कमर्शियल उपयोगला करते कापु शकणार? ह्या सगळ्या अटी त्या ॲग्रीमेंटमध्ये आहेत का?

मा. महापौर :-

त्याची देखभाल दुरुस्ती त्या संस्थेनेच करायची आहे.

गिता जैन :-

बरोबर आहे पण ते कमर्शियल युज करणार त्याचे काय?

शानु गोहिल :-

महापौर मॅडम गेल्या 10 ते 15 वर्षा पासून ही संस्था फ्री मध्ये लोकांना तिथे सेवा देतात त्या लोकांनी अजिबात कमर्शियल केलेले नाही. एकही रुपया लोकांकडून घेत नाही फ्री मध्ये सÐव्हस देत आहेत मॅडम.

मा. महापौर :-

ठिक आहे.

दिपक खांबित :-

मॅडम त्यांनी कोणाकडूनच पैसे घ्यायचे नाहीत. त्यांच्याकडून आपण 25 हजार रुपये डिपॉझ्झिट घेतले जर त्यांनी देखभाल दुरुस्ती साफसफाई नाही केली तर आपण ते पैसे जप्त करु शकतो. त्यासाठी आपण पैसे सुध्दा घेतलेले आहेत. बाकी त्यांच्याकडून आपण कुठलेही भाडे घेत नाही आणि 3 वर्षासाठी देतो.

गिता जैन :-

ओके आणि कमर्शियल करायचे नाही ही सुध्दा अट आहे.

दिपक खांबित :-

नाही फ्री त्यांना फ्री प्रशिक्षण द्यायचे आहे. तिकडे किंवा योगा क्लासेस घ्यायचे आहेत.

गिता जैन :-

ओके.

मा. महापौर :-

सचिव साहेब पुढचा विषय घ्या.

प्रकरण क्र. 50 :-

भाईंदर (पु.) जैसल पार्क योगध्यान शेड दैनंदिन संचलन व देखभालीसाठी संस्थेस देण्यात मान्यता देणे.

ठराव क्र. 41 :-

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (पुर्व) जेसलपार्क येथे योग ध्यान शेड असुन सदर जागा दैनदिन संचलन, देखभाल व दुरुस्तीसाठी संस्थेस देण्याकरीता मा.महासभा दि.7/6/2019 ठराव क्र.20 अन्वये निर्णय घेण्यात आलेला आहे. त्यानुसार निविदा प्रकिया करुन संस्थेची मा.महासभेच्या मान्यतेने निवड करण्यात आली होती. तथापि, सदर संस्थेने अनामत रक्कम भरुन करारनामा न केल्याने नव्याने वृत्तपत्रात जाहीर प्रसिध्दी देऊन अर्ज मागविण्यात आले आहेत. त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

**मे. योगध्यान धारणा फाऊंडेशन, भाईंदर (प.)**

सदर संस्थेने आवश्यक सर्व कागदपत्रांची पूर्तता केली असुन त्यांना तीन वर्ष मुदतीसाठी सदर शेडमध्ये योगध्यान चे संचलन करणेस, तसेच शेडची देखभाल व दुरुस्ती स्व-खर्चाने करण्याकरीता करारनामा करुन काम देण्यास शिफारस आहे.

सुचक :- श्रीम. शानु गोहिल अनुमोदन :- श्री. मदन सिंग

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. 51, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात जन सायकल सहभाग प्रणाली (Public Bicycle Sharing System) राबविणेबाबत.

धृवकिशोर पाटील :-

महापौर मॅडम, प्रशासनाने आणि आपण हा चांगला विषय आणलेला आहे याबद्दल आपले आणि प्रशासनाचे दोघांचे अभिनंदन. खरोखरच ह्या शहरामध्ये ह्या सिस्टीमची गरज आहे आणि सायकल चालविणे याचे अनेक फायदे होतात. एकतर आपला नॅशनल प्रॉफीट पण होतो कारण इंधनाची बचत होते आणि त्याच बरोबर प्रदुषण सुध्दा कमी होते. म्हणजे पर्यावरणासाठी पण हा विषय अतिशय चांगला आहे आणि सायकल चालविणे आपल्या हेल्थला सुध्दा चांगले राहते आणि रोज सायकलिंग करणे हे अतिशय गरजेचे आहे. मी सुध्दा रोज सायकलिंग करतो. त्याच्यामुळे हा विषय चांगला आहे आणि मला ह्याच्याबद्दल माहिती पण आहे. परंतु प्रशासनाने जो गोषवारा दिला हा सविस्तर गोषवारा दिलेला आहे याच्यामध्ये काही त्रृटीसुध्दा आहेत. तर माझी आपणाला विनंती आहे की मॅडम ह्या त्रृटी दुर करणे गरजेचे आहे. कारण की हा विषय एकदम चांगला आहे आणि आपण हा विषय घाईघाईने मंजूर केला तर थोडेसे याच्यामध्ये त्रृटी राहून ही चांगली सिस्टीम आहे हा चांगला प्रोजेक्ट आहे हा फ्लॉप होण्याची शक्यता नाकारता येत नाही. कारण की ठाणे महापालिकेने सुध्दा ही सिस्टीम लागु केली आहे. परंतु थोड्याशा त्याच्या पण त्रृटी आहेत. तर माझी प्रशासनाला विनंती आहे की ठाणे महापालिकेमध्ये काय त्रृटी झालेलया आहेत की तसेच आता आपण सायकली कुठे ठेवणार आहोत याचे क्षेत्र निवडलेले नाही म्हणजे अजूज ते क्षेत्र निवडणे बाकीचे गरजेचे आहे आता मिरा भाईंदर परिसर हा सगळ्या नगरसेवकांच्या डोळ्या दाखल आहे. परंतु समजा भाईंदर वेस्ट आहे, भाईंदर ईस्ट आहे आता तिकडून लोक भरपूर प्रमाणामध्ये येतात आणि त्या लोकांना तिथे सायकलचे स्टँड गरजेचे आहे परंतु जर आता आपण सायकलचे स्टँडचे तिथे आणखी केली नाही किंवा आपण सजेस्ट पण केले नाही आणि मग अशा ठिकाणी जर समजा पुन्हा सायकल स्टँड तिथे एक केले आता तिकडे एक वाद चालू आहे तिथे आपण एक प्रवेशद्वार उभारतोय आणि आयुक्त साहेबांनी तिथे थांबवून ठेवलेले आहे. मग असा वाद भविष्यात होऊ नये त्याच्यामुळे सायकल क्षेत्र ही अगोदरच निश्चित करणे गरजेचे आहे. तसेच या बरोबर मागे आपण ई-टॉयलेटसाठी पण चांगली स्कीम राबविलेली होती. वेगवेगळ्या ठिकाणी आपण ई-टॉयलेट ठेवले होते परंतु एका वर्षाच्या आत त्या सगळ्या ई-टॉयलेटची दुरावस्था झालेली आहे. पुन्हा आपण विविध उद्यानामध्ये जीमची इक्वीपमेंट लावले आहेत. खेळाचे साहित्य लावले आहेत. एक ते दोन वर्षामध्ये ते सुध्दा नाअवस्थेमध्ये असतात. मग ही जर चांगली यंत्रणा आपण उभी केली आणि काही त्रृटी जर राहून गेल्या तर पुन्हा फ्लॉप होण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणून माझी विनंती आहे प्रशासनाला की ट्राफिक डिपार्टमेंट बद्दल सुध्दा आणि सगळ्या शहराची इनपुट माहिती घेऊन आपण सायकल स्टॅन्ड कुठे ठेवणार आहोत

याची सुध्दा निट सविस्तर माहिती आम्हाला द्यायला पाहिजे आणि आता त्यांनी सांगितले शहरामध्ये जवळ जवळ 8 हजार सायकलची आवश्यकता आहे. आणि 8 हजार सायकल जर शहरामध्ये आल्या तर त्या आपल्या शहरामध्ये ठेवणे इंट्रवेरी इनपॉसिबल दुसरी गोष्ट सायकल स्टॅन्ड कुठे ठेवला पाहिजे आणि डेजिगेशन काय असायला पाहिजे ते पण असणे गरजेचे आहे कारण कसे आहे याच्यामध्ये असे नमुद केलेले आहे की जर त्या नागरिकांनी सायकल जर दुसरीकडे कुठे उभी केली तर त्याला तो दंड आकारण्यात येईल आणि पुन्हा ती सायकल त्याठिकाणी ठेवण्यात येईल आणि म्हणून अशा ठिकाणी सायकल क्षेत्र मिळवली पाहिजे की लोकांना त्याचा उपयोग झाला पाहिजे. दुसरी गोष्ट 20 न् 5 ची जागा त्यांनी मागितलेली आहे. आपल्याकडे आणि 20 न् 5 ची जागा आपल्या शहरामध्ये जे मेन स्पॉट आहेत तिथे देणे आपल्याला शक्य होईल की नाही याचे सुध्दा आपल्याला शक्य होईल की नाही याचे सुध्दा आपल्याला विचार करावा लागेल. म्हणून माझी प्रशासनाला विनंती आहे आणि सगळ्या नगरसेवकांना विनंती आहे की जो ठराव मांडतो तो जरा पास करावा. प्रकरण क्र. 51 ठराव, मिरा-भाईंदर महानगरपालिका व वाहतूक पोलिस विभाग यांनी सदर प्रकल्प राबविणेसाठी एकत्रित सर्वेक्षण करुन जन सायकल सहभाग प्रणालीसाठी सायकल स्टॅन्ड व इतर कामासाठी लागणारी जागा निश्चित करावी तसेच इतर महापालिका क्षेत्रात या प्रकारची प्रणाली राबविण्यात आलेली आहे त्यांना आलेले अनुभव याचा विचार करुन परिपूर्ण माहितीसह सदर विषय पुढील महासभेत सादर करावा असा ठराव मांडत आहे.

प्रशांत दळवी :-

माझे अनुमोदन आहे.

जुबेर इनामदार :-

म्हणजे मंजूर करणेसाठी फेर सादर होणार.

मा. महापौर :-

पुढच्या महासभेमध्ये आणायला सांगितले आहे.

धृवकिशोर पाटील :-

आपण पुढच्या मिटींगमध्ये सविस्तर सायकल स्टॅन्ड कुठे असले पाहिजे जे आपलया त्रृटी आढळलेल्या आहेत इतर महापालिकांमध्ये त्या सगळ्या त्रृटी दूर करणे गरजेचे आहे आणि ही सिस्टम चांगली आहे आणि ह्याला आपल्याला आणखीन चांगल्या प्रमाणामध्ये हे करण्याकरिता प्रशासनाने आणि आपण पुन्हा एकदा हा विषय पुढच्या महासभेत घ्यावा अशा मी विनंती केली.

निलम ढवण :-

महापौर मॅडम सदस्य धृवजींनी त्यात ही अजून एक पॉईंट टाकला होता की ठाणे महापालिकेमध्ये देखील ही सुविधा.

जुबेर इनामदार :-

ठाणे आणि नवि मुंबई.

निलम ढवण :-

आपल्या बाजूला असलेले ठाणे महापालिकेमध्ये ही जी सायकलिंगची सेवा पुरवली ही जरा फसलेली आहे त्यामुळे त्यादृष्टीने देखील विचार करावा. त्याला आपण सायकलिंग देणार आहोत त्या व्यक्तिचा रेकॉर्ड देखील आपण तपासावा जिथे कामे केलेली आहेत कशा पध्दतीने केलेली आहेत व्यवस्थित केलीत की नाही ठाणे महापालिकेची वेगवेगळ्या योजना फसलेली आहेत आणि चाळीच्या ठिकाणी किंवा इतर ठिकाणी देखील सायकलीची गरज असते. ह्या संदर्भात पूर्ण अभ्यास करुन नंतरच हा प्रस्ताव ठेकेदारासहीत सगळीच पूर्ण माहिती घेऊनच आपण पुन्हा सादर करावा.

प्रभात पाटील :-

मला संधी दिली त्याबद्दल थँक्यु पण मॅडम मी कधी पासून जो विषय मागे संपला. जैसल पार्कचा योगा संदर्भात जे देणे होते त्या संदर्भात मला बोलायचे होते पण मला म्युट करुन ठेवलेले आणि त्याच्यामुळे मी तुम्हाला मॅडम मला बोलायचे आहे तुमच्यापर्यंत मी पोहचू शकलो पण मला त्या विषयावर बोलायची परवानगी द्या.

मा. महापौर :-

बोला.

प्रभात पाटील :-

थँक्यू. मॅडम काय झाले की आपण ते योगा सेंटर तिथे दिले त्याला माझे दुमत नाही माझा विरोध ही नाही पण मला तुम्हाला आणि आयुक्तांना काही गोष्टी सांगायच्या आहेत तुम्ही योगा सेंटर महासभेत विषय आणला अमुक एक संस्थेला द्यायचा त्यांनी आतापर्यंत चालवले चांगली गोष्ट आहे. त्यांना देण्याला माझा विरोध नाही. पण ह्या शहरामध्ये ह्या संदर्भात तीन नियम लागु आहेत काही ठिकाणी विरंगुळा केंद्रासाठी आपण टेंडर काढतो. ते टेंडर महासभेसमोर जातच नाही ते परस्पर अधिकारी निर्णय घेतात आणि आपण समाज मंदिर कोणाला द्यायचे त्याचा पण निर्णय घेतो. त्याचे पण टेंडर काढतो किंवा त्याची पण ऑन पेपर काही रेकॉर्ड मागवतो आणि मग धृवकिशोरला द्यायचे तर धृवकिशोर म्हणतो मला द्या मी म्हणते प्रभात पाटील म्हणते मला द्या. मग कोणी तरी अधिकारी त्याचा निर्णय घेतात चला धृवकिशोर सिनियर आहे त्याला देऊन टाका. मॅडम असा एखादा विषय येतो की तो महासभेला येतो म्हणजे ह्या शहरामध्ये जी सार्वजनिक ठिकाणी आहेत जी उपयोगाची ठिकाणे आहेत ती कोणाला देण्याविषी जे समान धोरणच नाही आहे. ही गोष्ट नमुद करण्यासाठी आहे की आपण महासभेत नेण्याकरिता कोणाला देऊन टाका. काही ठिकाणी टेंडर पध्दती आणतो. काही ठिकाणी हे सर्वानुमते किंवा स्टॅान्डगच्या विषयावर देऊन टाकतो. हे काय आहे. हा कोणता न्याय आहे? समाज मंदिरे देण्यासाठी, विरंगुळा केंद्र देण्यासाठी योगा सेंटर देण्यासाठी काही निश्चित धोरण तरी राबवा. धोरण ठेवा. आज तुम्ही हा विषय महासभेत आणा म्हणून हा विषय महासभेला आला.

मा. महापौर :-

ठिक आहे ताई या संदर्भामध्ये प्रशासनाने धोरण ठरवावे. मग मंजूरी देण्यात यावी किंवा सदरचा विषय महासभेला.........

प्रभात पाटील :-

ही संपूर्ण प्रक्रिया तुम्ही करा तुम्हाला जे धोरण ठरवायचे आहे ते ठरवा. पण सर्वांसाठी एकच समान धोरण असले पाहिजे.

मा. महापौर :-

नक्की.

वर्षा भानुशाली :-

महापौर मॅडम तुमचे खुप खुप धन्यवाद. मला बोलायला संधी दिल्याबद्दल आणि माझी एक प्रशासनाला आणि महापौर मॅडम तुम्हाला रिक्वेस्ट आहे की, याच्या पुढे जी महासभा आपण घेणार आहोत ती जरा हाऊसमध्ये घेतली कारण कोरोनाचा काळ आता खुपच संपत आलेला आहे आणि आपल्याला पण माहित आहे की आपण कसे जगायचे त्यामुळे तुम्ही जर आता ओपनली महासभा तुम्ही घेताच महासभा चांगली होईल. माझा विषय असा आहे मॅडम मी कमीत कमी दोन वर्ष झाली मी पत्रव्यवहार करत आहे मॅडम आम्ही एक जनप्रतिनिधी आहोत. आम्हाला लोकांनी निवडून महासभेमध्ये आणलेले आहे आणि आम्ही जे काही पत्रव्यवहार करतो ते आमच्या वॉउच्र्या रिलेटीव्ह येतात मिरा भाईंदर शहराचे रिलेटीव्ह आमचा पत्रव्यवहार असतो. प्रशासनामध्ये जो कोणी अधिकारी आहे त्याचा खुप मोठी पगार खुप मोठा स्टाफ आपण देऊन तिथे बसविलेला आहे आणि आम्ही

लोकप्रतिनिधी म्हणजे अधिका-यांची वेळ निश्चित आहे ते सकाळी 10 ला येतात, संध्याकाळी 10 ला जातात. आम्ही प्रतिनिधी असून 24 तास आम्ही काम इथे करतो आणि आमच्या पत्रांचे उत्तर देण्यासाठी पण त्यांच्याकडे वेह नाही. बराच पत्रव्यवहार झाला. दोन दोन वर्ष झाली आम्ही पत्रव्यहवार करत आहोत आणि त्याचे आम्हाला उत्तर सुध्दा भेटत नाही मी प्रशासनाला विचारते तुमचा एवढा मोठा स्टाफ प्रत्येक डिपार्टमेंटमध्ये आहे आणि तुम्हाला ते उत्तर सुध्दा देत नाहीत.

मा. महापौर :-

आयुक्त साहेब, लोकप्रतिनिधी जर आपल्याकडे पत्रव्यवहार करत असतील म्हणजे प्रत्येक विभागाने त्याला पत्राचे उत्तर दिले पाहिजे मला असे वाटते मी पण पाहिले असेल की लोकप्रतिनिधीना उत्तर नंतर मिळते पण सामान्य जसे माहिती अधिकार आहेत किंवा इतर कार्यकर्ते आंदोलनकर्ते आहेत किंवा इतर विषयावरती जे लोक पत्र देतात किंवा मोर्चाचे पत्र येतात त्यांच्यासाठी आपण स्पेशल ट्रीटमेंट देतो पण लोकप्रतिनिधी त्याच विषयावरती बोलत असतात किंवा संबंधित विभागाला वारंवार पत्रव्यवहार करत असतात तर त्यांच्याकडे हेतु पुरस्पर दुर्लक्ष होत असेल तर ही बाब चुकीची आहे. सन्मा. सदस्या वर्षा भानुशाली मॅडमने हा जो विषय ह्या ठिकाणी काढलेला आहे म्हणून मी आपल्याला सांगु इच्छिते की लोकप्रतिनिधीच्या जी काही पत्रव्यवहार करतात त्यांना उत्तर ह्यापूढे देत जावे.

वर्षा भानुशाली :-

महापौर मॅडम आमच्या लेटर पॅडची किंमत काय आहे हे तुम्ही आम्हाला सांगा. दोन दोन वर्ष झाली.

मा. महापौर :-

भानुशाली मॅडम प्रशासनाला ह्या संदर्भात सुचना दिलेल्या आहेत. पुढचा विषय घ्या.

जुबेर इनामदार :-

महापौर मॅडम अनिल सावंत बरेच वेळ त्यांना ते बोलायचे आहे.

मा. महापौर :-

कुठल्या विषयावरती बोलायचे आहे त्यांना.

जुबेर इनामदार :-

त्यांना विचारा.

स्नेहा पांडे :-

महापौर मॅडम मला योगा शेडच्या विषयावर बोलायचे आहे. मॅडम योगा शेड एका संस्थेला दिला संस्थेकडून आपण डिपॉझिट घेणार काही तुटफुट झाली ते रिपेअरींग करणार आणि लोकांना फ्रीमध्ये शिकविणार आणि तिथे कुठलाही कर्मशियल काम करणार नाही अशी शर्त आहे तर याची गॅरंटी काय आहे. पूर्ण दिवस एक माणूस योगा टीचर योगा शिकविणार परत आपल्याला डिपॉझिट देणार. काही रिपेअरींग नाही ते पण करणार मग त्यांना कसे काय परवडेल?

मा. महापौर :-

त्यांना तो परवडतो म्हणून त्यांनी घेतला ना मॅडम. हा त्याचा लुकआऊट आहे.

स्नेहा पांडे :-

फुकट शिकवला नंतर तो पैसे घेणार क्लासेस चालवणार याची गॅरंटी कोण घेणार?

मा. महापौर :-

प्रशासन याच्या वरती देखरेख करेल. तसे काही आपल्याला चुकीचे आढळले काही तक्रार आली तर आपण त्याला समज देऊ शकतो.

स्नेहा पांडे :-

परंतु मॅडम संबंधित अधिकारी कोण आहे? कोण बघते. नगरसेवक निधीतून बनविले गेले आहे.

मा. महापौर :-

मिळकत विभाग त्याच्यावरती बघणार त्याच्यावरती देखरेख वगैरे सगळे ते करणार. नियंत्रण त्यांचे असणार.

स्नेहा पांडे :-

ओके.

प्रकरण क्र. 51 :-

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात जन सायकल सहभाग प्रणाली (Public Bicycle Sharing System) राबविणेबाबत.

ठराव क्र. 42 :-

मिरा-भाईंदर महानगरपालिका व वाहतूक पोलिस विभाग यांनी सदर प्रकल्प राबविणेसाठी एकत्रित सर्वेक्षण करुन जन सायकल सहभाग प्रणालीसाठी सायकल स्टॅन्ड व इतर कामासाठी लागणारी जागा निश्चित करावी तसेच इतर महापालिका क्षेत्रात या प्रकारची प्रणाली राबविण्यात आलेली आहे त्यांना आलेले अनुभव याचा विचार करुन परिपूर्ण माहितीसह सदर विषय पुढील महासभेत सादर करावा असा ठराव मांडत आहे.

सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील        अनुमोदन :- श्री. प्रशांत दळवी

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. 52, राज्य ग्रंथालय परिषदेची पुर्नरचना करणेसाठी मिरा भाईंदर महानगरपालिका सन्माननीय महापालिका सदस्यांची नावे व त्यांची व्यक्तीगत माहिती कळविणेबाबत.

राकेश शहा :-

उपरोक्त प्रस्तावित केलेल्या गोषवाऱ्यात महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये अधिनियम 1967 चे प्रकरण 2 कलम 3 (आठ) मध्ये महाराष्ट्र राज्यात कार्य करीत असलेल्या महानगरपालिकांचे प्रतिनिधीत्व करण्यासाठी, राज्य सरकारने नामनिर्देशित करणेकामी जा.क्र.जिग्रंआकाठाणे/राग्रंप/2020-21/2508-11, दि.04/11/2020 अन्वये नमुना विवरण पत्र सादर केलेले आहे.

तरी राज्य ग्रंथालय परिषदेची पुर्नरचना करणेसाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेकडून महानगरपालिकेवर निवडून आलेल्या सन्मा. सदस्यांपैकी 3 नावे सादर करणेचा विषय पुढील मा. महासभेत घेण्यात यावा असा ठराव मांडत आहे.

जयेश भोईर :-

माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर :-

पुढचा विषय घ्या.

प्रकरण क्र. 52 :-

राज्य ग्रंथालय परिषदेची पुर्नरचना करणेसाठी मिरा भाईंदर महानगरपालिका सन्माननीय महापालिका सदस्यांची नावे व त्यांची व्यक्तीगत माहिती कळविणेबाबत.

ठराव क्र. 43 :-

उपरोक्त प्रस्तावित केलेल्या गोषवाऱ्यात महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये अधिनियम 1967 चे प्रकरण 2 कलम 3 (आठ) मध्ये महाराष्ट्र राज्यात कार्य करीत असलेल्या महानगरपालिकांचे प्रतिनिधीत्व करण्यासाठी, राज्य सरकारने नामनिर्देशित करणेकामी जा.क्र.जिग्रंआकाठाणे/राग्रंप/2020-21/2508-11, दि.04/11/2020 अन्वये नमुना विवरण पत्र सादर केलेले आहे.

तरी राज्य ग्रंथालय परिषदेची पुर्नरचना करणेसाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेकडून महानगरपालिकेवर निवडून आलेल्या सन्मा. सदस्यांपैकी 3 नावे सादर करणेचा विषय पुढील मा. महासभेत घेण्यात यावा असा ठराव मांडत आहे.

सुचक :- श्री. राकेश शाह अनुमोदन :- श्री. जयेश भोईर

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. 53, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सुधारीत ६०.०० मी. रुंद विकास योजना रस्ता (दहिसर लिंक रोड) प्रस्तावित करणेकरीता महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये फेरबदलाची कार्यवाही करणेबाबत. (फेरसादर)

जयेश भोईर :-

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्राची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) दि.14/05/1997 रोजी मंजूर झालेली असून दि.15/07/1997 पासून अंमलात आलेली आहे.वगळलेल्या भागाची विकास योजना दि.25/08/2000 रोजी मंजूर झालेली असून दि.15/10/2000 पासून अंमलात आलेली आहे.मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत शासन निर्णय क्र. टिपीएस-1208/1346/ प्र.क्र.267/08/नवि-12, दि.29/08/2009 अन्वये फेरबदल मंजूर झाले आहेत.

मंजूर विकास योजनेमध्ये भाईंदर (पश्चिम) परिसरातून वसई खाडी ते मिरारोड (पश्चिम) येथील बृहन्मुंबई महानगरपालिका हद्दीपर्यंत 60.00 मी.रुंद विकास योजना रस्ता प्रस्तावित करणेच्या अनुषंगाने महानगरपालिकेमार्फत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम कलम 37 (1) अन्वये कार्यवाही प्रस्तावित आहे.

प्रस्तावित फेरबदलास मा.महासभेने यापुर्वी प्रकरण क्र.64, ठराव क्र.65 दि.05/09/2018 (तहकुब सभा दि.04/09/2018) अन्वये मान्यता दिलेली आहे.त्यानंतर सदर प्रस्तावित फेरबदलाबाबत मा.महासभेस प्रकरण क्र.86, ठराव क्र.102 दि.20/02/2020 अन्वये फेरबदल प्रस्तावास मंजुरी दिलेली आहे. सदर फेरबदलाच्या अनुषंगाने महापालिकेने स्थानिक वृत्तपत्रामध्ये दि.20/06/2020 रोजी व राजपत्र महाराष्ट्र शासन यामध्ये जुन 18-24, 2020 याप्रमाणे अधिसूचना प्रसिद्ध केलेली आहे. प्रसिद्ध अधिसुचनेच्या अनुषंगाने नागरिकांच्या सुचना / हरकती प्राप्त झालेल्या आहेत.

सदर प्राप्त सुचना / हरकतीच्या अनुषंगाने दि.21/08/2020 रोजी संबंधितांस सुनावणीस बोलाविण्यात आले होते.उपस्थित हरकतदार / सुचनाधारक यांनी सुनावणी दरम्यान त्यांचे लेखी व तोंडी म्हणणे सादर केलेले आहे.

दरम्यान मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचे दि.29/07/2020 व दि.07/09/2020 रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने प्रस्तावित विकास योजना रस्त्या व्यतिरिक्त (सोबतच्या नकाशातील हिरवा रंग) त्यालगत दुसरा रस्ता (सोबतच्या नकाशातील गुलाबी रंग) प्रस्तावित केलेला आहे व त्या

अनुषंगाने नवीन प्रस्तावित रस्त्याकरीता महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37(1) अन्वये फेरबदलाची कार्यवाही प्रस्तावित करणेकरीता कळविलेले आहे.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी 45.00 मी.रुंद नविन रस्ता प्रस्तावित केला आहे.तथापि मा.महासभा ठराव क्र.65 दि.05/09/2018 (तहकुब सभा दि.04/09/2018) च्या मंजुरी नुसार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातुन जाणारारस्ता 60.00 मी.रुंद याप्रमाणे प्रस्तावित करण्यात आलेला आहे.

जुन्या प्रस्तावित आखणीमध्ये नविन 60.00 मी.रुंद विकास योजना रस्ता दहिसर लिंक रोड म्हणून दर्शवून तद्अनुषंगाने फेरबदलाची कार्यवाही करणेबाबत कळविले आहे.नवीन रस्त्याची आखणी ही जुन्या प्रस्तावित 60.00 मी.रस्त्याची आखणी आरक्षण क्र. 91 (स्टेडिअम) पासून दक्षिणेकडे (दहिसर च्या बाजुला) विलग होत आहे.

वरील अहवालात नमुद केल्याप्रमाणे जुनी प्रस्तावित फेरबदल आखणी व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (M.M.R.D.A.) यांनी दि.29/07/2020 व दि.07/09/2020 रोजीच्या पत्रान्वये प्रस्तावित केलेली नविन आखणी हि लगतच्या परिसरातून जात असल्याने सदर आखणीखालील जागेचे व जुन्या आखणीतील बहुतांश जागामालक / कुलमुख्यत्यारपत्रधारक / हितसंबंधक सामाईक असून नवीन जागेतील बाधीत होणारे मालक / कुलमुख्यत्यारपत्रधारक / हितसंबंधी यांस दि.12/10/2020 रोजी सुनावणीस बोलाविण्यात आले होते. सादर सुनावणीच्या अनुषंगाने उपस्थितांनी त्यांचे लेखी तसेच तोंडी म्हणणे सादर केलेले आहे.

प्रस्तावित नविन विकास योजना रस्ता हा मुळत: 45.00 मी. रुंदीचा असून मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत एकूण 60.00 मी.रुंदीचा (सर्विस रोड सह) प्रस्तावित करणेत आलेला आहे.सदरच्या आखणीमध्ये भविष्यात मेट्रो रेल्वेचे देखिल काम होऊ शकेल.

सबब प्रस्तावित मुळ फेरबदल आखणी व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी प्रस्तावित केलेली आखणी (गुलाबी रंग) यांस ही महासभा मंजुरी देत आहे. तसेच सदरचा महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37(1) अन्वयेचा फेरबदल प्रस्ताव शासनास सादर करणे व तदअनुषंगिक पुढील वैधानिक व कायदेशीर कार्यवाही करणेकरीता आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांस प्राधिकृत करणेस हि महासभा मंजुरी देत आहे.

वर्षा भानुशाली :-

माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर :-

ठराव सर्वानुमते मंजूर.

प्रकरण क्र. 53 :-

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सुधारीत ६०.०० मी. रुंद विकास योजना रस्ता (दहिसर लिंक रोड) प्रस्तावित करणेकरीता महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये फेरबदलाची कार्यवाही करणेबाबत. (फेरसादर)

ठराव क्र. 44 :-

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्राची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) दि.14/05/1997 रोजी मंजूर झालेली असून दि.15/07/1997 पासून अंमलात आलेली आहे.वगळलेल्या भागाची विकास योजना दि.25/08/2000 रोजी मंजूर झालेली असून दि.15/10/2000 पासून अंमलात आलेली आहे.मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत शासन निर्णय क्र. टिपीएस-1208/1346/ प्र.क्र.267/08/नवि-12, दि.29/08/2009 अन्वये फेरबदल मंजूर झाले आहेत.

मंजूर विकास योजनेमध्ये भाईंदर (पश्चिम) परिसरातून वसई खाडी ते मिरारोड (पश्चिम) येथील बृहन्मुंबई महानगरपालिका हद्दीपर्यंत 60.00 मी.रुंद विकास योजना रस्ता प्रस्तावित करणेच्या

अनुषंगाने महानगरपालिकेमार्फत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम कलम 37 (1) अन्वये कार्यवाही प्रस्तावित आहे.

प्रस्तावित फेरबदलास मा.महासभेने यापुर्वी प्रकरण क्र.64, ठराव क्र.65 दि.05/09/2018 (तहकुब सभा दि.04/09/2018) अन्वये मान्यता दिलेली आहे.त्यानंतर सदर प्रस्तावित फेरबदलाबाबत मा.महासभेस प्रकरण क्र.86, ठराव क्र.102 दि.20/02/2020 अन्वये फेरबदल प्रस्तावास मंजुरी दिलेली आहे. सदर फेरबदलाच्या अनुषंगाने महापालिकेने स्थानिक वृत्तपत्रामध्ये दि.20/06/2020 रोजी व राजपत्र महाराष्ट्र शासन यामध्ये जुन 18-24, 2020 याप्रमाणे अधिसूचना प्रसिद्ध केलेली आहे. प्रसिद्ध अधिसुचनेच्या अनुषंगाने नागरिकांच्या सुचना / हरकती प्राप्त झालेल्या आहेत.

सदर प्राप्त सुचना / हरकतीच्या अनुषंगाने दि.21/08/2020 रोजी संबंधितांस सुनावणीस बोलाविण्यात आले होते.उपस्थित हरकतदार / सुचनाधारक यांनी सुनावणी दरम्यान त्यांचे लेखी व तोंडी म्हणणे सादर केलेले आहे.

दरम्यान मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचे दि.29/07/2020 व दि.07/09/2020 रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने प्रस्तावित विकास योजना रस्त्या व्यतिरिक्त (सोबतच्या नकाशातील हिरवा रंग) त्यालगत दुसरा रस्ता (सोबतच्या नकाशातील गुलाबी रंग) प्रस्तावित केलेला आहे व त्या अनुषंगाने नवीन प्रस्तावित रस्त्याकरीता महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37(1) अन्वये फेरबदलाची कार्यवाही प्रस्तावित करणेकरीता कळविलेले आहे.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी 45.00 मी.रुंद नविन रस्ता प्रस्तावित केला आहे.तथापि मा.महासभा ठराव क्र.65 दि.05/09/2018 (तहकुब सभा दि.04/09/2018) च्या मंजुरी नुसार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातुन जाणारारस्ता 60.00 मी.रुंद याप्रमाणे प्रस्तावित करण्यात आलेला आहे.

जुन्या प्रस्तावित आखणीमध्ये नविन 60.00 मी.रुंद विकास योजना रस्ता दहिसर लिंक रोड म्हणून दर्शवून तद्अनुषंगाने फेरबदलाची कार्यवाही करणेबाबत कळविले आहे.नवीन रस्त्याची आखणी ही जुन्या प्रस्तावित 60.00 मी.रस्त्याची आखणी आरक्षण क्र. 91 (स्टेडिअम) पासून दक्षिणेकडे (दहिसर च्या बाजुला) विलग होत आहे.

वरील अहवालात नमुद केल्याप्रमाणे जुनी प्रस्तावित फेरबदल आखणी व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (M.M.R.D.A.) यांनी दि.29/07/2020 व दि.07/09/2020 रोजीच्या पत्रान्वये प्रस्तावित केलेली नविन आखणी हि लगतच्या परिसरातून जात असल्याने सदर आखणीखालील जागेचे व जुन्या आखणीतील बहुतांश जागामालक / कुलमुख्यत्यारपत्रधारक / हितसंबंधक सामाईक असून नवीन जागेतील बाधीत होणारे मालक / कुलमुख्यत्यारपत्रधारक / हितसंबंधी यांस दि.12/10/2020 रोजी सुनावणीस बोलाविण्यात आले होते. सादर सुनावणीच्या अनुषंगाने उपस्थितांनी त्यांचे लेखी तसेच तोंडी म्हणणे सादर केलेले आहे.

प्रस्तावित नविन विकास योजना रस्ता हा मुळत: 45.00 मी. रुंदीचा असून मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत एकूण 60.00 मी.रुंदीचा (सर्विस रोड सह) प्रस्तावित करणेत आलेला आहे.सदरच्या आखणीमध्ये भविष्यात मेट्रो रेल्वेचे देखिल काम होऊ शकेल.

सबब प्रस्तावित मुळ फेरबदल आखणी व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी प्रस्तावित केलेली आखणी (गुलाबी रंग) यांस ही महासभा मंजुरी देत आहे. तसेच सदरचा महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37(1) अन्वयेचा फेरबदल प्रस्ताव शासनास सादर करणे व तदअनुषंगिक पुढील वैधानिक व कायदेशीर कार्यवाही करणेकरीता आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांस प्राधिकृत करणेस हि महासभा मंजुरी देत आहे.

सुचक :- श्री. जयेश भोईर अनुमोदन :- श्रीम. वर्षा भानुशाली

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. 54, ॲन्टी करप्शन ब्युरो कार्यालयातून लाचलुचपत प्रकरणी अटक करण्यात आलेले महानगरपालिकेतील अधिकारी / कर्मचारी यांचेवर मा. न्यायालयात अभियोग दाखल करणेकरीता मा. आयुक्त यांनी दिलेल्या मंजूरी प्रकरणाचे अवलोकन करणे.

प्रभात पाटील :-

महापौर मॅडम हे प्रस्ताव मला असे वाटते मिरा भाईंदर महापालिकेला नविन नाही राहिले. दर 3-4 महासभा ओलांडल्या की एकतरी प्रस्ताव तो आहे अवलोकनासाठी कोणीतरी कुठेतरी शेण खाल्लेले असते आणि आपल्याकडे तो अवलोकनासाठी येतो. मी हे एवढ¬ासाठी बोलते की मी वर्षानुवर्ष ह्रा महापालिकेत काम करत आहे. आणि हेच प्रस्ताव मी बघत आले. आपण त्यांना ज्यांना महाभियोग दाखल करण्यासाठी म्हणून आपण त्यांना परवानग्या देतो. आयुक्तांना प्राधिकृत करतो आणि थोड¬ा दिवसाने त्या केसेस चालू होतात त्या केसचे काय होते याची आपण जरा सुध्दा चौकशी करत नाही. ती केस झाल्यानंतर त्या माणसाला मला असे वाटते थ्री फोर्थ पगार आपल्याला द्यावा लागतो महापालिकेला माझे बरोबर असेल तर बरोबर आहे आयुक्त महोदय?

मा. आयुक्त :-

पहिला तीन महिने 56 टक्के मग 75 टक्के.

प्रभात पाटील :-

आपल्याला 75 टक्के जो पगार द्यावा लागतो तो द्यावा. लागतो आणि तो माणूस घरा बसून तो पगार खातो म्हणून त्याला आपण कामावर घेतो आणि तो एकदा कामावर आला साहेब महापौर मॅडम तुम्ही सुध्दा माझ्या बरोबरीने चालता ह्रा महापालिकेत तर तो एकदा कामाला आला की तो ज्याठिकाणी काम करत होता त्या ठिकाणी पोहचण्यासाठी तो पुन्हा एकदा कोणाच्या तरी खांद्यावर ओझ टाकतो खांद्यावर मान ठेवतो काही करतो आणि पुन्हा त्या पोस्टवर जातो. सगळ्यात महत्वाची आणि दुर्देवाची ही गोष्ट आहे की ज्या पदावर त्याने भ्रष्टाचार केला असतो त्याच पदावर तो पुन्हा जाऊन बसतो अशी तिी तरी उदाहरण ह्रा महापालिकेत आहेत. हे सगळ का असा कायदा आहे का की त्याला तिथेच नेऊन बसवायचे? मला असे वाटते ह्रा संदर्भात शासनाच्या काही गाईड लाईन आहेत मी त्या दिवशी चौकशी केल्यास धृवकिशोरने मला काही गोष्टी सांगितल्या आणि तशा जर गाईड लाईन असतील तर साहेब आपल्याला ते फॉलो केले पाहिजेत. जो मागुन भ्रष्टाचार करतो जो पकडला जातो ॲन्टी करप्शनचा तो शिकार होतो त्या माणसाला पुन्हा त्या पदावर जाऊन काम करण्याचा नैतिक अधिकार नाही. तसे कायद्यातही नमुद नाही त्याला आपण एक आपली महापालिका म्हणून किंवा आपले प्रशासन म्हणून त्या माणसाला आयुष्यभर अशी टोचणी राहिली पाहिजे की मी हे काम केले. हे गंभीर काम खराब काम मी केले म्हणून मला हे चतुर्थ श्रेणीचे काम मिळाले. साहेब त्याला त्या पदापर्यंत जाऊच दिले नाही पाहिजे. त्याच्यासाठी दुसरी पदनिर्मिती करा खालच्या पदावर आणा. महापौर मॅडम तुम्ही ह्रा संदर्भात पुढाकार घ्या. मला असे वाटते माझा ह्रा बोलण्याला कोणाचा ही विरोध नसेल. कारण हे लोक भ्रष्टाचार करतात आणि नगरसेवकांची नाव येतात. नगरसेवकांसाठी शासनाकडे सरळ कायदा आहे त्यांचे नगरसेवक पद रद्द करा आणि ह्रांना असा कायदा आहे की त्यांना परत घ्या आणि परत त्यांना त्याच पदावर न्या असे असु शकत नाही ना. हा कायदा होऊ शकत नाही ना. माझी तुम्हाला विनंती आहे की ह्रा कायद्यामध्ये जी काय तरतूद आहे एकदा मला असे वाटते तुम्ही धृवकिशोर पाटलांशी वगैरे बोलावे असे मला वाटते ज्यांना त्यातली माहिती असेल आणि पुन्हा

हा ॲन्टी करप्शनचा विषय जो आपल्याकडे अवलोकनासाठी आला आहे त्याला विरोध करुन काही फायदा नाही पण माझी सुचना महत्वाची आहे की ह्या लोकांना त्यांच्या आयुष्य भराची टोचणी हीच त्यांची शिक्षा. म्हणून पुन्हा एकदा त्या पदावर कधीही जाऊ नये मागच्या वेळेला ह्या संदर्भामध्ये आता सध्याच्या आमदार असलेल्या गिता जैन ह्यांनी सुध्दा पत्र दिले होते माझे सुध्दा पत्र होते आणखीन तिस-या नगरसेवकांचे पण ह्या संदर्भात पत्र होते पण आम्ही काही करु शकत नाही शासनाचे हे नियम आहेत म्हणून प्रशासन आपले हात वर करते परंतु आपल्याला आता गंभिरतेने स्वत:हून ह्या महापालिकेमध्ये भ्रष्टाचार रोखण्यासाठी गंभीर पाऊले उचलण्याची गरज आहे. आणि म्हणून माझी सुचना विचारात घ्यावी आणि त्याचा निर्णय घ्यावा. कदाचित तुम्हाला तो महासभेत विषय आणावा लागेल किंवा काय त्याची प्रामाणिकपणे आपण जरा माहिती घ्या आणि ह्या विषयाला वाट लावून द्या एवढी माझी विनंती आहे.

मा. महापौर :-

सन्मा. नगरसेवक अनिल सावंत बोला.

प्रभात पाटील :-

महापौर मॅडम आपण माझ्या प्रश्नाला उत्तर दिले नाही.

मा. महापौर :-

आयुक्त एकत्र उत्तर देतील.

अनिल सावंत :-

मॅडम धन्यवाद. सुरुवातीपासून मी सांगितले होते हे व्हच्युअल मिटींगचे प्रोटोकॉज जरा पाळा. बरेचसे सदस्य हॅन्ड रेस करत आहेत त्यांना बोलायला दिले जात नाही.

मा. महापौर :-

आतापर्यंत सदस्यच बोलत आहेत.

अनिल सावंत :-

मॅडम तुम्ही बघा सकाळपासून मी अजिबात बोललो नाही.

मा. महापौर :-

तुम्हाला बोलायला देत नाही असे तुम्ही म्हणत आहेत का? हे सगळेच बोलत आहेत हे बाहेरची माणसे नाहीत. आपल्याच पालिकेचे सभागृहाचे सदस्य आहेत.

अनिल सावंत :-

मॅडम मी तुमच्याशी आग्र्युमेंट करत नाही साईटला ब-याच लोकांनी हात वर केलेले आहेत.

मा. महापौर :-

राज घरत तुम्ही मला जरा माहिती देत जा.

अनिल सावंत :-

मध्यंतरी वैती साहेबांनी सुध्दा हात वर केले होते. ते पण गेले. आता मला मगाच पासून बोलायचे होते मॅडम शाळेचा विषय आहे आयुक्त साहेब तुम्ही जरा लक्ष द्या बरीच चर्चा झाली. मी थोडक्यात संपविणार आहे. आयुक्त साहेब आपल्या 36 शाळा आहेत ह्या 7-8 महिन्यांमध्ये बंद होत्या पण त्याठिकाणी हाऊस किपींग आणि रिपेअरींग ह्याचा जरा आढावा घ्या आणि ज्या ठिकाणी ही गरज असेल त्या ठिकाणी करा आणि त्याठिकाणी हाऊस किपींग आणि सिक्युरीटी हे दोन महत्वाचे विषय आहेत ते आपण घ्या. 8-9 महिन्यांमध्ये करु शकलो असतो कारण शाहा बंद होत्या. दुसरा मुद्दा मॅडम प्रकरण 47 वर मला बोलायचे होते. याच्यात गव्हमेंटची स्किम आहे की मुलांना जे आपण वह्या पुस्तके किंवा गणवेश देतो त्यांच्यासाठी त्यांच्या अकाऊंटमध्ये डायरेक्ट पैसे जमा करायचे. तो ठराव तुम्ही फेळाळलात आणि पुढच्या वर्षासाठी ते प्रोव्हिजन केले. मॅडम कोरोना कोविड लॉकडाऊन सारखा पिरेड आहे. ह्या शाळेमध्ये येणारा जो क्लास सारखा पिरेड आहे ह्या शाळेमध्ये येणारा जो क्लास आहे

तो मजूर वर्ग आहे. घरुन जरी अभ्यास केला तरी त्यांना शळा वह्या पुस्तके तर लागलीच असतील गणवेश म्हणजे तो त्यांच्यासाठी गणवेशच नसतो. घरी घालायचे कपडे सुध्दा असतात मुलांना एक हौस असते. एरवी करोडो रुपये आपण खर्च करतो. मग ह्या 8 वर्षामध्ये ह्या वर्षामध्ये आपण त्यांना का देऊ शकत नाही? हा दुसरा मुद्दा याच्यावर आयुक्त साहेब आपण विचार करा आणि निर्णय घ्या. इतर ठिकाणी आपण करोडो रुपये आपण असे फुकतो मग ह्या मुलांना जर 2020-21 साठी.

मा. महापौर :-

सावंत भाऊ आता तुम्ही काय बोलले इतर ठिकाणी करोडो रुपये असे आपण फुकतो. अशी किती करोडो रुपये कुठे कुठे फुकले याची यादी मला जरा दिली तर आपण त्याची शहानिशा करु. बोलणे सोपे आहे प्रत्यक्षात द्यायला कठीण आहे.

अनिल सावंत :-

मॅडम ज चा प्रस्ताव आहे. त्याच्यावर मी येणार आहे.

मा. महापौर :-

तुम्ही आता इथे जे निवेदन केले त्या निवेदनावरती तत्काळ कारवाई करायला आयुक्तांना सांगेन तेव्हा आम्ही तुमच्या सोबत असु. पण ते करोडो रुपये कुठे फुकलेत ते तुम्ही मला लेखी स्वरुपात द्यावे.

अनिल सावंत :-

मॅडम मगाशी जो ठराव झाला. त्याच्यावर परत एकदा जरा विचार करा. मुलांना वर्षभरात पुस्तके वह्या ह्या लागलेल्याच आहेत आणि त्यासाठी आपण तो पॉझिटिव्हली विचार जरुर करा. मुलांची आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन.

मा. महापौर :-

नक्की.

अनिल सावंत :-

तिसरी गोष्ट दुसरा तुमचा मागशी जैसल पार्कचा ठराव झाला त्या संस्थेला देण्याबद्दल आमचे काही दुमत नाही पण गोषवारा देतेवेळी प्रशासनाने तो पूर्ण गोषवारा का दिला नाही. त्या जुन्याने करारनामा केला  नाही विदाऊट करारनामाने आपण त्याला देऊन टाकले. मध्येच तो सोडून गेला. त्यानंतर तुम्ही टेंडरींग केले त्याच्यामध्ये किती लोकांनी भरले त्याच्यामध्ये आपल्या पालिकेच्या काय टर्म ॲन्ड कंडीशन होत्या? त्याच्यामध्ये हा कुठे कॉलिफाय होता? आयुक्त साहेब महापालिकेच्या जेवढ¬ा प्रॉपर्टीज आहेत ज्या आपण काही संस्थांना दिले आहेत त्याचा पूर्ण आढावा घ्या. ब-याचशा प्रॉपर्टी आपण अशा बनविलेल्या आहेत की त्याचा सातबारा पालिकेच्या नावावर नाही आणि आता सातबारा धारक त्या प्रॉपर्टी ताब्यात घेण्याची गोष्टी करतो. मग याच्यामध्ये ज्यावेळी ह्या संस्थांना आपण दिल्या त्यांच्याशी करारनामे केले. मिरारोडचे महापौर मॅडम एक उदाहरण तुम्हाला मिरारोडला 206 नंबर आरक्षण सव्हे नंबर त्याठिकाणी महापालिकेने गेट बांधला समाज मंदिर बांधले बिल्डरने आर.जी. हॅन्डओव्हर केली त्यामध्ये पालिकेने खर्च करुन लाखो रुपये खर्च करुन समाज मंदिर बांधले गेट बांधले आणि त्याठिकाणी सिध्द कला म्हणजे कलावती आई जे भाईंदरला सुध्दा त्यांचे मोठे हे आहे आणि मिरारोडला त्याठिकाणी ते बाल संस्कार वर्ग चालवायचे त्याठिकाणी त्याठिकाणी ते बाल संस्कार वर्ग चालवायचे त्याठिकाणी. त्याठिकाणी एका नाल्याचे काम महापालिकेतर्फे करण्यात येत होते. जो जाफरी खाडीला मिळणार होता. शांती नगरचे काम आज त्याठिकाणी परिस्थिती अशी आहे की गेल्या तीन महिन्यापासून त्या मालकाने जमिन मालक तो क्लेम करतो की ही जागा माझी आहे सर्व पत्रे लावून टाके मारलेले आहे. महापालिकेने लाखो रुपये खर्च करुन जे गेट बांधले आहेत त्या गेटला टाळे बांधलेले आहे. पालिकेची हिम्मत नाही की त्याठिकाणी जाऊन गेट उघडून आपल्या

नाल्याचे काम करुन घ्यायचे आणि ते मंदिर चालू करायचे अशी परिस्थिती आहे. पालिकेचे लाखो रुपये जातात आपण देऊन टाकतो.

मा. महापौर :-

आयुक्तांना तुम्ही सांगितले आहे की नाही ह्या संदर्भामध्ये?

अनिल सावंत :-

आयुक्तांजवळ 3-4 वेहा सुनावणी झाली. मॅडम आपले अधिकारी नाही कारवाई करायला तयार होत नाही. प्रभाग अधिकारी सांगतात किती वेळा जायचे.

मा. महापौर :-

ठिक आहे मी आयुक्त साहेबांना सांगते महासभेतच की हा विषय गंभीर आहे.

अनिल सावंत :-

बी.जे.पी. च्या सत्तेमध्ये मंदिर बंद होते मंदिराला टाळे मारले जाते.

मा. महापौर :-

आयुक्त साहेब ह्या विषयावरती आपण तत्काळ कारवाई करुन घ्यावी.

अनिल सावंत :-

जो विकासक आहे त्याने जे महापालिकेची दिशाभूल केली असेल त्याच्या पुढील कामांना स्थगिती द्या. धन्यवाद मॅडम.

(सदर प्रकरणाचे अवलोकन करण्यात आले.)

नगरसचिव :-

प्रकरण क्र. 55, मा. महासभा दि. ०७/०६/२०१९ ठराव क्र. २८ मध्ये दुरुस्ती करणे.

निलम ढवण :-

महापौर मॅडम पहिल्यापासून महासभेतील सर्व गोषवारा विषय आणि त्यांचे गोषवारे या संदर्भात एक असा विषय आला होता की, ज्या विषयांचे गोषवारे नाहीत ते विषय ह्या सभागृहामध्ये चर्चेला घेऊ नयेत.

मा. महापौर :-

ह्या विषयामध्ये गोषवारा मला वाटते दुरुस्ती करायची आहे ना.

निलम ढवण :-

प्रकरण क्र. 55 नंतर एकही गोषवारा नाही 55,56,57.

मा. महापौर :-

याच्यामध्ये फक्त दुरुस्ती आहे.

निलम ढवण :-

असु देत काही असु देत पण ते आम्हाला कळले पाहिजे ना मॅडम. काय दुरस्ती आहे ती.

जुबेर इनामदार :-

तुमच्या मनात काय आहे ते आम्हाला कळले पाहिजे.

निलम ढवण :-

गोषवा-यासहीत पुन्हा सादर करा. नियम आहेत ते पाळले पाहिजेत. मॅडम पण तो विषय तुम्ही कसा घेतात. गोषवारा नाही काही नाही. सन्मा. सभागृहातील सदस्यांना माहिती तर मिळाली पाहिजे. वेळोवेही त्या विषयावर गोषवारा न देण्याचे कारण काय?

मा. महापौर :-

ढवण ताई तुम्हाला सचिव उत्तर देतील.

निलम ढवण :-

सचिव साहेब उत्तर देऊन देत.

नगरसचिव :-

महासभा ठराव क्र. 28 दि. 7/6/2019 हा ठराव झालेला होता.................

(सभागृहात गोंधळ)

मा. महापौर :-

यामध्ये दुरुस्ती करायची आहे आणि हा विषय महासभेला होऊन गेलेला आहे.

निलम ढवण :-

महापौर मॅडम प्रत्येक विषयाचा गोषवारा दिला गेला पाहिजे.

मा. महापौर :-

प्रकरण क्र. 55 वर कोणाला बोलायचे आहे का?

निलम ढवण :-

महापौर मॅडम पुढचा विषयच येत नाही एक्सप्लेनेशन देण्याचा. जर गोषवाराच नाही तर त्याच्यावर चर्चा का करायची. सगळे गोषवारा सहीत सादर करा. ठरल्याप्रमाणे.

जुबेर इनामदार :-

हा प्रशासनाचा विषय नाही हा खाजगी विषय आहे गोषवारा कसा येणार.

निलम ढवण :-

असु देत ना महासभा ही खाजगी नाही.

जुबेर इनामदार :-

हा मनातला विषय आहे. हा विषय नाही.

निलम ढवण :-

महासभा खाजगी नाही.

जुबेर इनामदार :-

कामातला विषय असेल तर गोषवारा आणि मनातला असला तर गोषवारा नाही.

निलम ढवण :-

जो ठरलेला आहे त्या ठरलेल्या याच्यानुसार गेले पाहिजे. काम केले पाहिजे.

दिनेश नलावडे :-

महापौर मॅडम हे पहा मी सकाळी पाऊणे अकरा वाजल्यापासून ह्या सभेला बसलोय. सभा आपली चालू होते 11.30 वाजता आणि आम्हाला ज्या विषयावरती बोलायचे असते तेव्हा आम्ही रेस दाबतो पण त्या वेळेला तुमचे आमचे माईक अनम्युट असतात आणि ज्या विषयावरती बोलायचे नसते त्यावेळी तुम्ही आम्हाला म्युट करुन टाकतात. हा काय पोरखेळ आहे का मॅडम.

मा. महापौर :-

तुमच्या मनातले आम्हाला थोडी माहिती पडणार आहे. तुम्हाला कुठल्या विषयावर बोलायचे आहे.

दिनेश नलावडे :-

सकाळपासून मी रेस करतो.

मा. महापौर :-

तुमच्या मनाचा थांग मला कसा लागणार.

दिनेश नलावडे :-

सकाळ पासून मी हात वर करतो किती लोकांचे हात वर करत आहेत.

मा. महापौर :-

तुमचे गटनेते बोलत आहेत ना.

दिनेश नलावडे :-

महापौर मॅडम मी काय बोलतो सगळ्यांना बोलायची संधी द्या एवढी फास्ट सभा चालवायची गरज नाही. ज्यांना ज्यांना बोलायचे आहे त्यांना म्युट करुन बोलायला द्या. महापौर मॅडम जैसल पार्कचा विषय होता. योगा सेंटरचा त्याबद्दल मला भरपूर बोलायचे होते. कारण मी तुम्हाला एक सांगतो मी देखील माझा नगरसेवक निधीमधून योगा सेंटर बनविलेले आहे. अजून मी त्याचे उद्घाटन केलेले नाही आणि अशा परिस्थितीमध्ये आपण ह्या महासभेमध्ये विषय घेता. तुम्ही सगळेच योगा सेंटर भाड¬ाने द्या. समजा मंदिर, एन.जी.ओ यांना द्या याच्यापाठी मागचे महापालिकेचे उद्दीष्ट काय आहे मॅडम. याच्यातून काय साध्य होणार आहे?

मा. महापौर :-

मगाशी भरपूर चर्चा झालेली आहे.

दिनेश नलावडे :-

त्यावेळी मला बोलायचे होते.

मा. महापौर :-

प्रशासनाने पण खुलासा केलेला आहे. आता पुन्हा पुन्हा त्याच विषयावरती नको आहे.

दिनेश नलावडे :-

मला त्या विषयावरती भरपूर काही बोलायचे होते. तरी पण मी आता त्या विषयावर परत हे नाही करत पण..............

मा. महापौर :-

तुम्हाला प्रकरण क्र. 55 वरती बोलायचे आहे का?

दिनेश नलावडे :-

महापौर मॅडम योगा सेंटरच्या विषयावरती मी बोलतो माझे विचार तुम्ही त्या ठिकाणी नमुद करुन घ्या. माझा त्या गोष्टीला एन.जी.ओ. ना चालविण्यासाठी माझा विरोध असेल.

मा. महापौर :-

नक्की चालेल. प्रकरण क्र. 55 वरती कोणाला बोलायचे आहे का?

(सभागृहात गोंधळ)

गणेश भोईर :-

मा. महासभा **दि.०७/०६/२०१९ ठराव क्र.२८** अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत शहरात आंदोलन कर्त्यांसाठी नेताजी सुभाषचंद्र बोस मैदान येथे आंदोलन करणेस परवानगी देण्यात आलेली आहे. परंतु नेताजी सुभाषचंद्र बोस मैदानामध्ये आंदोलन कर्त्यांसाठी विशिष्ठ जागा निश्चित करण्यात आलेली नसल्याने आंदोलनकर्ते नेताजी सुभाषचंद्र बोस मैदानामध्ये विविध ठिकाणी बसुन आंदोलन करीत असल्याने खेळाडूंची व मॉर्निंग वॉककरीता येणाऱ्या नागरीकांची गैरसोय होत आहे. कधीकधी आंदोलनकर्ते आंदोलनाकरीता नेताजी सुभाषचंद्र बोस मैदानाच्या स्टेजवर किंवा त्याच्या शेजारी बसून आंदोलन करीत असल्याने तेथे कार्यक्रमास अडथळा निर्माण होत आहे.

सबब, नेताजी सुभाषचंद्र बोस मैदानाच्या मुख्य प्रवेशद्वाराच्या बाहेर ५० फुटाचे अंतर ठेवून आंदोलन कर्त्यांकरीता मा. आयुक्त सो. यांनी जागा निश्चित करण्यात यावी असा ठराव मांडत आहे.

मदन सिंग :-

माझे अनुमोदन आहे.

जुबेर इनामदार :-

आम्ही ह्याच्या आधी ह्या ठरावाला विरोध केलेला आहे.

निलम ढवण :-

याच्या मागे तुमचा नक्की उद्देश काय आहे. आम्हाला सांगायचे नाही का.

मा. महापौर :-

सन्मा. सदस्य जेव्हा ठराव वाचत होते तेव्हा तुम्ही ऐकलेच नाही तर मी काय करु.

निलम ढवण :-

जर गोषवाराच दिलेला नाही.

मा. महापौर :-

याच्यासाठी गोषवा-याची गरज नाही.

निलम ढवण :-

असे कसे गोषवा-याची गरज नाही. गोषवारा कशासाठी दिला जातो.

प्रविण पाटील :-

तुम्ही सांगा आम्हाला की ह्या विषयावरती गरज नाही तसा गोषवारा द्या ह्या विषयाला गोषवा-याची गरज नाही.

निलम ढवण :-

गरज नाही हे आपणच ठरवता का?

प्रविण पाटील :-

विषय काय आहे तो तरी आम्हाला समजू द्या.

प्रशांत दळवी :-

महापौर मॅडम पुढचा विषय घ्या.

जुबेर इनामदार :-

महापौर मॅडम मला ह्या विषयावर बोलायचे आहे. माझा ठराव आहे. महापौर मॅडम माझा ह्या विषयावर ठराव असणार आहे.

मा. महापौर :-

मग ठराव करा.

जुबेर इनामदार :-

महापौर मॅडम, हा आंदोलनकरांना सुभाषचंद्र बोस मैदानामध्ये आपण जागा निश्चित करुन दिली आहे. त्याच्यामध्ये अजून तुम्हाला नविन काही फेरफार करायचा असेल तर आमचा तेव्हाही ह्या विषयावर विरोध होता. आंदोलनकरी खरतर आपला महापालिका एका बाजूला आंदोलनकारी लांब बसतात. शहराच्या दुस-या कोणाला जाऊन हे योग्य नाही. महापालिकेच्या आवारात बाबासाहेब आंबेडकरांचा जिथे पुतळा आहे तिथे त्यांना एक मंच तयार करुन द्या. तिथे त्यांना बसायला संधी द्या. आंदोलनकारी ह्या शहरामध्ये का नको आहेत? का त्यांनी विरोध केला नाही पाहिजे प्रशासनाने किंवा सत्ताधाऱ्यांचा घेतलेल्या भुमिके विरोधात शहरात अंदोलनकारी नको आहेत तुम्हाला. तुम्हाला फक्त तुम्ही केली ती पूर्वदिशा असा शहरात विषय पाहिजे का?

मा. महापौर :-

हे मी नाही केलेले. पहिलाच महासभेने केलेले आहे.

जुबेर इनामदार :-

आम्ही विरोध केलेला आहे. तेव्हाही आमचा विरोध होता.

मा. महापौर :-

मी केलेच नाही. पहिलाच महासभेने आपणच ठरविलेले आहे.

जुबेर इनामदार :-

आम्ही नाही केले आम्ही विरोध केलेला आहे. सचिवांना विचारा. सचिव साहेब महापौरांना ठराव काढून द्या. आमचा त्याच्यामध्ये विरोध आहे. अजून यामध्ये आम्हाला दुरुस्ती जर करायचीच असेल तर आमची सुचना अशी असेल महापालिकेच्या आवारात त्यांना जागा मिळूवन द्या.

मा. महापौर :-

तुमचा ठराव आहे का?

जुबेर इनामदार :-

आहे मी बोललो.

मा. महापौर :-

बोला.

जुबेर इनामदार :-

महापालिकेच्या आवारात आंदोलन करणाऱ्यांना किंवा उपोषण करणाऱ्यांना जे शांत पध्दतीने आंदोलन आणि उपोषण करायला बसत असतील कुठल्याही प्रशासकीय कामकाज किंवा सत्ताधाऱ्यांच्या विरोधात तर त्यांना महापालिकेच्या आवारात त्यांना जागा करुन द्या. एक चांगला मंच करुन द्या. तिथे जाऊन ते आपले आंदोलन शांतपूर्वक केले पाहिजे हा आमचा ठराव आहे.

निलम ढवण :-

माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर :-

सचिव साहेब, दोन ठराव आलेले आहेत. मतदान घ्या.

निलम ढवण :-

महापौर मॅडम मला जरा स्पष्टीकरण द्या ना. जर गोषवारा नसेल तर आपण विषय घ्यायचा नाही. पुढच्या सभेत किंवा नंतर घेतला जाईल हे ठरविलेले असताना आपण आता गोषवारा नसताना आपण हा विषय......

उपमहापौर :-

महापौर मॅडम, ठराव आलेले आहेत. याचा निकाल काढू द्या.

निलम ढवण :-

महापौर मॅडम, मला स्पष्टीकरण द्या. पुढच्या वेळेला मी प्रश्न विचारणार नाही. तुम्हाला वाटतील ते विषय घ्या. गोषवारा दिलाच नाही.

जुबेर इनामदार :-

महापौरांनीच आपल्याला शब्द दिला होता. गोषवारा नसेल तर विषय घेणार नाही आणि महापौर मॅडम आपण स्वत: शब्दाला मागे जात आहे.

मा. महापौर :-

ह्या विषयावर काय गोषवारा ती दुरुस्ती आहे.

निलम ढवण :-

काय दुरुस्ती करणार ती पण कळली पाहिजे.

प्रविण पाटील :-

विषयच समजला नाही तर सदस्य काय बोलतील.

उपमहापौर :-

दोन ठराव आलेले आहेत त्याचा निकाल काढू द्या.

नगरसचिव :-

प्रकरण क्र.55 करीता दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव आहे सुचक श्री. गणेश भोईर अनुमोदन श्री. मदन सिंह, दुसरा ठराव सुचक श्री. जुबेर इनामदार, अनुमोदक श्रीम. निलम ढवण. सुचक श्री. जुबेर इनामदार अनुमोदक श्रीम. निलम ढवण यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ज्यांना मतदान करायचे आहे त्यांनी हात वर करायचा जी पध्दत आहे, त्याऐवजी ह्यावेळी आपण मागच्या

सभेत ज्याप्रमाणे मतदान केलेले आहे त्या प्रमाणेच गटनेत्यांच्या मार्फतच मतदानाची प्रक्रिया आपण पार पाडणार आहोत.

जुबेर इनामदार :-

हा ठराव जो आम्ही केलेला आहे आंदोलनवाल्यांसाठी दुरुस्तीचा काँग्रेस लोकशाही आघाडीच्या सदस्यांच्यावतीने केलेला आहे.

निलम ढवण :-

जुबेरजींनी जो ठराव मांडला त्याला मी अनुमोदन दिले आहे. त्या ठरावाला शिवसेनेच्यावतीने समर्थन आहे.

उपमहापौर :-

मी हसमुख गेहलोत भारतीय जनता पार्टीचा गटनेता श्री. जुबेर इनामदार यांनी जो ठराव मांडलेला आहे त्याला गटनेता भारतीय जनता पक्षातर्फे त्यांचा आम्ही विरोध करत आहोत.

गिता जैन :-

श्री. जुबेर इनामदार यांनी जो ठराव मांडलेला आहे त्याला माझे समर्थन आहे.

नगरसचिव :-

श्री. गणेश भोईर अनुमोदन व सुचक श्री. मदन सिंह यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ज्यांना मतदान करायचे आहे गटनेत्यांच्या मार्फत त्यांनी घोषीत करावे.

उपमहापौर :-

मी हसमुख गेहलोत भारतीय जनता पार्टीचा गटनेता श्री. गणेश भोईर यांनी जो ठराव मांडलेला आहे त्याला गटनेता भारतीय जनता पक्षातर्फे आम्ही ठराव मान्य करतोय आणि त्याबाजूने मत देत आहे.

जुबेर इनामदार :-

श्री. गणेश भोईरने मांडलेला ठराव काँग्रेस लोकशाही आघाडीच्यावतीने आम्ही त्याला विरोध करत आहोत.

निलम ढवण :-

श्री. गणेश भाईर यांनी मांडलेल्या ठरावाला शिवसेनेचा विरोध आहे.

गिता जैन :-

माझाही विरोध आहे.

मा. महापौर :-

सन्मा. सदस्य गणेश भोईर यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ३८ आणि विरोधामध्ये २४ आहेत. श्री. गणेश भोईर यांनी मांडलेला ठराव बहुमताने मंजूर करण्यात येत आहे.

जुबेर इनामदार :-

सचिव महोदय, मतदान ज्यांनी केलेले आहे ज्यांनी विरोध केला आहे, त्यांची नावे मिळतील ना आम्हाला?

नगरसचिव :-

हो मिळतील.

मा. महापौर :-

मिळतील ना.

निलम ढवण :-

महापौर मॅडम श्री. अश्विन कासोदरीया त्यांचा फोन आला होता. त्यांचा ठरावाला विरोध आहे असे त्यांचे म्हणणे आहे. त्यांचे स्वतंत्र मत ऐकून घ्या. त्यांना अनम्युट करा.

अश्विन कासोदरीया :-

महापौर मॅडम, श्री. गणेश भोईरने जो ठराव किया है उसको मेरा विरोध है|

मा. महापौर :-

ठिक आहे.

प्रकरण क्र. 55 :-

मा. महासभा दि. ०७/०६/२०१९ ठराव क्र. २८ मध्ये दुरुस्ती करणे.

ठराव क्र. 45 :-

मा. महासभा **दि.०७/०६/२०१९ ठराव क्र.२८** अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत शहरात आंदोलन कर्त्यांसाठी नेताजी सुभाषचंद्र बोस मैदान येथे आंदोलन करणेस परवानगी देण्यात आलेली आहे. परंतु नेताजी सुभाषचंद्र बोस मैदानामध्ये आंदोलन कर्त्यांसाठी विशिष्ठ जागा निश्चित करण्यात आलेली नसल्याने आंदोलनकर्ते नेताजी सुभाषचंद्र बोस मैदानामध्ये विविध ठिकाणी बसुन आंदोलन करीत असल्याने खेळाडूंची व मॉर्निंग वॉककरीता येणाऱ्या नागरीकांची गैरसोय होत आहे. कधीकधी आंदोलनकर्ते आंदोलनाकरीता नेताजी सुभाषचंद्र बोस मैदानाच्या स्टेजवर किंवा त्याच्या शेजारी बसून आंदोलन करीत असल्याने तेथे कार्यक्रमास अडथळा निर्माण होत आहे.

सबब, नेताजी सुभाषचंद्र बोस मैदानाच्या मुख्य प्रवेशद्वाराच्या बाहेर ५० फुटाचे अंतर ठेवून आंदोलन कर्त्यांकरीता मा. आयुक्त सो. यांनी जागा निश्चित करण्यात यावी असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. गणेश भोईर अनुमोदक :- श्री. मदन उदितनारायण सिंह**

| ठरावाच्या बाजूने | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|
| **भारतीय जनता पार्टीचे ३८ सदस्य** | **शिवसेना व कॉंग्रेस लोकशाही आघाडीचे २२ सदस्य व भारतीय जनता पार्टीच्या सदस्या श्रीम. गिता जैन व श्री. अश्विन कासोदरीया असे एकुण २४ सदस्य** | **शिवसेना पक्षाच्या सदस्या श्रीम. दिप्ती भट्ट** |

**ठराव बहुमताने मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

नगरसचिव :-

प्रकरण क्र. 56, मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन सेवेबाबत आढावा घेणे.

निलम ढवण :-

याचा गोषवारा नाही.

मा. महापौर :-

आढावा आहे. तुम्हाला जर ह्या विषया संदर्भात बोलायचे असेल तर बोला.

जुबेर इनामदार :-

आढावा कोण देईल? प्रशासन देईल ना. महापौर मॅडम, आढावा प्रशासनाने दिला पाहिजे.

मा. महापौर :-

कोणाला ह्याबद्दल काही प्रश्न विचारायचे असतील प्रशासनाला.......

जुबेर इनामदार :-

प्रशासनाने आधी त्यांचे निवेदन करावे. त्याच्या नंतर आम्ही प्रश्न उपस्थित करु. प्रशासनाने आपले निवेदन केले पाहिजे. ही प्रशासनाची भुमिका आहे.

प्रशांत दळवी :-

महापौर मॅडम, मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन सेवेचा जो आढावा घ्यायचा आहे तो पहिला प्रशासनाच्या माध्यमातून येऊ द्या. प्रशासन पहिला काय करते ते आपण बघायचे.

मा. महापौर :-

ठिक आहे. बोला.

अजित मुठे (उपायुक्त, परिवहन) :-

मिरा भाईंदर महानगरपालिकामार्फत परिवहन सेवा ही सध्या चालविण्यात येत आहे. सध्या ४६ बसेस आपण चालवत आहोत. मा. हायकोर्टाच्या निर्देशानुसार परिवहन वाहतुक ठेकेदाराला दि. १७/१२/२०२० पर्यंत बस सेवा चालविण्याची परवानगी देण्यात आली होती. तसेच त्यांची दाखल केलेल्या याचिकेबद्दल पुन:च्छ पालिका दाखल करण्यास मा. हायकोर्टाने त्याला कळविले होते. त्यानुसार दि. १८/१२/२०२० पासून मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन सेवा चालवित आहे. ४६ बसेस सध्या सुरु आहेत. याच्यात आपण ड्रायव्हर कन्डक्टर हे पूर्वीचे जे कर्मचार होते त्यांनाच आपण काम दिलेले आहे. त्यासाठी स्वतंत्र हे केलेले नाही आणि बससेवा सुरळीत सुरु आहे.

ध्रुवकिशोर पाटील :-

महापौर मॅडम, मुठे साहेबांचा खुलासा संपला का?

अजित मुठे (उपायुक्त) :-

महापालिकेने दि. १८/१२/२०२० ते दि. ३१/१२/२०२० पर्यंत एकूण १ लाख ४९ हजार ३६५ किलोमीटर बस चालविलेली आहे. त्यात आपल्याला ५१ लाख रुपये उत्पनन मिळालेले आहे. आणि जवळजवळ ३ लाख ८९ हजार ८४१ प्रवाशांनी प्रवास केलेला आहे. तसेच दि. १०/०१/२०२१ पर्यंत १ लाख ५ हजार ७०० कि.मी. बस चाललेली आहे. ३७ लाख ८० हजार १८८ रु. उत्पन्न मिळाले आहे. २ लाख ८९ हजार ९६५ रु. आपल्याला एकूण प्रवासी चाललेले आहेत. यात आपल्याला जवळ जवळ ७० लाख रु. खर्च झालेला आहे आणि उत्पन्न जे मिळालेले आहे ते ५१ लाख रु. मिळालेले आहे. आपला जो फरक आहे अंदाजित खर्च ४७.४३% पर कि.मी. आपल्याला खर्च आलेला आहे आणि याच्यावर उत्पन्न आपल्याला ३४.१५ कि.मी. पर किलोमीटर उत्पन्न मिळालेले आहे. एकूण १९ लाख ८३ हजार ९२० ची तफावत आहे. १३.२८ पर कि.मी. इतकी तफावत आपल्याला आहे.

जुबेर इनामदार :-

किती टक्क्याची तफावत आहे साहेब?

अजित मुठे (उपायुक्त, परिवहन) :-

२८ टक्क्यांची तफावत आहे आणि प्रत्यक्षात १३ रुपये २८ पैसे पर कि.मी. आपल्याला कमी मिळत आहे.

जुबेर इनामदार :-

महापौर मॅडम, जी.सी.सी. तत्वावर देणार होतो तेव्हा १२% ची तफावत प्रशासनाने जी.सी.सी. तत्वावर जेव्हा परिवहन सेवा चालवायची होती आणि ते धोरण निश्चित करायचे होते तेव्हा १२% तफावत असणार असे प्रशासनाने गृहित धरुन आम्हाला प्रस्ताव दिला होता. मा. आयुक्त साहेब आता तो २८% गेला आहे. त्याला कारण काय? संपूर्ण बसेस परिवहन सेवा रस्त्यावर नाही हे एक कारण आहे का? की सध्याच्या परिस्थितीचा हा जो आकडा दिला आहे मला वाटते कोविड परिस्थितीमध्ये

जे काय आपले कामकाज चालले आहे त्याच्यामधले आहे आपण बसेस जास्त चालवतोय आणि आपल्याकडे उत्पन्न कमी आहे अशी परिस्थिती आहे का? याचा निष्कर्ष प्रशासनाने काय काढला आहे याचे कारण काय? सरळ २८**%** वर आपली तफावत गेलेली आहे. म्हणजे हे १२% ही आपल्याला जास्त दिसत होते ते आता १२% तफावत असणार हे प्रशासनाने आम्हाला डोळ्यासमोर चित्र दाखवले होते. जेव्हा हे परिवहन धोरण निश्चित करण्यात आले. जी.सी.सी. प्रणालीवर असेल

एन.सी.सी. वर तर आता नंतर चालवायला घेतले आणि ते आपले कोणामुळे होते नव्हते ते तेव्हाही १२% म्हणजे जी.सी.सी. तत्वावरच आज चालली आहे. आजही कामकाज चालू आहे ना. आज प्रशासन चालवतोय तो जी.सी.सी. तत्वावर चालवतोय. २८% कसा काय खर्च गेला?

अजित मुठे (उपायुक्त) :-

सद्यस्थितीत शासन आदेशप्रमाणे ५० टक्क्यांवर आपण बसेस चालवत आहोत. त्यामुळे उत्पन्न सध्या आपल्याला कमी मिळत आहे. मात्र जो येणारा खर्च आहे डिझेल वगैरे तो कायमच राहणार आहे.

जुबेर इनामदार :-

तुम्हाला तितके प्रवासी नसले जसे रेल्वे आजच्या तारखेत चालली आहे. त्यांनी आपल्याला निश्चित केलेला टाईम किंवा त्यांनी प्रवासी निश्चित केलेले अशाप्रकारे आपण चालवतोय का? संपूर्ण आपल्या ताकदीने आपण पूर्ण क्षमतेने परिवहन सेवा चालवतोय. तुमच्याकडे ४६ बसेस आहेत. ४६ च्या ४६ बसेस आपल्याला रस्त्यावर धावतात का?

अजित मुठे (उपायुक्त) :-

आपल्याकडे एकूण ७४ बसेस आहेत त्यातले आपण ४६ फक्त चालवतोय. ७४ बसेस आता प्रवासी नसताना किंवा रेल्वे सेवा पाहिजे त्या प्रमाणात लोकांना उपलब्ध नसल्यामुळे जर आपण ७४ बसेस चालवल्या तर मनपाला मोठ्या प्रमाणात तोटा येण्याची शक्यता आहे. आवश्यकतेप्रमाणे आपण त्या बसेस चालवतोय ज्या प्रवासी मार्गावर प्रवासी जास्तीत जास्त आहेत अशा मार्गावर आपण सध्या ९ मार्गांवर बसेस चालवतोय पूर्वी आपले एकूण १७ मार्ग होते.

जुबेर इनामदार :-

तशी २८% तफावत आहे. मुठे साहेब प्रवासी ज्या मार्गावर जास्त आहेत तिथे तुम्ही सेचा चालवता तेव्हा चालवताना तुम्हाला मग नुकसान इतक्या प्रमाणात का होत आहे?

अजित मुठे (उपायुक्त) :-

५०% वर आपण बसेस चालवतोय ना. ५०% चा अर्थ एका सिटवर एकच प्रवासी आपण बसवतोय. ज्यावेळी पूर्ण बस भरली असेल जो हा तोटा होत आहे तो होणार नाही. मात्र आपण ही बाब लक्षात घ्या बसमध्ये एक प्रवासी असो किंवा पूर्ण प्रवासी बसलेले असो डिझेल तेवढेच लागणार आहे. ड्रायव्हर, कंडक्टरचा खर्च तेवढाच येणार आहे. गाडी तेवढीच चालणार आहे. विषय असा आहे की, प्रवासी सध्या त्याच्यात कमी आहेत.

जुबेर इनामदार :-

खरोखरच प्रामाणिकपणे एका सिटवर एकच पॅसेंजर बसतो? कोणी याची शहानिशा करायला गेले आहेत का? आम्ही तर बघितले नाही अशाप्रकारे. आपल्या बसेस भरुन जात आहेत. मुठे साहेब तुम्ही ७४ बसेसच्या त्यांची चेसी कंम्प्लीट होऊन तुमच्या ताब्यात आलेल्या आहेत का?

अजित मुठे (उपायुक्त) :-

आलेल्या आहेत.

जुबेर इनामदार :-

७४ च्या ७४ तुम्ही तुमच्या ताब्यात घेतले?

अजित मुठे (उपायुक्त) :-

७४ बसेस आपल्या ताब्यात आहेत.

जुबेर इनामदार :-

पालिकेची परिस्थिती आपल्या डोळ्यासमोर आहे. मुठे साहेब आपण ५०% पेक्षा जास्त प्रमाणात चालवत आहोत आणि आपण २८% तफावत वरती जगतोय परिवहन सेवेला घेऊन म्हणजे १०० % आपल्याला यातून फक्त नुकसान आहे. याच्या पलिकडे काही नाही. यात तुमचे मत आहे. आयुक्त महोदय, ह्यावर तुम्हाला प्रामाणिक निर्णय घ्यावा लागेल की, परिवहन सेवा कशाप्रकार आता चालवायच. आपल्याकडे २८% ची तफावत ही काय छोटं मोठं नुकसान नाही. हे पालिकेच छोट नुकसान नाही मोठ्या प्रमाणात आहे आणि हे रोजचे नुकसान आहे. खरोखर परिवहन सेवा अशाप्रमारे चालली पाहिजे का? आपली परिवहन सेवा ह्या शहरामध्ये २००९ च्या नंतर चालू आहे. २००९ च्या नंतर इतक्या मोठ्या प्रमाणात मला तरी वाटत नाही की, आपली तफावत झालेली आहे. २००९ च्या नंतर इतकी मोठी तफावत कधीच परिवहनची झालेली नाही. मा. आयुक्त साहेब, तुम्हाला याच्यावर निर्णय घ्यावा लागेल. खरोखर अशाप्रकारे परिवहन सेवा आपल्याला चालवली पाहिजे का? ठराविक रुट निश्चित करा जिथे सध्या तुमचे नुकसान कमी होईल. नाही तर आपल्याला पालिकेचा हा भुर्दंड भरणे कठीण होणार आहे. १२% सुध्दा म्हणजे सबसिडीने आपल्याला तिथे पैसे द्यावे लागत होते. मुळ अंदाजामधून अर्थसंकल्पामधून पविहनकडे वर्ग केलेत ते पैसे आहेत. म्हणजे कुठे तरी आपल्याला बाकीचे कामकाज थांबवावे लागेल आणि फक्त परिवहन चालवावी लागेल. म्हणून ह्याच्यावरती आयुक्त महोदय तुम्हाला शहानिशा केली पाहिजे आणि योग्य तो निर्णय घेतला पाहिजे.

शर्मिला बगाजी:-

मा. महापौर, मा. उपमहापौर साहेब आपल्या परवानगीने बोलते आत मुठे साहेबांनी आढावा दिला की ७४ बसेस आपल्याकडे आहे आणि ४६ बसेस आता रनिंगमध्ये आहेत आणि त्याच्यामध्ये २८% आपली तफावत दाखवली आहे. तर साहंबांनी जर अजून खुलावा करावा माझा १-२ प्रश्न की उत्तनचा जो रूट आहे तो सगळयात फायदेशीर रूट आहे. आणि जास्तीत जास्त गर्दीचा रूट आहे तर त्याच्यामध्ये बसेस का वाढविल्या जात  नाही ? सकाळी ५.०० वाजल्यापासून बसेस चाल्या पाहिजे ५.०० ते १२.३० वाजेपर्यंत त्यामध्ये किती तरी म्हणजे एक एक तासाचा डिफरंस ठेवलेला आहे तो रूट जास्तीत जास्त् चालणारा आहे त्याच्यामध्ये कमीत कमी बसेसच्या आपण पुरवठा केलेला आहे त्या बसेस आपल्या आता डेपोमध्ये पडून आहेत. त्या का काढल्या जात  नाहीत आणि दुसरी गोष्ट सगळयात महत्वाचे आपल्याला प्रशासन मिसगाईड करत आहे की एक सिटवर एकच प्रवासी दिला जातो. तुम्ही संध्याकाळी आपण प्रत्येक लोक गाडीमधून जाता म्हणून तुम्हाला कदाचित बसमधल्या प्रवाशांचे हाल दिसत नसतील किंवा तुम्ही इग्नोर करता असे मला वाटते. कारण संध्याकाळी तुम्ही आपल्या गेटच्या समोर असलेल्या एखाद्या बसला तुम्ही फक्त एकदा डोकावून पहा. एवढी गर्दी असते तर तिथे सोशल डिस्टन्सींगचा फज्जा उडतोय. प्रवासी एकाच सिटवर नाही तर सगळ्या सिट भरुन उभे राहून प्रवासी जातात. मग आपल्या फायदेशीर रुट आणि जेव्हा जास्तीत जास्त गरज असते म्हणजे प्रवासी जेव्हा सकाळी व संध्याकाळी त्या वेळेला आपण बसेस जादा सोडत नाही. त्यावर विचार केला पाहिजे. तो फायदा आपण रिक्षावाल्यांना करुन देतो. आपण सोशल डिस्टन्सींगसाठी पुढाकार घेत असतो मग त्याच्यामध्ये सोशल डिस्टन्सींग पाळले जात नाही. आपण रुट का वाढून घेत नाही. बसेस का वाढवल्या जात नाहीत. त्याच्यासाठी मी आयुक्तांना पत्र दिले होते. उपायुक्तांना पण पत्र भेटलेले आहे. गोराई मनोरीच्या बसेस आपण पूर्णपणे बंद केलेल्या आहेत. तो रुट आपला एवढा फायदेशीर आहे कारण तिकडे रिक्षांचा पण खुप तुटवडा असतो. मग ते रुट का चालवले जात नाही. हा तुटवडा का भासतो कारण हे रुट बंद आहेत. तुम्हाला माहिती आहे शहरात कुठेही बस नसल्या तरी किती तरी पर्याय आहेत पण उत्तन, चौक, गोराई, मनोरी इथून येणाऱ्या प्रवाशांना काहीही पर्याय नसतो. मग याचा का विचार केला जात नाही. फक्त हा तुटवडा इथे दाखवतात की इथे प्रवासी नाहीत. इथे वापर नसल्यामुळे आपल्याला हा तुटवडा भासत आहे. याच्यावर कोण लक्ष देईल. महापौरांनी

मिटींगमध्ये त्यांना रुलींग द्यावी की जास्तीत जास्त बसेस सोडावीत. साहेब माझे तीन मुद्दे होते की, एक तर बसेस वाढविण्याबाबत.......

प्रविण पाटील:-

उपमहापौर साहेब शर्मिला बगाजीनी जो विषय सांगितला आत आपण एका बाजूला सांगता प्रशासनाने असा खुलासा केला मी आपला तुटवडा आहे तोट्यात चाललेली आहे आणि जुबेर इनामदारनी पण सांगितले की आपली बस एवढी तोटयात चाललेली आहे सगळा विषय असताना आम्ही मागणी करतो उत्तनचा रूट वाढवा तसे तुम्ही वाढवत नाही. काय अडचण आहे ? जाणूनबूजून तुम्ही उत्तनला बस वाढवत नाही की काय एका बाजूला सांगता बसेसला प्रवासी नाहीत.

मा. उपमहापौर:-

हा प्रश्न आलेला आहे दुसरा वेगळा प्रश्न असेल तर बोला.

प्रविण पाटील:-

दुसरा प्रश्न नाही आम्हला खूलासा द्या कित्येक वर्षापासून आम्ही मागतो. खुलासा द्या कशाला उत्तनचे रुट तुम्ही वाढवत नाही. प्रशासनाने पहिला खुलासा करा.

मा. उपमहापौर:-

पहिला साहेब खुलासा एकत्रीत देतात. प्रॉब्लेम नाही आम्ही खुलासा देवू. पण त्या विषयावर दुसरे प्रशन आहेत का ते बोला बगाजी मॅडमने तो प्रश्न मांडलेला आहे आणि त्याचा खुलासा तयार आहेत.

प्रविण पाटील:-

प्रशासन देणार आहे का ?

मा. उपमहापौर:-

हो देत आहेत. धृवकिशोर पाटील साहेब बोला.

धृवकिशोर पाटील:-

उपमहापौर साहेब विषय बहोत बडा गंभीर है । और असमे हमने आयुक्त साहब की जरूरत है और आयुक्त साहेब नही है । तो डिसीजन लेगा कौन ?

मा. उपमहापौर:-

आयुक्त साहेब आ गये ।

धृवकिशोर पाटील:-

आयुक्तसाहेब परिवहन विषयाबाबत मुठे साहेबांनी थोडीशी माहिती दिली. ह्या माहितीच्या आधारावरती मुठे साहेबांनी जी माहिती दिली त्या माहितीच्या आधारे असे दिसण्यात येत आहे की मिरा भाईदर महानगरपालिका परिवहन उपक्रमामध्ये आता पण आपण ५०% वरती चालवत असताना सुध्दा आपल्याला एवढा लॉस होत आहे. आणि आपण तर संपुर्ण बसेस जर सुरू केल्या तर हा लॉस आपला अवाक्याबाहेर जाऊ शकतो. आणि साहेब दुसरी गोष्ट की कोणतेही धोरण कोणतेही टेंडर काढताना त्याला महासभेची मंजुरी असणे गरजेचे असते. ज्यावेळी २०१७ ला आपण जे टेंडर काढले त्यावेळी त्याचे धोरण महासभेने आखले आणि त्या धोरणाप्रमाणे प्रशासनाने त्याची अंमलबजावणी केली आणि त्या प्रमाणे ते टेंडर काढले आणि टेंडर स्टँडीग कमिटीने मंजूर केले आणि त्याप्रमाणे त्या ठेकेदाराने काम चालू केले. त्या ठेकेदारानेने १-२ वर्ष जो काही कालावधी झाला आहे त्या कालावधीमध्ये त्यांनी उत्तम प्रकारे सेवा दिली हे आमच्या उत्तनच्या नगरसेवक सुध्दा एक्सेप्ट करतात. आणि एवढी चांगली सेवा दिल्यानंतर सुध्दा त्या ठेकेदाराला महानगरपालिकेने कॅन्सल केले. त्याचा ठेका रद्द केल कोविडच्या कालावधीमध्ये सुध्दा प्रशासनाने मागिल त्याप्रमाणे त्यांनी बस सेवा दिली. कधीही रात्री अपरात्री रेल्वे प्रशासनाकडून फोन येतो की तुम्हाला वसई वरून गाडी मिळणार आहे. बोरिवली वरून गाडी मिळणार आहे त्या रेल्वे प्रवाशांकरीता तुम्ही बसेस अव्हेलेबल करून द्या.

त्या ठेकेदारांने रातोरात त्या कर्मचा-यांना सुध्दा ती सेवा देऊन रेल्वे प्रशासनाची राज्यसरकारची महानगरपालिकेची सोय केली. आणि असे असताना सुध्दा महानगरपालिकेनी काय केले त्याचा ठेका रद्द केले तसेच एक १५ दिवसापूर्वी आपले एक सन्मा नगरसेवकांने कोरोना काळामध्ये मनपातर्फे किती वस्तू जास्त दरात वस्तू विकत घेतल्या याची त्यांनी पुर्ण कुंडली काढून ठेवली की एक साधन छोटासा तेलाची बाटली छोटीसी बॉटल आणि त्याचा रेट काय आहे आणि महानगरपालिकेने कोविडच्या कालातधीमध्ये रेट जास्त देवून काही जी ईमजन्सीची औषध होती किंवा काही वस्तू लागणार होती. ती वस्तु आपण विकत घेतली. आरोग्य विभागाला कर्मचा-यांना मेडिकलला आणण्याची जबाबदारी त्या ठेकेदाराची होती. आयुक्त साहेब आरोग्याचा ठेका प्रायव्हेट आहे आणि त्या प्रायव्हेट ठेकेदारांचे काम होते त्या कर्मचा-यांना आणणे. परंतु महानगरपालिकेनी त्या ठेकेदाराला सांगितले नाही तर परिवहनच्य ठेकेदाराला सांगितले ते तुमचे तुळशीदास म्हत्रे साहेब बोलले की आंधळ दळत आणि कूत्र पिठ खाते. हे आता आले बघा की ज्या कर्मचा-यांना आणायची जबाबदारी त्या ठेकेदारांची होती आरोग्य विभागाच्या त्याच कर्मचा-यांना महानगरपालिकेने आणले आणि कोणाच्या मार्फत आणले आणि त्याच परिवहनच्या ठेकेदारांनी चांगली सेवा दिली. ह्याबद्दल काय दिले तर त्याचा ठेका रद्द केला. त्याचा ठेका रद्द करण्यामागे आमचे काही दु:ख नाही पण इथे तुम्ही दुस-या ठेकेदाराला पोसत आहेत आणि इथे तुम्ही दुस-या ठेकेदाराला त्रास देत आहेत हे त्याच्यावर सिध्द होत आहे. हाय कोर्टाने डिसीजन काय दिले. हाय कोर्टाने असा निर्णय दिला की तो बस चालवायला तयार आहे का ? त्याने सांगितले मी रेडी आहे प्रशासन म्हणते त्याने जर बस चालवली तर आमची काही हरकत नाही त्याप्रमाणे त्यांना पोलिस प्रोटेक्शन दिले. पोलिस प्रोटेक्शन कोणी दिले तर कोर्टाने आदेश दिला. वास्तविक बसेसची जबाबदारी महानगरपालिकेची आहे. बसेसची मालकी महानगरपालिकेची आहे आणि असे असताना सुध्दा महानगरपालिकेच्या बसेसला कोण अडथळा निर्माण करतो त्या कम्रचा-यांना पेमेंट भेटले नाही ते कर्मचारी आंदोलन करत आहेत आणि त्यांना समजवण्याचे काम प्रशासनाचे होते पण प्रशासन त्यांना समजावू शकले नाही आणि प्रशासनाला दूसरी पण एक जबाबदारी होती. मिरा भाईदरच्या नागरिकांकरिता बस सेवा उपलब्ध करून द्यायला पाहिजे होती. आणि ते लोक उपलब्ध होउु देत नव्हते. आणि म्हणून त्यांना पोलिस प्रोटेक्शनची गरज होती. परंतु प्रशासनाने पोलिसांना पत्रही दिले नाही आणि प्रशासन पोलिसांना सांगायला सुध्दा नाही गेले म्हणजे आपली स्वत:ची वास्तू असताना सुध्दा आपल्या वास्तूचे प्रोटेक्शन महानगरपालिका करू शकली नाही. आणि महानगरपालिका क्षेत्रातील असलेल्या नागरिकांना जी सेवा आपण उपलब्ध करून द्यायला पाहिजे ती सेवा आपण उपलब्ध करून द्यायला पाहिजे ती सेवा आपण उपलब्ध करून दिली नाही आणि म्हणून ती व्यक्ती बस चालू करू शकली नाही. आणि इमेजिएटली दुस-या दिवशी ज्यावेळी कोर्टाने ऑर्डर केली आणि पोलिस कमिशनरने इमेजिएटली त्यांना पोलिस प्रोटेक्शन दिले आणि इमिजिएटली त्यांनी आपली बससेवा सूरू केली. आणि अतिशय उत्तम प्रमाणे बससेवा सुरू केली सगळया कर्मचा-यांना माहित आहे आणि त्यानंतर मुठे साहेबांनी सांगितले की बाबा कोर्टाचा आदेश आहे परंतू कोर्टाचा कोणताही क्लियरकट आदेश नाही की त्याचे तुम्ही टेंडर रद्द करा जर दिडवर्षपर्यंत त्या व्यक्तिने जर चांगली सेवा दिली आणि करोना काळामध्ये पण चांगली सेवा दिलेली आहे हे प्रशासन सुध्दासुध्दा ॲक्सेप्ट करते आणि सगळे नागरिक सुध्दा ॲक्सेप्ट करतात. परंतू त्याचा मोबदला त्याची पाठ थोपटली पाहिजे पण ही पाठ थोपटली नाही त्याचे टेंडर रद्द केले आणि टेंडर रद्द केल्यानंतर प्रशासनाने ताबडतोब दुसरे टेंडर काढले आणि ते ८ वर्षाचे टेंडर काढले. वास्तविक त्या टेंडर मधली जी कंडीशन आहेत की त्यांनी जे धोरण ठरविले आहे त्या धोरणाची परमिशन महासभेकडून घेतली नाही. वास्तविक कोणतेही टेंडर काढताना त्याचे धोरण ठरवताना महासभेने त्याला मंजूरी दिली पाहिजे. परंतु, मंजूरी दिली नाही. मागच्या महासभेने जी आपल्याला मंजूरी दिली होती त्याच्यामध्ये जी.सी.सी. तत्वावरती किंवा एन.सी.सी. विथ व्ही.जे. फंडींग काढण्याकरीता आपण त्यांना धोरण ठरवून दिले होते. परंतु आता

प्रशासनाने ह्या ठरावाच्या विरोधात जाऊन स्वत:चे स्वत: धोरण ठरवून त्यांनी ते टेंडर काढलेले आहे. ॲक्चुअली प्रशासनाला स्वत: धोरण ठरवायचे अधिकार नाहीत ते महासभेला आहेत. आणि महासभेचे अधिकार त्यांनी स्वत: वापरु नये ही चुकीची गोष्ट आहे आणि दुसरी गोष्ट ह्या बसेसची ऑफीशिअली ८ वर्षात त्याची लाईफ आहे. आणि ऑलरेडी ह्या ठेकेदाराने दोन वर्ष ही बससेवा वापरलेली आहे. तर पुन्हा आता ८ वर्ष प्रशासन टेंडर काढू शकत नाही. तरीसुध्दा प्रशासनाने ८ वर्षाचे टेंडर काढले. हे किती चुकीचे केले आहे. म्हणजे एकतर धोरण ठरवायचे काम प्रशासनाचे नाही ते आपले काम आहे. ते अंगावरती घेतले. दुसरी गोष्ट ८ वर्षाचे टेंडर, ॲक्युअली हे टेंडर ६ वर्षाचे असले पाहिजे. कारण २ वर्ष ऑलरेडी त्या ठेकेदाराने युज केले आहेत. तरी ते आपण काढू शकत नाही आणि असे प्रशासनाने चुकीचे काम केलेले आहे आणि दुसरी गोष्ट आता प्रशासन बसे सेवा चालवतोय आणि प्रशासन बस सेवा चालवत असताना त्यांनी कर्मचाऱ्यांना कामावरती ठेवले आता असे कामावरती ठेवले आता कसे कामावरती ठेवले असे ठेवले की कोणाला १३ दिवस, कोणाला १० दिवस, कोणाला १५ दिव. तुम्ही मला सांगा तुमच्या पालिकडे पण लोक काम करतात. तुम्ही त्यांना ३० दिवस कामावर ठेवतात का? ३० दिवस आपण त्यांच्याकडून काम करुन घेतो. परंतु प्रशासनाने त्यांच्याकडून १० दिवस, १५ दिवस कामं करुन घेतली. आणि अशी कुठली रित आहे आपण त्यांना मिनिमम व्हेजेस द्यायला सांगतो आणि आपण त्यांना किती दिवसाचा पगार देतोय. १३ दिवसाचा किती दिवसाचा पगार घेतोय १५ दिवसाला घेतोय. म्हणजे अशाप्रकारे प्रशासन चुकांवरीती चुका करत आहे आणि ह्या चुका बघायचे कोणी तर आपण शेवटी मनपा ही लॉस्टमध्ये चालली आहे आणि उद्या ह्या लॉसला परमिशन कोण देणार याची आर्थिक आणि प्रशासकीय मंजूरी कोण देणार याचा ब्लेम सेटल कोण करणार शेवटी हा विषय पुन्हा महासभेमध्ये येईल पुन्हा स्टॅन्डीगमध्ये येईल, पुन्हा परिवहन समितीकडे येईल, शेवटी येणारच ना. मग त्यावेळी ज्याप्रमाणे परिवहन समिती महासभा धोरण ठरवेल त्या प्रमाणेच प्रशासनाने त्यची अंमलबजावणी केली पाहिजे. त्याशिवाय ती अंमलबजावणी करु शकत नाही. तरी जे टेंडर काढले आहे हे टेंडर चुकीचे काढले आहे. पहिला महासभेमध्ये धोरण फिक्स केले पाहिजे आणि त्यानंतरच याची अंमलबजावणी केली पाहिजे.

मा. उपमहापौर :-

मा. आयुक्त महोदय, याचा खुलासा करावा.

मा. आयुक्त :-

सन्मा. नगरसेवकांनी जो विषय काढलेला आहे त्याच्यानुसार जे आमचे अंडरस्टॅन्डीग आहे त्याच्यानुसार आम्ही कोणतेही प्राधिकरणाचा म्हणजे महासभा पहिली सर्वोत्तम आहे. त्यांचे कोणत्याही अधिकाराचा वापर किंवा अतिक्रमण आम्ही त्याच्यावर केलेले नाही. महासभेचे धोरण २०१८ मध्ये ठरलेले होते. आणि त्याच्यामध्ये स्पष्ट निर्देश होते की, जे महापालिकेच्या हिताचे असेल ते आयुक्तांनी त्याच्यावर निर्णय घ्यावा. तर त्यानुसार जेव्हा हे पहिले टेंडर रद्द झाले तेव्हा मला जे वाटले की, आपल्या महापालिकेच्या हितासाठी आपण NCC + SMF चे टेंडर काढावे. त्या अधिकाराच्या अधीन म्हणजे महासभेच्या अधिकाराच्या अधिन राहूनच आम्ही ते टेंडर काढलेले आहे. मा. नगरसेवक यांनी जे सांगितलेले आहे त्याच्यानुसार आम्ही त्या गाड्या अजून किती चालु करता येतील त्याचा आढावा घेऊन त्या गाड्या चालु करायचा प्रयत्न करु.

जुबेर इनामदार :-

आयुक्त महोदय, तुम्ही नसताना मुठे साहेब असे बोलले, कोविड परिस्थितीमुळे एका सिटवर फक्त एकच प्रवाशी असल्यामुळे पालिकेला परिवहन सेवेमध्ये तोटा दिसून येत आहे. ५० टक्के फक्त बसेस चालु आहेत. प्रवासी संख्या कमी आहे. तोटा का होत आहे? त्याला कारण म्हणजे प्रवासी कमी असल्यामुळे प्रवासी गाड्यांमध्ये कमी बसवले जात असल्यामुळे आपल्याला याचा तोटा होत आहे. आयुक्त महोदय असे तुम्हाला तरी वाटते का? शर्मिला बगाजी आमच्या उत्तनच्या नगरसेविका आहेत.

त्या परिसरातल्या त्या स्थानिक आहेत. सर्वात जास्त फायदेशीर मार्ग तो आहे. सर्वात जास्त प्रवासी तिथून येतात आणि बाकीचे जागेवर आता सध्या परिवहन सेवेचा भरपूर फायदा घेतला जातो हे सगळे काही असताना हे शक्य् आहे का की प्रवासी संख्या कमी असेल आणि एका सिटवर एकच प्रवासी बसवला जातो. साहेब २८ टक्के तोटा हा कुठेतरी चोरी आहे हा माझा आरोप आहे. हा कुठेतरी चोरी सुरु आहे आणि ती चोरी कुठे होते हे साहेब तुम्हाला याच्यातून शोधून काढावे लागेल. यु आर हेड ऑफ द फॅमिली. ह्या चोराला कुठेतरी थांबवावे लागेल. हे आम्हाला परवडणार नाही साहेब.

मा. आयुक्त :-

मुठे साहेबांनी तुम्हाला गोषवारा दिलेला आहे. तो ॲक्चुअली जेव्हा मनपाने स्वत: चालवली त्याच्यामध्ये जी कपात आहे ती त्यांनी सांगितलेली नाही. आणि सोबत आता आपण जे टेंडर अडकाठी केले आहे ते NCC + SMF असल्यामुळे आपल्याला एकही रुपया देण्याची गरज पडणार नाही. काही तरी प्रमाणात रॉयल्टी आपल्याला भरेल.

ध्रुवकिशोर पाटील :-

आयुक्त साहेब, विषय असा होता, आपण सांगितले की, आयुक्तांनी निर्णय घ्यावा. साहेब माझ्याकडे ठराव आहे. त्या ठरावाप्रमाणे आयुक्त यांनी मनपा पदाधिकारी यांच्यासोबत बैठक घेवून निर्णय घ्यावा असे दिलेले आहे. त्याप्रमाणे आयुक्त साहेबांनी मिटींग घेतली होती आणि त्या मिटींगप्रमाणे जे ठरले होते त्याप्रमाणे त्याची अंमलबजावणी झाली पाहिजे अशी फक्त माझी तुम्हाला विनंती आहे. तर त्याच्यामध्ये साहेब तुम्ही जे काढले ते वगळे धोरण काढले आहे. टेंडरमध्ये आणि आपण जे ठरविले आहे ते धोरण वेगळे आहे. तर माझी तुम्हाला विनंती अशी होती की, महासभेच्या धोरणप्रमाणे तुम्ही अंमलबजावणी करा.

मा. उपमहापौर :-

आयुक्त महोदय, ह्या विषयावर जे पाटील साहेब, शर्मिला मॅडम, जुबेरभाई आणि प्रविण भाई जे जे विषय मांडलेले आहेत आणि जे अपले धोरण ठरलेले आहे महासभेमध्ये त्या अनुषंगाने त्याची शहानिशा करुन त्याची अंमलबजावणी करण्यात यावी असे आदेश आहेत.

जुबेर इनामदार :-

माझी तुम्हाला विनंती राहील, ह्या परिवहन समितीसाठी पदाधिकाऱ्यांची कमिटी गठित करुन गटनेता पदाधिकाऱ्यांची कमिटी गठित करुन पुन:च्छ हे प्राधिकरण कसे चालवता येईल त्यावर आपल्याला परत चर्चा केली पाहिजे. आणि त्याचा अहवाल महासभेसमोर ठेवल्यानंतर याचा योग्य निर्णय घेणे.

ध्रुवकिशोर पाटील :-

जुबेरजी हा निर्णय आपणच घेतलेला आहे.

मा. उपमहापौर :-

ऑलरेडी महासभेमध्ये ठराव मांडून निर्णय घेतलेला आहे.

ध्रुवकिशोर पाटील :-

हा निर्णय तुमचाच आहे. तुमची याच्यावरती सही आहे. आणि तुम्ही गटनेते होते. त्यावेळी आपण ठरवले होते की पी.पी. तत्वावरती किंवा NCC + VJF या दोन्ही तत्वावरती त्याच्यावरती कारवाई करावी. परंतु आता हे दोन्ही धोरण बाजूला ठेवून वेगळे धोरण काढलेले आहे. म्हणून माझी अशी विनंती आहे......

प्रशांत दळवी :-

महापौर मॅडम माझे काय म्हणणे आहक की ध्रुवकिशोर साहेब जसे बोलले की ऑलरेडी अगोदर तसा ठराव झालेला आहे. मी ॲग्री आहे. परंतु आता जे इनामदार साहेब जे बोलले त्याही

मताशी मी सहमत आहे. जर पहिल्या ठरावाची अंमलबजावणी करणार नसाल तर आताही पदाधिकाऱ्यांना घेऊन तात्काळ मिटींग बोलवावी.

गिता जैन :-

आयुक्त साहेब आणि उपमहापौर साहेब आपण केव्हा पासून चर्चा करतोय की आता आपली परिवहन सेवा तोट्यात आहे. जगातली कुठलीही परिवहन सेवा नफ्यात चालते पहिला त्याची माहिती काढून घ्या. ही सेवा आहे. हा बिझनेस नाही की ज्याकडून आपल्याला नफा मिळणार. फक्त आपल्याला जो पहिला भर द्यायचा आहे ते हे आहे की, आपण प्रवाशांना इथल्या नागरीकांना किती सुविधा देऊ शकतो. सगळ्यात प्रथम ते आपल्याला बघायचे आहे की किती जास्तीत जास्त सुविधा आपण प्रवाशांना देणार आणि त्यासाठी जो खर्च लागणार त्यामधून पहिले तर किती उत्पन्न होणार आणि आपला डिफरन्स आहे. जे आपल्याला पे करावे लागणार का कारण परत परत मी सांगते की परिवहन सेवा इट इज नॉट द ठेका. बिझनेसमध्ये तर सगळ्यात पहिला आपण का खर्च करतोय की किती तोटा आहे? किती काय आहे आपण का खर्च करत नाही. किती चांगली सेवा आहे किंवा किती खराब सेवा आहे. ॲक्चुअली मुद्दा जेव्हा परिवहन सेवेचा असेल तेव्हा परिवहन सेवेचा हा मुद्दा असतो की चांगली सेवा देतोय की चांगली नाही देत. आपल्याला त्या सेवेत काय सुधार करायचे आहे जेणेकरुन नागरीकांच्या सोयीसुविधेला आपण त्यांना देऊ शकू सगळ्यात पहिली चर्चा ती करा सोयी सुविधा कशी वाढवायची. मग आपण पैशाचा विचार करु. कारण परत परत हे सांगते ही सेवा आहे आणि ही सेवा द्या. दुसरा कोर्टाचा निर्णय आहे. त्याबद्दल आपण कशाला चर्चा करतोय. कोर्टाचा जो निर्णय आहे त्याप्रमाणे आपल्याला फॉलो करायचा आहे आणि त्याची चर्चा नसावी असे मला वाटते. कोर्टाने जो निर्णय दिला आहे. त्याची अंमलबजावणी आपण कशी करु शकतो. ते बघायचे आहे तर आपण त्याऐवजी किती तोटा किती नुकसान किती काय आता आपल्याला ऑलरेडी आपण नविन टेंडरमध्ये जातोय त्यामध्ये अटीशर्ती काय चांगली असावी जेणेकरुन चांगली सुविधा मिळणार. जे आता आपल्याला प्रॉब्लम झाले आहे ते पुढे होणार नाही आणि ध्रुवकिशोर पाटील साहेब सांगतात की, एकाला १० दिवस, एकाला १३ दिवस मग पहिल्या ठेकेदाराने हेच काम केलेले तेव्हा तुम्ही का बोलले नाही. तेव्हाही बोलायचे होते की सगळ्यांना न्याय द्या. सगळ्यांना पूर्ण महिन्याचा पगार द्या. त्यांची बाकीची सगळी ही द्या तेव्हा का नाही बोलले कारण तेव्हा ठेकेदार नव्हता. साहेब हे धोरण एकच असायला पाहिजे. गरीबाला न्याय द्या. प्रवाशांना सुविधा द्या दॅट ईज मेन ऑफ परिवहन सेवा. म्हणजे मुद्दे चर्चा करुन इथे तिथे आपण वेळ घालवण्या ऐवजी आता चांगली सेवा कशी देऊ शकतात त्यावर बोला.

मा. उपमहापौर :-

आयुक्त साहेब, आता जो विषय मांडला होता ध्रुवकिशोर पाटील साहेबांनी, शर्मिला मॅडमने, जुबेर भाईने आणि प्रविण भाईने त्यांचा उद्देश तोच होता की तोटा का होतोय. तोटा का झाला जैन मॅडम हा विषय नव्हता. तोटा का जास्त होतोय हा विषय होता. हयासाठी ऑलरेडी त्यामध्ये आपले धोरण ठरले होते की १२ टक्के पेक्षा जास्त शॉर्टेज येणार नाही. आता ते शॉर्टेज २८ टक्कयांवर गेलेले आहे. विषय तो होता जुबेर भाईचा व ध्रुवकिशोर पाटील साहेबांचा. दुसरा विषय हा होता की, ऑलरेडी महासभेने ठराव मांडलेला होता किंवा आपल्या गटनेत्यांनी बसून धोरण नक्की केले होते त्याचप्रमाणे पुढची कारवाई करण्यात यावी. हे पाटील साहेबांचे निवेदन होते. इव्हन आपले जुबेर भाईचे. तिसरा विषय हा होता की, आपल्या फायद्याचे काम आहे किंवा एरिया आहेत उत्तनच त्यामध्ये तुम्ही गाडी का वाढवत नाहीत. ऑलरेडी मुठे साहेबांनी हे स्पष्ट केलेले आहे की त्यामध्ये जे मागील गाडी चालवत होते त्याप्रमाणे आपण ती गाडी चालवत आहेत. परत तुम्हाला असे वाटत असेल तर आयुक्त महोदयांनी ते शब्द दिलेत की आपण येण्याची दिवशी, मध्येपण गरज पडली तर ते गाडी वाढवू शकतात. आता हा विषय न काढता आयुक्त महोदयांना माझे हे निर्देश आहेत की, जे धोरण आपले

ठरलेले आहे त्याच धोरणा प्रमाणे आपण पुढची कारवाई करण्यात यावी असा तुम्हाला आदेश आहे. ध्रुवकिशोर पाटील साहेब याच्या अतिरिक्त किंवा सभागृह नेते दळवी साहेब याच्या अतिरिक्त तुम्हाला काही बोलायचे आहे?

प्रशांत दळवी :-

नाही. याच्या व्यतिरिक्त काही बोलायचे नाही. परंतु जसे जुबेरजी म्हंणाले आपणही चर्चेमध्ये ध्रुवकिशोर पाटील साहेबांनी जो उल्लेख केला की जो ठराव झालेला आहे त्या ठरावानुसार अंमलबजावणी व्हायला हवी आहे. आणि प्रशासन ती करत नाही तर एकदा प्रशासन आणि पदाधिकाऱ्याने बसले तर कुठे बिघडते आहे. एकदा प्रशासन आणि पदाधिकाऱ्याने परत एकदा बसा. त्यावर चर्चा विनिमय करा आणि त्यातून चांगला मार्ग काढा अशी आपणांस विनंती आहे.

मा. उपमहापौर :-

ठिक आहे. गरज पडली तर प्रशासन आणि लोकप्रतिनिधी एकत्र बसू या.

निलम ढवण :-

मी काय म्हणते की जर आयुक्त साहेब या संदर्भात योग्य निर्णय घेतात कारण बरेच असे विषय झाले की आपण आयुक्त साहेबांना अधिकार दितोय आणि आता देखील आयुक्त साहेब ह्या शहराच्या विकासाच्या दृष्टीने किंवा परिवहन कशी चांगली चालेल या संदर्भात विचार करुन ते निर्णय घेत असतील तर आपल्याला परत बैठक आणि हे घ्यायचे काय कारण आहे. शेवटी निर्णय तेच घेणार आहेत.

मा. उपमहापौर :-

ढवण मॅडम, गरज पडली तर आपण घेवू.

प्रशात दळवी :-

जुबेर साहेब, हे म्हणत आहेत बैठक घ्यायची गरज काय?

मा. उपमहापौर :-

सभागृह नेता साहेब गरज पडली तर आपण घेवू.

प्रशांत दळवी :-

हे म्हणतात ना गरज काय? इनामदार साहेब बोलले होते बैठक घ्यायची.

ध्रुवकिशोर पाटील :-

ठिक आहे. त्यांना जर गरज नसेल तर मिटींग नको. परंतु माझी अशी विनंती आहे . जसे निलम ताई बोलल्या आयुक्त साहेब खरोखर चांगले काम करतात. आयुक्त साहेब खरच चांगले काम करतात त्याबद्दल काही वाद नाही. आयुक्त साहेब कधी नव्हे ते अशा लोकांची बदली केलेली आहे आणि त्याचे क्रेडीट इतर लोक घेत आहेत की माझ्यामुळे बदली झाली असे फेसबुकवरती आणि व्हॉट्स-ॲप वरती आणि सोशल मिडीयावर सांगतात.

निलम ढवण :-

असे कोण म्हणत आहेत?

ध्रुवकिशोर पाटील :-

तुम्ही सोशल मिडीया बघा. इतर लोक क्रेडीट घेत आहेत. माझ्यामुळे ह्यांची बदली झाली. त्यांनी त्यांचे काम केले आहे.

मा. उपमहापौर :-

पाटील साहेब, तो विषय राहू द्या आता.

ध्रुवकिशोर पाटील :-

मी परिवहन बद्दल बोलतो महापौर मॅडम की ज्याप्रमाणे आमदार गिता मॅडम आपल्याला बोलल्यात की, सगळ्यांना पगार दिला पाहिजे. १०० टक्के सगळ्यांना पगार दिला पाहिजे यात दुमत

नाही. मॅडम आपणच आंदोलनाची धमकी दिली होती. आपणच पत्र दिले होते की, ह्यांना पगार नाही भेटला नाही तर मी आंदोलन करणार. आणि शेवटी यांना पगार अजून भेटलाच नाही. ॲक्युअली तुम्ही आंदोलनच केले पाहिजे होते. पण तुम्ही ते आंदोलन पुन्हा मागे घेतले हे चुकीचे आहे मॅडम. माझी तुम्हाला अशी विनंती तुम्ही ते आंदोलन करायला करायला पाहिजे आणि त्यांना पगार दिला पाहिजे.

निलम ढवण :-

तुम्ही याच्यात पी.एच.डी. घेतलेली आहे. मला माहित आहे ध्रुवकिशोरजी तुम्ही परिवहनमध्ये खुप पी.एच.डी. केलेली आहे. त्यामुळे तुम्ही चर्चा काही मागे घेणार नाही.

मा. उपमहापौर :-

सचिव महोदय, पुढचा विषय घ्या.

(सदर विषयाचा आढावा घेण्यात आला.)

नगरसचिव :-

प्रकरण क्र. ५७, कोविड १९ ने बाधित रुग्णांवर केलेल्या उपचाराबाबत व झालेल्या खर्चाबाबत आढावा घेणे.

मा. उपमहापौर :-

वाघमारे साहेब, तुम्ही खुलासा करावा.

संभाजी वाघमारे (उपायुक्त) :-

मा. महापौर मॅडम, कालपर्यंत आपली परिस्थिती जी आहे कालपर्यंत आपण १ लाख ५५ हजार ५ स्वॅब टेस्ट केल्या होत्या. त्यामध्ये पॉझिटीव्ह रुग्ण आजपर्यंतचे २५ हजार ९२४ आहेत. बरे झालेले २४ हजार ६७६ आणि ॲक्टीव्ह पेशंट जे आपल्याकडे आहेत ते ४७६ ॲक्टीव्ह पेशंत आहेत आणि ६९२ आपल्याकडे मृत्यु झालेले आहेत आणि आपण मागच्या दोन महिन्यांमध्ये जर आपण विचार केला तर रुग्णांची संख्या कमी झालेली आहे. त्यानुसार आपण ज्यावेळेला ऑक्टोंबर ऐंड पर्यंत आपल्याकडे ५४६ आपल्याकडे स्टाफ आपण कोविडसाठी वापरलेला होता. त्यामध्ये आपण ती संख्या कमी केली ती आता ३४७ स्टाफ आपल्याकडे आहे. म्हणजे जवळपास आपण २०० चा स्टाफ आपण याच्यामध्ये कमी केलेला आहे. आजपर्यंत आपला जो खर्च वगैरे याच्यामध्ये झालेला आहे. नंतर आपण ज्यावेळेला कोविडची संख्या कमी झाली त्यासोबतच आपण ज्या कोविड फॅसिलीटी कमी केलेल्या होत्या. त्यामध्ये आपण एक क्वारंटाईन सेंटर तात्पुरते आपण त्यामध्ये बंद केलेले आहे. गोल्डन नेस्टचे सी.सी.सी. होते तेही आपण बंद केले केलेले आहे. त्यामुळे सी.सी.सी. मुर्ध्याचे जे आहे तिथे क्वारंटाईन समोर सी.सी.सी. असे आपण चालु केलेले आहे. त्यानंतर मिनाताई ठाकरेचे आपण जे डी.सी.एस.सी. चालू केले होते ते पण आपण बंद केलेले आहे. दोन दिवसापासून आपण आता प्रमोद महाजन हे डी.सी.एस.सी. ते आपण बंद केलेले आहे. मग आता आपल्याकडे जे मध्यम स्वरुपाचे जे सिमटम्स होते आणि गंभीर स्वरुपाचे मग ते आपण एक टेंभा आणि आप्पासाहेब धर्माधिकारी येथे करतोय. त्यामुळे हे आपण आता कमी केलेले आहे आणि आजपर्यंतचा झालेला जो खर्च आहे तो ७३ कोटी ३३ लाख ८ हजार १७० आणि याच्यामध्ये आपल्याला शासनाचे जे अनुदान प्राप्त झालेले होते १९ कोटी ७३ हजार एवढेसे अनुदान आपल्याला प्राप्त झालेले आहे.

प्रविण पाटील :-

महापौर साहेब, आपल्याला विनंती आहे की, कोविडचे जे आपले खाजगी रुग्णालये आहेत त्याच्यामध्ये आपण ऑडीटर ठेवलेले होते. त्या ऑडीटरच्या माध्यमातून त्यांनी जी रुग्णांवर जी बिले लादली होती त्याच्यामध्ये ऑडीटरने जो फरक दाखवलेला आहे तो फरक फॅमिली केअर हॉस्पीटल, तुंगा हॉस्पीटल असे अनेक हॉस्पीटल आहेत त्यांनी आपल्या हॉस्पीटलचे खाजगी ऑडीट करून बऱ्याच मोठ्या प्रमाणात फरक दर्शविलेला आहे. थोडक्यात सांगायचे झाले तर फॅमिली केअर हॉस्पीटलचे एकंदर बीलची अमाऊंट होती ती ३ कोटी ६८ लाखाची होती आणि एम.बी.एम.सी. च्या ऑडीटरने

त्याच्यावर ऑडीट केल्यानंतर त्याचे बील होते २ कोटी ५८ लाख. त्यात तब्बल १० लाखाचा फरक मनपाच्या ऑडीटरने त्यांना दाखवलेला होता. त्याच्या पुढे जाऊन तुंगा हॉस्पीटलचा जवळ जवळ ८५ लाखाचे बील झाले होते. त्याच्यानंतर ६५ लाखाचे एम.बी.एम.सी. ऑडीटरने त्यांना फरक दाखवला जवळजवळ २२ लाखाचा फरक तर एकंदर ही ५९ लाखाची फॅमिली केअरची वसुली तर ह्या ज्या डिफ्रंट उमाऊंट आहेत. ज्या मनपाच्या ऑडीटरने दिलेल्या जवळ जवळ 22 लाख 69 लाख त्याच्यानंतर 1 लाख अशा विविध शालोम हॉस्पीटल वगैरे आहेत त्याची वसुली किती झालेली आहे ती जरा सविस्तर सांगावी आणि जो फरक दाखवलेला आहे तो फरक वसुल केल्यानंतर त्या हॉस्पीटलवर मनपाने जी जादाची बिले दिलेली आहेत त्या हॉस्पीटलने त्याच्यावर मनपाच्या कायद्या अंतर्गत काही कारवाई करता येईल का? प्रशासनाने त्याचा खुलासा करावा.

संभाजी वाघमारे (उपायुक्त) :-

सन्मा. सदस्य आपण आज कोविडचे जे पथके नेमलेली आहेत आणि त्यांनी जे ऑडीटमध्ये एक्सेस बील जे लावलेले होते त्या संदर्भात दोन तीन आढावा बैठका पण घेतलेल्या होत्या. कमिशनर साहेब, महापौर मॅडम, यांनी याबाबत आम्हाला निर्देश वगैरे दिले होते. त्यानुसार आता जे सध्याची बाकी आहे त्याच्यामध्ये हॉस्पीटलने ती परत करायला सुरुवात केलेली आहे. फॅमिली केअर हॉस्पीटलचे आपल्याकडे 42 लाख रु. होते. काल आपण नोटीसा काढल्या आणि रिव्हयू जो घेतला होता त्यानुसार आता फॅमिली केअर हॉस्पीटलकडे 31 लाख 17 हजार 91 रुपये हे पेशंटला परत करणे बाकी आहे. तुंगा हॉस्पीटलचे 22 लाख होते. ते आता 18 लाख 86 हजार 340 रुपये आहेत. व्होकार्ड हॉस्पीटलकडे 1 लाख 78 हजार 302, मेडीटेक हॉस्पीटलकडे 16,600, धन्वंतरी हॉस्पीटलकडे 45 हजार 330 रुपये अशा एकूण रक्कमा बाकी आहेत. आणि हॉस्पीटलला आपण सुचना दिलेल्या आहेत की ते त्वरीत आपण पेशंटला रिफंड करावेत आणि ते रिफंड केले नाही तर तुमच्यावर कारवाई करण्यात येईल.

प्रविण पाटील :-

एकंदर हे पेशंटने डिस्चार्ज घेवून साधारणपणे याच्यामध्ये 3 ते 4 महिने आणि आपला ऑडीटरचा रिपोर्ट देऊन जवळ जवळ 2 ते 3 महिने झाले. डॉक्टर साहेब आपण याच्यानंतर महापौरांच्या अध्यक्षतेखाली एक आढावा बैठक घेतली. सगळ्या पदाधिकाऱ्यांची त्यावेळेला ती बैठक होऊन तब्बल दिड महिना झाला. ही अमाऊंट आहे जी जवळ जवळ आता तुम्ही सांगा, फॅमिली केअर हॉस्पीटलचे सांगतो. 31 लाखाची अमाऊंट तुम्हाला जर रिफंड करायची असेल तर 31 लाखामध्ये माझ्या मते जवळ जवळ प्रत्येक पेशंटच्या मागे एक दिड लाख किंवा 50 हजार 60 हजार अशाप्रकारे सर्वसामान्य कुटूंबातले आहेत तर ह्याच्यावर वसुली किंवा त्याच्यावर कंट्रोल आपल्या महापालिकेचा नाही. उपायुक्त साहेब, तुम्हाला विनंती आहे की जर ही वसुली नसेल होत तर तुम्ही त्याच्यावर काय कारवाई करणार आहात आणि मुळात ह्यांनी जो फरक दिलेला आहे त्याच्यावरही काय कारवाई करणार आहात. एकंदर हा जो केलेला मोठ्या प्रमाणात भ्रष्ट्राचार आहे. ह्या हॉस्पीटलच्या माध्यमातून मा. आमदार प्रताप सरनाईक यांनी वेळोवेळी आयुक्तांनी भेट घेवून सांगितले होते. त्यावेळेला ऑडीट नेमले नव्हते. त्यावेळोल संशयास्पद बघत होते. ह्या डॉक्टरांच्या माध्यमातून किंवा त्या डॉक्टरांच्या माध्यमातून किंवा हॉस्पीटलच्या माध्यमातून आपल्या शहरातील सर्वसामान्य कोविड आजारामुळे आपल्या सर्वसामान्य लोकांची लुट होत आहे. त्याच्यानंतर हे प्रत्यक्षात सिध्द झालेले आहे. सिध्द झाल्यानंतर तरीदेखील आपण सवुलीच्या मागे लागत नाही. डॉक्टर साहेब गेल्या 2 ते 3 महिने झाले आपण ही वसुली करु शकत नाही. सर्वसामान्य लोकांनी कुठे जायचे.

जुबेर इनामदार :-

आयुक्त महोदय, खरतर हा विषय खर्चाचा होता. कोरोना काळामध्ये झालेला खर्च वाघमारे साहेब, तुम्ही किती सांगितले 73 कोटी एकत्र खर्च झालेला आहे.

संभाजी वाघमारे (उपायुक्त) :-

73 कोटी 33 लाख 8 हजार 170 रुपये.

जुबेर इनामदार :-

हा खर्च कोरोनाचा पडला. म्हणजे 18 मार्च, आयुक्त महोदय, महाराष्ट्रामध्ये महाराष्ट्र बंद करण्यात आला. ह्या राज्याचे मा. मुख्यमंत्री मा. उद्धवजी ठाकरे साहेबांनी 18 मार्च रोजी घोषीत केले की, महाराष्ट्र आम्ही बंद करतोय. म्हणजे आपली कोरोनाची धावपळ सुरु झाली आणि 22 मार्च रोजी मा. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी हा देश पूर्णपणे लॉकडाऊन करण्याचे घोषीत केले आणि महापालिकेचे कामकाज सुरु झाले. साहेब त्या काळामध्ये आम्ही पालिकेला मुभा दिली की तुम्हाला जे काही योग्य तेव्हा तत्कालीन आयुक्त डांगे साहेब होते. तुम्हाला काय योग्य खर्च करायचा आहे तो तुम्ही करा. जिथे तुम्हाला खर्च करायची गरज असेल तिथे तुम्ही पैसे खर्च करा. मात्र या कोरानाच्या लढाईत मागे पडू नये, कमी पडू नये मुभा मनपाला देण्यात आली. कुठे काही चुकले नाही. चुकले हा विषय येणाऱ्या काळामध्ये साहेब जे काही केले असेल कमी जास्त तर ते समोर येणार आहे. मात्र माझी तुम्हाला एक विनंती आहे साहेब ह्या विषयावर साहेब आमच्याकडे आयुक्तांच्या बदल्या एकदम झटपट होतात. काय सांगता येत नाही. आज आयुक्त तुम्ही आहात. उद्या असणार नसणार हे सांगणे कठीण झाले. मात्र कमीत कमी साहेब तुम्ही तुमच्या काळामध्ये सुध्दा आजच्या परिस्थितीमध्ये सुध्दा तुम्ही तशी टिपणी करुन ठेवा की ह्या परचेसचे ऑडीट झाले पाहिजे. एक्स्पेंडटिचर ऑडीट बोलत नाही. साहेब मी पर्चेस ऑडीट म्हणजेच ज्या ज्या वस्तुंना विकत घेण्यात आलेले आहे, जिथे जिथे गरज लागली क्वारंटाईन सेंटरमध्ये, आरोग्य सेवेमध्ये, आरोग्य सेवेचे डी.सी.एच., जितके काय आपण हॉस्पीटल ओपन केले आहेत, सेंटर ओपन केले आहेत. त्या प्रत्येक जागेवर लागलेल्या वस्तुसाठी तुम्ही परचेस ऑर्डरवर ऑडीट करायचेच तुम्ही अशी साहेब टिपणी आता पासून तयार करुन ठेवा. कारण साहेब 100 टक्के याच्यामध्ये कोण कारणीभूत निघेल तो नंतरचा विषय आहे. बाकी काही आमच्या निर्देशनास आलेले विषय आहेत. ज्या वस्तुंच्या किंमती ज्या होत्या त्यांना दुप्पट पैसे देवून विकत घेण्यात आलेले आहे. म्हणून साहेब आमची प्रशासनाला विनंती आहे आज खरं तर ह्या विषयावर भाषण करणे किंवा काही बोलणे आक्षेप करणे हे योग्य नाही. कारण जोपर्यंत आम्हाला त्यांचे पुराव्यासहीत तुमच्या सोबत बसत नाही, तुमच्यासोबत बसू किंवा जो कोणी आयुक्त असेल त्यांच्यासमोर बसू. कमीत कमी आम्हाला तुमच्याकडून अपेक्षा आहेत. तुम्ही एक डॉक्टर आहात. तुम्ही ते काही केले, तुम्ही चांगल्या मनाने काम केले असेल साहेब आणि करत आहात. मात्र साहेब ज्या प्रशासकीय पध्दतीने ह्या त्या चुका झालेल्या आहेत त्याच्यामध्ये काय भ्रष्ट्राचार झाला असेल तो उघड पडेल. म्हणून माझी तुम्हाला विनंती आहे साहेब परचेसचे ऑडीट हा एक पार्ट असावा तुमच्या पूर्ण कामकाजामध्ये. धन्यवाद.

अनिल सावंत :-

उपमहापौर साहेब, धन्यवाद. दोन तीन मुद्दे आहेत. प्रथम मी आयुक्तांना धन्यवाद देईन. आयुक्त, डॉक्टर आणि त्यांचा सर्व मेडीकल स्टाफ ते मिरा भाईंदरमध्ये कोरोना काळात त्यांनी चांगल्याप्रकारे परिस्थिती हाताळलेली आहे. खर्चाचा वगैरे विषय आहे तो येणाऱ्या काळामध्ये त्याचे ऑडीट होईल. दुसरी गोष्ट आयुक्त साहेब, या कोरोना काळामध्ये आपण काही प्रायव्हेट हॉस्पीटल्सना कोविड हॉस्पीटल म्हणून मान्यता दिलेली होती. आता कोरोनाचा प्रार्दुभाव कमी झालेला आहे. आपण आपले कोविड सेंटर बंद करत आहोत. तर ह्या ज्या छोट्या छोटया हॉस्पीटलवाल्यांना जी परवानगी दिलेली होती त्या हॉस्पीटलमुळे काही भागांमध्ये रेसिडन्स एरियामध्ये दिलेली होती. त्यामुळे लोकांनी बऱ्याचशा तक्रारी केल्या. पण त्याच्यावर कारवाई झाली नाही. फॉर एक्झाम्पल एव्हरशाईन कॉम्प्लेक्स, मिरारोड त्याच्या बऱ्याच तक्रारी झाल्या. तरीसुध्दा कारवाई झालेली नाही. तर आता ज्यावेळी आपण आपले कोविड सेंटर बंद करत आहोत. तर आता ह्या प्रायव्हेट हॉस्पीटलची सुध्दा तशी काय कोविड हॉस्पीटल म्हणून गरज नाही. ती सुध्दा बंद करण्यात यावी ही माझी विनंती आहे. दुसरी गोष्ट आयुक्त साहेब कोविड व्हॅक्सीनचा स्टॉक मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये आलेला आहे. उद्या

त्याची सुरुवात होणार आहे. बऱ्याच ठिकाणी सुध्दा सोशल मिडीयावर प्रेसमध्ये कोणाकोणाला तुम्ही व्हॅक्सीन देणार आहात. मी साधारण माहिती घेतली तर आपला जो मेडीकल स्टाफ आहे त्याला फ्रंट फेजमध्ये आपण व्हॅक्सीन कराल. 6 हजार 300 जवळ पास मेडीकल स्टाफ आहे. ज्यांची आपण नोंदणी केलेली आहे पण कंसेंट घेतलेला नाही आणि त्याच्यामध्ये आपले जे सफाई कामगार आहेत जे जास्त रिस्कमध्ये ह्या कोविड काळामध्ये त्यांनी काम केलेले आहे आणि जास्त रिस्कमध्ये आहेत. आतासुध्दा जो कचरा उचलला जातो त्याच्यामध्ये सुध्दा बऱ्याच वेळेला मास्क असतात, हॅन्ड ग्लोज असतात. तर त्या सफाई कामगारांचा व्हॅक्सीन देण्यामध्ये त्यांचा अंतर्भाव करण्यात यावा आणि ह्या कोरोना लसीबाबत लोकांमध्ये एक संभ्रम आहेत तो दूर करावा. म्हणजे आपला मेडीकल स्टाफने तर 100 टक्के ते व्हॅक्सीन घेतलेले पाहिजे आणि त्यासाठी जर शक्य असेल तर लोकप्रतिनिधींनी पुढे येवून त्याची सुरुवात करायला पाहिजे. म्हणजे जे आपल्याला सोशल मिडीया किंवा इतर ठिकाणी ऐकले जाते. अरे पहिले तो नगरसेवकोको बोलो पहला लेने के लिए, तर लोकप्रतिनिधींना जर त्याच्यामध्ये प्रोव्हिजन असेल एक दुसऱ्या लोकप्रतिनिधीला ते घेउुन लोकांच्या मनातील संशय दूर केला गेला पाहिजे आणि हे व्हॅक्सीन 100 टक्के सक्सेसफुल करायला पाहिजे. माझी यासाठी पूर्ण तयारी आहे. जर लोकप्रतिनिधींना तुम्ही देऊ शकत असाल तर I Will be the first person to take the vaccine to creat the confidence medical staff and other population. Thank u Sir.

निलम ढवण :-

मी पण आहे.

मा. उपमहापौर :-

सावंत साहेब, तुम्ही जे शेवटचे वाक्य बोलले त्याबद्दल महानगरपालिकेतर्फे आणि लोकप्रतिनिधीतर्फे तुमचे मनापासून अभिनंदन .

अनिल सावंत :-

धन्यवाद.

निलम ढवण :-

मी पण व्हॅक्सीन घ्यायला तयार आहे.

राजीव मेहरा :-

महापौर मॅडम, आपके परमिशन से बोल रहा हू। लास्ट टाईम मैने एक इश्यू किया था। सॅनिटाईजींग इनफॉम का उसमे कुछ डिटेल्स निकाली है। हमारे यहॉ कोविड 22 मार्च को डिक्लेअर होता है। कोविड का डिफ्लेक्शन होता है जनता कर्फ्यु लगता है। उसके बाद मे लॉकडाऊन होता है। लेकीन एक पत्र मेरे पास आया है दि. 06/03/2020 उस वक्त महापालिका मे भी कोविड की तयारी जस्त शुरु की थी और यह शिफारीश पत्र है प्रभाग निधी कोविड के लिए युज करने की और उसमे किस साल का 2019-20 या 2020-21 का है। वो भी मेन्शन नही है। कोई भी मिटींग नही और प्रभाग निधी आप देने वाले हो या नही, यह भी फायनल नही हुआ।

मा. उपमहापौर :-

मेहराजी आपका कहने का सवाल क्या है?

राजीव मेहरा :-

दि. 06/03/2020 को यह पत्र कैसे आया? मै आपको पत्र पढकर सुनाता हू। और पालिका फंड से कैसे दिया गया। जबकी प्रोव्हिजन ही नही थी। मा. आयुक्त विषय साजी. आय.पी. प्रभाग समिति सदस्य यांचा निधी कोविड-19 च्या कामासाठी वापरणेबाबत. यह दि. 06/03/2020 का लेटर है। महोदय, वरील विषयान्वये श्री. साजी.आय.पी, प्रभाग समिती सदस्य यांनी त्यांचा प्रभाग निधी कोविड-19 च्या कामासाठी वापरणेबाबत मागणी केलेली आहे तरी श्री. साजी.आय.पी. प्रभाग समिती सदसय

याची निधी कोविड 19 च्या कामाकरिता वापरणे शिफारस आहे. 6.3.2020 जब सेंट्रल गव्हरमेंट स्टेट गव्हरमेंट वाली कोई कूछ नही आता था तो यह लेटर कैसे दिया गया और उसमें कोनसे इयरकी निधी है यह लेटर है में आपको दिखा रहा हूँ ।

मा. उपमहापौरः-

ठिक है उसके बारे में प्रशासन देखरेख करके उसकी जाचपडताल कर लेगी ।

राजीव मेहराः-

मा. उपमहापौर साहेब यह मैने एक महिने पहले जवाब मांगा था अब तक जवाब नही मिला है । इसलिए वापीस मुझे बोलना पड रहा है । एक तो पैसे का मिसयूज हूवा है वो तो छोड दो लेकीन यह मतलब करप्शन फायनाशियल करप्शंन और मिसयुज ऑफ पॉवर ॲन्ड पोस्ट तिसरी लिस्ट वो जो आपने सॅनिटायझिंग मशिन दिया है बहोत अच्छा काम किया । रिलेटिव्ह लोगो को दिया चलो ठिक है बाकी 200 लोग नाराज हो गये वह भी ठिक है लेकीन उसके उपर अपना स्टिकर लगाते बाटना पालिका के सिंबॉल के साथ सिलेक्टव्ह लोगो को एक वॉर्ड में सचिव साहबसे पूछीए यह जायज है क्या ? क्या यह लिगल है या इलिगल है अगर इलिगल है तो इन लोगो पे क्या कारवई की जायेगी और इसमें किसने दिया स्टीकर मेंने पूछा है स्टीकर किसने लगाया मेरे को एक महिना हो गया जबाब नही आया है । क्या ऐसेही कारभार चलेगा सर कोविड आने से पहिला लेटर यह तो अंतरयामी हो गये ।

मा. उपमहापौरः-

उसमें आवक जावक क्र. है और कौनसी तारीख को दिया ।

राजीव मेहरा :-

दि. 6-3-2020

मा. उपमहापौरः-

वह तो लेटरकी तारीख है ।

राजीव मेहराः-

यह आरोग्य डिपार्टमेंट का है और लिखा कमिशनर साहब को है कमिशनर साहबका इनवर्ड का स्टॅम्प भी इस पर नही है ।

मा. उपमहापौरः-

ठिक है मेहरा जी आपके दो सवाल थे एक तो यह भी लेटर सबसे पहले दिया गया और मतलब किसी को जानकारी उसके बारे मै है या नही ।

राजीव मेहराः-

मुझे तो डाऊट होता है क्या यह सिग्नेचर मा. सभापती का है या किसीने मॅनेज किया है ।

मा. उपमहापौरः-

ठिक है मेहराजी मैं वही कह रहा हूँ इसके लिए प्रशासन देखरेख कर के जॉच पडतल करके उसके उपर कारवाई करेगी और दुसरा जो आपका अभी तक जबाब नही मिला है स्टिकर किसने लगाया प्रशासन से आदेश है की कृपया करके वो जल्द से जल्द मेहराजी को संपूर्ण जवाब दे या उसका खुलासा जल्द से जल्द करके उनको दे दे अगली महासभा आने के पहले मेहरा जी असंतृष्ठ नही रहने चाहिए यह दर्खवास है ।

राजीव मेहराः-

यह प्रभाग निधी का निधी देने का फैसला कब हूवा था ? मुझे वो डेट भी चाहिए कौनसी मिटींग में हूवा था ।

मा. उपमहापौरः-

फैसला वो उनका व्यक्तिगत होगा हर कोई लोकप्रतिनिधी अपना नगरसेवक निधी प्रभाग निधी..............

राजीव मेहराः-

हमको तो बताया गया था प्रभाग निधी नही मिलती बाकी है । हमको यह बताया गया था कोविड के हिसाबसे इस साल प्रभाग निधी..............

मा. उपमहापौरः-

वो तो मध्य अकाऊटींग इयर के अंदर प्रशासनके तरफसे निर्देश आया था की, प्रभाग निधी, नगरसेवक निधी उपलब्ध नही होगी ।

राजीव मेहरा :-

यहा आपके प्रेझेन्समे और महापौर के प्रेझेन्स मे यह पंग दिए गये थे महापौरके कॅबिन मे ।

मा. उपमहापौर :-

ठिक है मेहराजी आपको खुलासा दिया जाएगा प्रशासन की और से । प्रभातताई बोला.

प्रभात पाटील :-

नमस्कार, थॅक्यु. बोलायला दिल्याबद्दल. सगळ्यात महत्वाचे म्हणजे कोविडचा विषय आहे आणि संपूर्ण देशानेच म्हणा, राज्याने म्हणा. मिरा भाईंदर महापालिकेने चांगल्याप्रकारे कोविड हाताळला. म्हणजे ज्या प्रमाणामध्ये देशामध्ये हाणी झाली, जिवित हाणी झाली ते निश्ति प्रमाणे आपल्या देशात आणि राज्यात झाली नाही आणि आपल्या मिरा भाईंदर शहरामध्ये सुध्दा झाली नाही. याचे संपूर्ण श्रेय लोकप्रतिनिधीबरोबर मी म्हणेन की, आयुक्तांना जास्त दिले पाहिजे. कारण ते स्वतः पेशाने डॉक्टर असल्यामुळे आणि प्रशासकीय अधिकारी असल्यामुळे सुध्दा दुहेरी फायदा ह्या मनपाला झाला. म्हणून मी पहिल्यांदा त्यांचे आभार मानेन त्यांचे अभिनंदन करेन. आणि दुसरे अभिनंदन मी करेन ज्यांना आपण सगळेच विसरतो की काय असे मला वाटते आणि ते म्हणजे आपले सफाई कामगार. साहेब त्यांना मी असे म्हणेन की त्यांना आपण फार काही देऊ शकलो नाही. तर त्यांना रांगेत उभे करुन एक एक गुलाबाचे फुल नक्की त्यांना द्या. कारण त्यांनी ह्या कोविडच्या काळामध्ये मग ते तुमचे फायरब्रिगेडचे फायरमन असतील त्यांनी सुध्दा औषध फवारणी ह्या शहरामध्ये खुप चांगल्याप्रकारे केली. झाडू कामगारांनी झाडू मारले, कचरा उचलणाऱ्यांनी कचरा उचलला, डंपरवर काम केले. जेव्हा आपण तोंडाला मास्क बांधून दारे खिडक्या बंद करुन जेव्हा आपण घरात बसलो होतो कोविडला घाबरुन तेव्हा हे लोक योध्द्यासारखे रस्त्यावर लढत होते. ही गोष्ट आपल्याला दुर्लक्षित करुन चालणार नाही. त्यामुळे मी असे म्हणेण की, खरच आपण त्यांच्यासाठी काहीतरी करु शकलो तरी गुलाबाचे फुल निश्चितपणे आपल्याकडून त्यांना गेले पाहिजे. मी मुळ मुद्यावर येते. कोविडच्या काळामध्ये आपण आपल्या मनपाचे बरेचसे कर्मचारी गमावले आणि असाच एक कर्मचारी आपला मला वाटते प्रमोद पाटील जो आता महिना दिड महिना पूर्वी आपला परमनंट कर्मचारी राईचा होता. तो आपण गमावला आणि त्याच्या निधनाची हालत इतकी खराब झाली की अक्षरशा प्रभागातले म्हणजे प्रभाग समितीमधले लोक त्याच्यासाठी सैरावैरा धावत होते की त्याच्यावर डोंगरा एवढा खर्च झाला आहे आणि त्याची सिरियस कंन्डीशन आहे. व्होकार्ड हॉस्पीटलमध्ये त्याचे उपचार थांबवले होते कारण त्याचे अतिरिक्त झालेले बील द्यायला त्यांच्याकडे पैसे नव्हते आणि म्हणून तो स्टाफ वेड्यासारखा धावत होता सगळीकडे की, त्याच्यासाठी आपण काही तरी करु शकू. आजही त्याच्या नावे 15 लाखाचे बील आहे. आयुक्त म्हणून की आपला एक कर्मचारी मृत्युशी झुंजतोय, मृत्यु शय्येवर आहे आपण त्याच्यासाठी काहीही करु शकत नाही. आणि त्याच्या पलिकडे जाऊन मी तुम्हाला असे सांगेन की, मेल्यानंतरही त्याच्या यातना संपत नाहीत. त्याचे 15 लाख रुपये हॉस्पीटलमध्ये पडून आहेत आणि त्याचा परतावा त्याला दिला जात नाही. ही कुठली गोष्ट आहे. ही आपल्या महापालिकेला शर्म

आणणारी गोष्अ आहे. एक तर त्याचा लाखामोलाचा जीव गेला आणि त्याच्या पश्च्यात त्याच्या पालन पोषणाची जबाबदारी कोणीही घरात घ्यायला नाही आहे. त्याला तो अडकलेला पैसा सुध्दा आपण त्याला देऊ शकत नाही. ही अतिशय गंभीर बाब आहे. त्याच्यासाठी आपल्या स्टाफचे कौतुक आहे. त्यांचे पण की ते वेड्यासारखे धावत होते कर्मचारी आमच्या सारखे नगरसेवकांना पण त्यांचे फोन आले. मॅडम काही तरी करा, काय करु शकतो की त्याच्यावर उपचार करण्यासाठी आता पैसेच राहिलेले नाहीत. त्यांनी कर्ज काढले आहे. बायकोचे दागीने विकले आणि एवढे करुनसुध्दा त्याचा लाखामोलाचा जीव त्याला मुल्य नाही. तो त्याने गमावलेला आहे आणि आजही त्याच्या पैशाचा परतावा आपल्याला होत नाही. मगाशी परताव्याच्या गोष्टी झाल्या. व्होकार्डवर किती बील आहे आणि ह्याच्यावर किती आहे आणि त्या हॉस्पीटलवर किती आहे. बऱ्याच हॉस्पीटलची नावे घेतली पण आपला एक कर्मचारी साधा कर्मचारी आपला त्याच्यात अडकलेला आहे. साहेब दु:ख दुर करायला जाण्याऐवजी आपल्या जवळ काय दु:ख आहे याच्याकडे लक्ष देणे खुप महत्वाचे आहे. हे छोटे लोक आहेत त्या छोट्या लोकांची दु:ख खुप मोठी आहेत. आणि म्हणून तुमच्या सारख्या लोकांनी त्याच्यामध्ये लक्ष घातले पाहिजे. हा एक विषय दसरा विषय असा आहे की, मी तुमच्याशी ह्या संदर्भामध्ये पत्रव्यवहारा केला होता. मी स्वत: तुम्हाला भेटले पण होते. त्याच्यानंतर आमदार साहेब म्हणजे माजी आमदार नरेंद्र मेहता साहेब आणि मी आमचे भाजपचे काही लोक आम्ही आपल्याला भेटलो होतो ह्या संदर्भात. तो प्रश्न होता की बाळासाहेब ठाकरे मैदानामध्ये जे इतके मोठे कोविड शेड टाकून ठेवलेले आहे. ते किती महिने झाले मला वाटते 13 की 14 करोडचे ते टेंडर आहे. आणि ते कोविड वाढले किंवा व्याप्ती वाढले कोविडची म्हणून आपण ती व्यवस्था केली होती. तुम्ही आम्हाला समजून सांगितले की, कोविडचे पेशंट कधीही वाढण्याची शक्यता आहे. जरा कोविड जेव्हा जास्त रंगात हाता आणि तो कधीही वाढण्याची शक्यता होती म्हणून तुम्ही बोललेले आपल्याला त्याची गरज लागेल. ठिक आहे आम्ही त्याच्यावर काही बोललो नाही की प्रोव्हीजन तर करायला पाहिजे कारण एकाएकी जर आपल्या अंगावर आले तर आपण कुठे जाणार, शिंगावर घ्यायला. परंतु साहेब आज कोविड नाही आहे असे मी म्हणत नाही. शहरात पण किती प्रमाणात त्याचे झाले आहे. आणि अशा स्थितीमध्ये तिथे तुम्ही खोके, खुराडे तुम्ही बनवलेले ते तसेच आहेत. ठेकेदाराचे पैसे वाढताहेत हो. तुम्ही तिथे त्या सोयीसुविधा लावल्या. बिल्डींग होणारच आहे ना. हे मी बोलते तो ठेकेदार माझा दुश्मन नाही. परंतु ह्या शहरातला नागरीक माझा जवळचा माणूस आहे. तुम्ही त्याचे जे बील पे करणार ते नागरीकांच्या टॅक्समधून करणार आहात. आणि म्हणून मला ही कळकळ आहे की, तुम्ही ते वाढून ठेवले ते काढा. ज्या दिवशी निघेल त्या दिवसापासून त्याचे बजेट कमी होईल. खर्च कमी होईल. ते तुम्ही अजून का ठेवले आहे? आपल्याकडे किती तरी कोविड सेंटर तुम्ही बंद करायला घेतली आणि एवढा मोठा चिखलामध्ये तो घाणा का घालून ठेवला आहे. ह्या प्रशनाचे पण मला उत्तर मिळाले पाहिजे. कारण ह्या प्रश्नावर मी तुमच्याशी वैयक्तिक दोन वेळा भेटले आणि आज तिसऱ्यांदा तुमच्याशी बोलत आहे. ह्या गोष्टीचे सुध्दा आणि तिसरी महत्वाची गोष्ट म्हणजे तीन प्रश्न आहेत मध्यंतरी व्हॉट्स-ॲप वर, फेसबुकवर आणि बऱ्याच ठिकाणी एक मॅसेज व्हायरल होत होता. आमचे नगरसेवक श्री. मुन्ना सिंग ह्यांनी काही गोष्टींची खरेदीमधली तफावत दाखवली. त्याचा पण उलगडा झाला पाहिजे ना. हा हिशेब लोकांसमोर यायला पाहिजे. कारण हा सगळा पैसा लोकांचा आहे. लोकांनी त्याचा हिशोब आमच्याकडे मागीतला तर आम्हाला देता आला पाहिजे आणि तुमच्याकडे मागीतला तर तुम्हाला पण देता आला पाहिजे. कारण हा जनतेचा पैसा आहे. त्याच्यामुळे मला ह्या सगळ्या प्रश्नांची उत्तरे ऑडीटसहीत मिळायला पाहिजे. थँक्यू.

निलम ढवण :-

एकच विषय आहे. आता प्रभात ताईंनी सफाई कामगारांबद्दल त्यांचे कौतुक करण्यासाठी गुलाबाचे फुल देऊन त्यांचा सन्मान केला पाहिजे किंवा इतर काही. तर त्यात माझा एक ॲडीशनल

मुद्दा असा आहे. हे तर कराच परंतु ज्या सफाई कामगारांनी स्वत:चा जीव धोक्यात घालून आपल्यासाठी जनेतची जी सेवा त्यांनी केलेली आहे त्या काळामध्ये कोविडचा भत्ता त्यांना मिळालेला होता. तो भत्ता अजूनही त्यांच्या अकाऊंटला गेलेला नाही. त्यामुळे तो कोविडचा भत्ता देखील लवकरात लवकर जो मनपाकडे उपलब्ध आहे, परंतु अजूनही तो त्यांना दिला गेलेला नाही. तर भत्ता देखील त्यांना ताबडतोब देण्यात यावा. भत्त्याची पूर्तता त्यांना करण्यात यावी. कारण ते महान कार्य जे त्यांनी केलेले आहे. त्याचा मोबदला म्हणून थोडा का असेना देत होतो. सहाजिकच आहे, गोरगरीब घराण्यातली ती लोक आहेत. तर त्याची पुर्तता करावी. आणखीन लाभ पण त्यांना मिळेल.

मा. उपमहापौर :-

ठिक आहे. ढवण मॅडम.

ध्रुवकिशोर पाटील :-

आयुक्त साहेब, याच्यावरती दोन विषय आहेत. कोविड-19 बाधीत रुग्णांवर उपचाराबाबत व झालेल्या खर्चाबाबत. पहिली गोष्ट म्हणजे उपचारा बाबत आयुक्त साहेब मी तुमचे व तुमच्या टीमचे जे डॉक्टर पडवळ साहेब आहेत, संभाजी वाघमारे साहेब आहेत आणि डॉ. लहाने साहेब आहेत. म्हणजे एकतर जे तुमचे डॉक्टरर्स आहेत. त्यांच्या खाली असणारे तुमचे नर्सेस आहेत जे पॅरामेडीकल स्टाफ आहेत आणि जसे ह्यांनी सांगितले आरोग्य कर्मचारी ह्या सगळ्यांनी मिळून मिरा भाईंदर शहरामधील कोरोना रुग्णांवर खुप चांगल्याप्रकारे त्यांनी उपचार केले आहेत. मी खरोखरच मनापासून त्यांना धन्यवाद देते आणि तुमची जी निवड केली होती मिरा भाईंदर शहराच्या आयुक्त पदी की कोविड मिरा भाईंदर शहरामध्ये वाढतोय आणि त्याला कमी केला पाहिजे आणि तुमची निवड केली. तुम्ही इथे ह्या शहरामध्ये आयुक्त म्हणून आलात आणि तुम्ही जे चांगले डिसीजन घेतले त्याबद्दल तुमचे खुप खुप अभिनंदन आणि धन्यवाद आणि तुमच्या डिसीजनला आम्ही सर्व नगरसेवकांनी महपौरांनी, उपमहापौरांनी, सगळ्या पदाधिकाऱ्यांनी त्याला संमती दिली त्यांचेही मनापासून धन्यवाद करतो. शेवटी गाडील दोन चाके असतात आणि दोन्ही चाके जर बरोबर चालतात तरच ती गाडी बरोबर चालू शकते. म्हणजे तुमच्या बरोबर खांद्याला खांदा लावून काम करणे लोकप्रतिनिधींचेही चांगले मोलाचे सहकार्य होते. आपले सगळे प्रतिनिधी घरामध्ये कोणीही बसणार नव्हते. सगळ्यांनी मास्क घालून हातामध्ये हॅन्डग्लोज घालून सगळे रस्त्यावरती होते आणि सगळ्या अडलेल्या नडलेल्यांना ते मदत करत होते. म्हणून मी सगळ्यांना धन्यवाद करतो. आयुक्त साहेब, प्रभात मॅडम आणि ढवण मॅडमने सांगितले की आपल्या कर्मचाऱ्यांचा सत्कार केला पाहिजे. साहेब ह्या कर्मचाऱ्यांच्या बरोबर आपल्या नर्सेस आणि पॅरामेडीकल स्टाफ आहे. आपले जे डॉक्टर्स आहेत यांचाही सत्कार केला पाहिजे. मी महापौर साहेबांना आणि उपमहापौर साहेबांना विनंती करतो की एखादी महासभा लावून ह्या सगळ्या कर्मचाऱ्यांचे आपण कौतुक केले पाहिजे. त्यांचा सत्कार केला पाहिजे. त्यांना सन्मानपत्र दिले पाहिजे. अशी माझी तुम्हाला विनंती आहे. दुसरी गोष्ट आयुक्त साहेब, ज्या ज्या वेळेला तुम्हाला गरज लागली त्या त्या वेळी स्टॅन्डीगमध्ये म्हणा किंवा महासभेमध्ये आम्ही तुम्हाला खर्चाचे संपूर्ण अधिकार दिले. साहेब तुम्ही नुसते आम्हाला सांगितले आणि आम्ही तुम्हाला अधिकार दिले. ज्याप्रमाणे आम्ही तुम्हाला अधिकार दिले त्याप्रमाणे त्याच्यामध्ये असे म्हंटले होते की, तुम्ही खर्च करताय पण त्याचे अवलोकन व्हायला पाहिजे. त्याची संपूर्ण माहिती स्टॅन्डीगपुढे म्हणा किंवा महासभेपुढे म्हणा आली पाहिजे. पण तशी माहिती आजतागायत आपल्या कर्मचाऱ्यांनी दिलेली नाही. तर माझी विनंती आहे. एवढे सगळे चांगले काम केले आणि छोटेसे काम राहिले आहे. तर ते जर नसते राहिले तर बरे असते. त्यांनी लगेच माहिती दिली पाहिजे. साहेब तुम्ही एकदम इफिशंट आहात, एकदम प्रॉम्ट आहात. तुमच्याकडे आलेली एखादी फाईल तुम्ही 10 मिनिटे टेबलावर ठेवत नाहीत. तुम्ही इमिजिएटली क्लिअर करता. तस याच्यामध्ये आपला जो खर्च झालेला आहे त्या खर्चाचा संपूर्ण आढावा घेवून आपण स्वत: जातीने लक्ष घालून हा आढावा स्टॅन्डीगपुढे किंवा महासभेपुढे सादर करावा, हि नम्र विनंती. धन्यवाद.

मा. उपमहापौर :-

ठिक आहे पाटील साहेब.

रिटा शाह :-

थँक्यू हसमुख भाई सबसे पहले तो मै कहना चाहूंगी की, गटनेता है, सभागृह नेता है, ध्रुवकिशोर पाटीलजी है जो हमेश महासभामे इन लोगोंको बोलने दिया जाता है। हमोर जैसे शुरु से हाथ उपर करते है लेकीन हमे बोलने का मौका नही देते है। मैने आपको फोन किया और आपने मुझे बोलने का मौका दिया इसलिए आपको ढेर सारी धन्यवाद। कोविड का विषय चल रहा है। हसमुखजी उसमे एक बहुत दुख:दाई घटना घटी है। जो की प्रायव्हेट हॉस्पीटल थे ।कोविड फैलाव हूवा था और लोग डरे हूए थे व्हेंटीलेटर की जरूरत पडी सिरियस हो गए तो प्रायव्हेट हॉस्पीटलमें दाखल हूवे । वहा उनको उन मरीजो के पास मं एक फॉर्म पे साईन दि जाती थी और वो फॉर्म ऐसा था की जो बील हॉस्पीटल उनको देगी वो उनको करना है उसकी संमती थी । और ऐसी साईज लि जाती थी ऐसा एक केस मैने मैने डॉ. बच्छाव के पास दिया था वाघमारे साहब को मैने लिख कर भेजा था जिनको १० लाख का बील हूवा थो बच्छाव साहने मुझे यह बोला था की आपने कोई फॉर्म पे साईन किया था इसके लिये शायद नही हो रहा है । जो की में कोशिश् करता हूॅ यह बहूत दूखदाई घटना है क्योकी कोविड जैसे बिमारी हमारे शहर में फैली हूई थी और प्रायव्हेट हॉस्पीटलमे इस तरह को गलत बात किया कि ऐसे फॉर्म के उपर मरीजो ने सिधी घरवालो की साईन लि गई और पैसा भेजने का जादा पैसा लेने का एक षडयंत्र रचा गया और मुझे इसके लिए सई में ऐसा लगता है की शायद हमारे साथ प्रशासनके लोग भी मिले हूये थे क्या उनके साथ में में जरूर धन्यवाद करूंगी उन लोगो का लिन डॉक्टरोने इस कोविड पेंशट के लिये काम किया उन नर्स का जिन्होने कोविड पेंर्श के लिये काम किया उन कर्मचारी जो आरोग्य के थे, फायर ब्रिगेड के थे उन लोगो का में धन्यवाद जरूर करना चाहूॅगी की उन्होने सही में अपनी तबीयत का विचार ना करते डूये उन्होने अपनी फॅमिली का विचार ना करते हूऐ उन्होने काम किया दुसरी बात जो यह कोविड के हिसाब से हमारे मिरा भाईदर क्षेत्र के चाहे वो परमनंट अधिकारी हो चाहे वो कंत्राट बेसिस पे हो जो लोग की मृत्यू हूई उनके लिये हमारी महासभाने विचार करना चाहिए । उन फॅमिली को कोईना कोई राशी उनको देनी चाहिए उनकी फॅमिली वो और जो परमनंट कर्मचारी थे उनसे घरसे किसी ना किसी को हमारी सेवा शामिल कर लेना चाहिए वैसा कोई ठराव हमे करना चाहिए । और दुसरी बात यह कोविड के टाईम में बहूत सारे कंत्राट बेसिस के कर्मचारी उन्होने भी काम किया है तो कुछ हमारे परमनंट अधिकारी है कर्मचारी है तो कुछ पगार में फेरफार था तो बढावो जो कॉन्ट्रॅयाक्ट बेसीस पे जो काम कर रहे है ऐसे कर्मचारीयोकी जो पगारके हिसाबसे वाढीव मिलनी चाहिए उनको ऐसा मेरा सुझाव है क्योकी मैने जो आपको बोला हसमुखजी इसकी सखोल इन्कायरी होनी चाहिए की प्रायव्हेट हॉस्पीटलाने ऐसे जो महामारी थी जो इतनी बडी बिमारी थी उसका भी गैरलाभ उठाने ऐसे फॉर्म के उपर साईन लिया है । तो यह बहोत गलत था और गलत घटना हूई है जिसका में विरोध जाहिर करती हूॅ ।

वंदना भावसार:-

मॅडम बोलायला दिल्याबद्दल धन्यवाद मला एक सुचना करायची होती जसे टेंभा हॉस्पीटल आता कोविड रूग्णालयासाठी आपण केला होता तो जसा आपल्याकडे बरेच असे गोरगरिब रूग्णालय आहेत त्यांना इतर पण आजार होतात तर त्या आजारासाठी ते आपन करावे आणि बाकी ते आपले अप्पासाहेब धर्माधिकारी आहे किंवा प्रमोद महाजन त्याठिकाणी कोविडचे रुग्णांचा इलाज करू शकतो कारण आता कोविडचे रूग्ण पण कमी झालेले आहेत तर टेंभ हे सामान्या नागरिकासाठी खुले करण्यात यावे अशी माझी सुचना होती आणि मागणी पण आहे.

मा. महापौर:-

वंदना भावसार मॅडमने केलेली सुचना मला वाटते योग्य आहे. आता कोविडचे व्हॅक्सिनपण आलेले आहे आणि ब-यापैकी कोविड आपल्या आटोक्यात आलले आहे. लोकप्रतिनिधीनी इथे ब-याचशा सुचना केल्या प्रशासनाचे अभिनंदन सुध्दा कले तर मला असे वाटते की आता टेंभा हॉस्पीटल इतर रूग्णासाठी पुर्ववत आपण चालू करायला काही हरकत नाही. त्याबाबत आपण विचार करावा त्याची परिस्थिती काय आहे याचा आढावा घ्यावा. आणि त्या पध्दतीने इतर रुग्णसाठी आपण टेंभा हॉस्पीटल पुर्ववत चालू करावे असे मला वाटते.

वर्षा भानुशाली:-

मॅडम मी तुम्हाला एक पत्र दिलेले होते की कोरोनाच्या आजारपणामध्ये जे सफाई कामगारांचा मृत्यू झालेलो आहे त्याच्या बदल्यात घरच्या कुठल्या अन्य सदस्यांला त्या कामावरती ठेवण्यात यावे आणि मॅडम तुम्ही होणार  पण दिला होता. भाईदर इस्टमध्ये जे एस आय आहेत त्या प्रकरणात मी तुम्हाला त्याचे नाव दिले होते. त्यामध्ये मला असे समजले की ते कोरोनामध्येच त्याची डेथ झाली. परंतू त्याची डेथ सर्टफिकेटमध्ये कोरोना असे मेन्शन केलेले नव्हते. त्याला आपण काही सुखसुविधा देवू शकलेलो नाही. ते तुम्ही जरा तपासून घ्या. जे जे कर्मचारी पूर्ण मिरा भाईदरच्या ह्या कूठल्याही ठिकाणी जे आहेत ते असे कोरोना मध्ये जी मृत्यू झालेली असेल तर त्याच्या जागेवरती आपण त्याच्या फॅमिली मेंबरला घ्यावे जे नियमामध्ये असेल ते आपण करायला पाहिजे. आणि टेंभा हॉस्पीटलबाबत माझा सुझाव होता की टेंभा हॉस्पीटज ते भाईदर वेस्ट आणि उत्तन पर्यत अन्य आजारी पणा हे त्याचे मेन सेंटर होते ते पण तुम्ही लवकरात जवकर कोरोना मुक्त करून नॉर्मल सर्व जरा अशी माझी विनंती आहे.

मा. महापौर:-

ठीक आहे.

प्रशांत दळवी:-

मा. महापौर मॅडम पूढचा विषय घ्या ह्या विषयावर बरीच चर्चा झाली.

मा. महापौर:-

मा. आयुक्त साहेब निवेदन करतील.

मा. आयुक्त :-

सन्मा. महापौर सर्वप्रथम आपण सगळयंनी मिळून प्रशासनाला जी शाबासकी दिली त्यागद्दल मी सगळयातर्फे धन्यवाद माणतो. जसे पाटील साहेबांनी सांगितले की हे आपण आपले सगळी सन्मा पदाधिकारी प्रतिनिधी. जनप्रतिनिधी आणि प्रशासन ह्यांच्या सोबत असल्याशिवाय हे काय काम शक्य नाही. त्याच्यामुळे आपण सगळयांनी आम्हाला योग्य वेळेला मदत केली सहकार्य केले आम्हाला धिर दिला त्यासाठी मी तुमचे आभार माणतो. बरेच इश्यू ह्याच्याम आता सव सन्मा. पदाधिका-यांनी आणि नगरसेवकांनी नमुद केलेले आहेत त्याच्यामध्ये इनामदार साहेबांनी जो विषय काढला की ऑडिट ह्या ऑडिटच्या कामासाठी आम्ही १५ दिवसापासून स्टार्ट केलेले आहे. कारण हा विषय परत येणारच. त्या क्रिटीकल कंडीशनमध्ये सर्व प्रशासनाने काम केले त्याच्याबाबत ते पर्चेस ऑडिट अणि प्रोपाईल ऑडिट आणि प्रोपाईल ऑडिट आम्ही त्याचे काम हातात घेतलेले आहे. नविन लोकल फंडचे जे लोक घेतले आहेत त्याच्यानुसार आम्ही त्याच्यावर काम करणार आहोत. प्रायव्हेट हॉस्पीटलला मला वाटते की आपली पहिली महानगरपालिका असेल की ज्यांनी पहिल्यांदा कुठला प्रायव्हेट  हॉस्पीटलला ॲक्सेस बिलींगसाठी कारवाई केली होती. आपल्या ॲटलिस एम एम आर रिझनमध्ये आणि  सोबतचा खूप मोठया प्रमाणावर रूग्णांचा निधी वापरत करण्यासाठी आपण काम कले. काही प्रमाणात दोन तीन हॉस्पीटलवर कारवाई शिल्लक आहे त्याच्यावरती पण आम्ही कारवाई लवकरात लवकर पुर्ण करत सर्व प्रभाग काही नगरसेवकांनी इश्यू केला होता की आपले जे सफाई कर्मचारी आहेत त्यांना पण कोविड लस देण्यात यावी तर आता जी आपली उदया पासून लसची कारवाई चालू होणार आहे त्यात सर्वप्रथम

आपण डॉक्टर, नर्सेस आणि हेल्थ केयर वर्करला देणार आहोत आणि दूस-या टप्प्यामध्ये आपले फ्रंटलाईन वर्करमध्ये आपले सर्व सफाई कर्मचारी आणि आपला सगळया स्टाफ त्याच्यामध्ये त्यांना आपण लसिकरण करणार आहोत. त्या सोबतच सर्व सन्मा. नगरसेवकांनी चांगली सुचना आम्हाला दिलेली आहे की आपण ज्या सगळया कर्मचा-यांनी काम केले आहे. त्याचे एक सन्मान जरूर आपण केला पाहिजेत आपण छोटया छोटया टप्प्यानं मॅडम आपण त्यांचा सन्मान करावा असे आपण ठरवूया आपण सगळयांनी मिळून आणि सोबतच जे कर्मचारी ह्या कोरोनामध्ये मृत्यूमूखी पडलेले आहेत त्या सगळयाबद्दल आम्ही वेगळया ठिकाणी प्रस्ताव पाठवलेला आहे त्याचा एक आढावा घेऊन ॲक्झेक्टली टाईम बॉड पध्दतीने त्याच्यावर आपण ज्यांचे काही कॉम्पनसेशन आहेत ते द्यायची आपण कारवाई करू. सोबतच आपण निर्देश दिल्याप्रमाणे कंम्पलसेशन देण्यासाठी महानगरपालिकेनी कंम्पलसेशन देण्यासाठी एक रितसर गोषवारा आम्ही मॅडम तुमच्या महासभेला सादर करतो. त्याच्यावर सन्मा. महासभेने निर्णय घेवून आम्हाला निर्देश देण्यात यावे. जंम्बो फॅसिलिटी बद्दल वारंवार सन्मा. नगरसेवक यांची हरकती आहेत परंतू त्या कंडीशन मध्ये आम्ही जी कारवाई केली नसल्यामुहे आणि आजच्या घडीला पण त्या जंम्बो सेंटर हे आपले जंम्बो व्हॅक्सिनेशन सेंटर म्हणून आपण त्याचा वापर करणार आहोत. आणि मला वाटते की फेब्रुवारीच्या पहिल्या किंवा दुस-या हप्त्यामध्ये जे कॉट्रक्ट पिरेड होता तो संपणार आहे आणि तो मुळ करारनामा तसा असल्यामुळे आम्हाला मध्येच बंद करणे शक्य नव्हते. आणि काही लिगल प्रोसेस त्यात होवू शकत होती म्हणून आमही ते चालू ठेवले आहे पण आता व्हॅक्सिनेशनचा ड्राईव्ह पाहिला आणि दुसरा टप्पा झाल्यानंतर आम्ही ते बंद करण्यासाठी प्रोसेस चालू करणार आहोत. आणि त्या सोबतच सर्व सन्मा. नगरसेवकांनी निर्देश दिले की टेंभा रूग्णालय सर्व सामान्यासाठी चालू करायचे. सध्या पण आपण टेंभामध्ये १० आय सी यू बेड आहेत ते सर्व सामान्यासाठी आणि ४० बेड हे सर्वसामान्य म्हणजे नॉन कोविड ॲकिटव्हिटीसाठी आपण चालू केलेले आहेत असे आमच्या प्रशासनातर्फे निवेदन आहे. आपण दिलेल्या शाबासकी बद्दल धन्यवाद.

(सदर प्रकरणाचे अवलोकन करण्यात आले.)

मा. महापौर :-

सचिव साहेब पुढच्या विषयाला सुरुवात करा.

नगरसचिव :-

पुरक घोषणा आहेत.

जुबेर इनामदार :-

विषय कुठे संपले “ज” चे 4 प्रस्ताव आहेत.

प्रशांत दळवी :-

महापौर मॅडम, आज महासभेपुढे पुरक घोषणेचे 4 प्रकरण आहेत.

नगरसचिव :-

आजच्या महासभेकरिता पुरक घोषणा आलेल्या आहेत. या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील अनुसूची “ड” प्रकरण २ नियम १ (ज) अन्वये दिनांक १५/०१/२०२१ रोजी आयोजित केलेल्या मा. महासभेच्या विषयपत्रिकेमध्ये पुढील विषय समाविष्ट करणेची पुरक घोषणा करण्यांत येत आहे. प्रकरण क्र. 58, सन्मा. सदस्य श्री. प्रशांत दळवी यांचा दिनांक ०८/०१/२०२१ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. मा. सर्वोच्च न्यायालयातील याचिका क्र. २१३/२०१३ च्या निर्णयानुसार मानधनावर कार्यरत असणाऱ्या संगणक चालक तथा लिपीक व लघुलेखक यांना समान काम समान वेतन कायद्याअंतर्गत झालेल्या ठरावाची अंमलबजावणी करणेबाबत.

प्रशांत दळवी :-

महापौर मॅडम, जसे मी म्हणत होतो की, आजच्या या मा. महासभेपूढे 4 पुरक घोषणा “ज” अन्वये प्रस्ताव आलेले आहेत. महापौर मॅडम, आपणांस ठाऊक असेल की, गेल्या वेळेला आपण हे “ज”

चे प्रस्ताव ज्यावेळेला डिम्पल मेहता मॅडम आणि जैन मॅडम महापौर होत्या त्या वेळेला आपण हे “ज” चे प्रस्ताव महासभेपूढे घेत नव्हतो. जेणेकरुन आणि जर आले तर ते फेटाळून लावत होतो. अशाप्रकारचे चालले होते. परंतु नंतर आपण एक असे ठरवले की, “ज” चे प्रस्ताव न घेता विषय पत्रिकेवरती एवढे प्रश्न असतात आणि मग “ज” चे प्रस्ताव येतात त्यामुळे फार उशीर पण होतो आणि मग ते रितसर घेतले जात नाहीत. म्हणून महापौर मॅडम माझी आपणांस विनंती आहे की आता ह्या “ज” च्या प्रश्नामधून माझ्यापासूनच सुरुवात करायची आहे मी असे म्हणेन महापौर मॅडम की प्रकरण क्र. 58,59,60 आणि 61 हे महापौर मॅडम आपणांस विनंती आहे की, आपण प्रशासनाला सांगावे की, हे सर्व प्रस्ताव आपण रितसर प्रशासनाने महासभेपूढे आणावेत अशी मी आपणास विनंती करतो. महापौर मॅडम आणि तसे आदेश प्रशासनाला द्यावेत. गोषवाऱ्यासहीत रितसर सदरचे प्रकरण आपण पुढील महासभेत आणावेत.

जुबेर इनामदार :-

“ज” चे प्रस्ताव महापौर मॅडम हा अधिकार सभागृहाला आहेत.

प्रशांत दळवी :-

मी नाही म्हणत नाही परंतु मी मगाशीच म्हणालो की अगोदरही प्रथा ही चालू होती. मध्यंतरी आपण बंद केली. कारण आता तुम्हाला मी सांगतो जुबेर भाई की आपण 95 नगरसेवक आहात इथे विषयपत्रिकेवरती 10 विषय असले आणि त्याच्या जोडीला जर 10-15 जणांनी जर “ज” चे प्रस्ताव टाकले तर शेवटी सभा चालवायची की “ज” चे प्रस्ताव घ्यायचे म्हणजे सभा किती वाजेपर्यंत चालवायची याचे काही निकष हे आहेत ना आणि किती जणांनी टाकायचे. “ज” चे प्रस्ताव टाकायचे तर किती जणांनी टाकायचे. एकाने टाकायचे, दोघांनी टाकायचे आज 4 आले. उद्या 10 येतील ही परंपरा चालू राहील महापौर मॅडम.

निलम ढवण :-

सचिव साहेबांनी 5 पर्यंत ग्राह्य धरले होते. सत्ताधाऱ्यांनी “ज” चा प्रस्ताव टाकुच नये. विरोधकांसाठी ते ठेवावे आणि “ज” प्रस्ताव घेण्याचे अगोदरपासून ठरलेले होते.

प्रशांत दळवी :-

महापौर मॅडम, माझी विनंती असेल असे कोणाचे प्रस्ताव असतील तर त्यांनी प्रशासनाला रितसर द्यावेत आणि प्रशासनाने ते रितसर गोषवाऱ्यासहीत घ्यावेत ना विषयपत्रिकेवरती. महापौर मॅडम, आपण तसे रुलींग प्रशासनाला द्यावे.

जुबेर इनामदार :-

श्री. प्रशांत दळवी साहेब तुमचे निवेदन संपले असेल तर मी ह्याला थोडीशी दिशा देऊ इच्छितो “ज” चे प्रस्ताव हा महानगरपालिका अधिनियम सभा कामकाजामधला एक भाग आहे आणि हा अधिकार आहे सभागृहाचा. सभागृहामध्ये असणाऱ्या प्रत्येक सदस्याला तरीही उपविधीमध्ये मला सचिव साहेब मला करेक्ट करा चुकत असेल तर आपण उपविधीमध्ये 5 पेक्षा जास्त घ्यायचे नाहीत. एका वेळी असा आपण त्याचा एक निर्णय घेतलेला आहे. त्याचा अर्थ एका सभागृहामध्ये एका सभेमध्ये 5 कमी किमान जास्त नाही फक्त 5 आपल्याया जास्तीत जास्त 5 “ज” चे प्रस्ताव घेता येतील आणि हा पुरक घोषणा कार्यपध्दतीनुसार काढण्यात आलेली आहे. 4 “ज” चे प्रस्ताव आहेत त्यावर चर्चा करणे किंवा चर्चेची संधी देणे हे महापौरांचे कर्तव्य आहे आणि तो सभागृहाचा अधिकार आहे. म्हणून ह्याला व्यवस्थित रितसर कामकाजाच्या पध्दतीने चालविण्यात यावे सभागृह आहे त्याला उशीर होणार कामकाज चालणार आम्ही 7-7.30 वाजेपर्यंत सभागृह चालवले आहेत. आणि विषयपत्रिकेवरील विषय शिल्लक राहिले तर आम्ही दुसऱ्या दिवशी चालवले आणि असे कधीही कुठेही झाले नाही की डिम्पल मेहता जेव्हा महापौर होत्या किंवा गिता जैनजी जेव्हा महापौर हात्या तर “ज” चे प्रस्ताव नव्हते. आम्ही तेव्हा ही भरपूर “ज” चे प्रस्ताव टाकले त्यावर चर्चा झालेली आहे. त्यावर

ठराव होतो जसा ठराव होतो जशी पध्दत आहे कार्यपध्दत आहे विषय निकाली लावायचे तशीच पध्दत ह्या “ज” च्या प्रस्ताला आहे. फक्त प्रशासन याच्यामध्ये भागीदार नसतो. कारण तो विषय प्रशासकीय नसतो. त्या सभागृहामध्ये त्या सदस्याच्या अधिकारात आहे की त्याला कुठलाही विषय प्रशासनाचा समक्ष आणायला आहे. लक्ष वेधायचे असेल त्या विषयावर किंवा त्या ठरावाच्या माध्यमातून त्यांना निकाली लावायचा असेल तर तो “ज” चा प्रस्तावाचा उपयोग करु शकतो. जसा प्रशासन “क” चा प्रस्ताव आयत्या वेळेचा विषय म्हणून तो “क” चा प्रस्ताव दिला जातो. म्हणून माझी महापौर मॅडम आपल्याला विनंती आहे कार्यपध्दतीनुसार कामकाज सुरु ठेवावे धन्यवाद.

प्रशांत दळवी :-

महापौर मॅडम, परत माझी एकदा तुम्हाला विनंती राहील आग्रहाची विनंती राहील की मी जसे मगाशी म्हणालो तसे की आपण हे सन्मा. सदस्यांनी जे काही “ज” चे प्रस्ताव दिलेले आहेत ते आपण पुढील मा. महासभेमध्ये प्रशासनाला सांगा की रितसर गोषवारा देऊन आपण पुढील महासभेत सादर करा ही माझी विनंती आहे महापौर मॅडम.

निलम ढवण :-

महापौर मॅडम, प्रत्येक वेळी सर्वच सदस्यांची जे काही विषय असतील ते प्रशासनाने जरी दिले तर काही वेळा महापौर मॅडम तुमच्या अखत्यारीत ते घेतले जातात. महासभेचे विषय मग तेव्हा ते डावलले जातात. मग त्याला पर्याय काय आणि एखाद्या सन्मा. नगरसेवकाचा विषय असेल तो प्रत्येक वेळी गोषवाऱ्यामध्ये किंवा याच्यामध्ये येईल असे नाही. त्यामुळे जी पूर्वापार अधिनियमात आहे तरतुद आहे तर ती कृपया आपण बदलू नये. प्रशांतजी तुम्ही तर सत्तेत आहोत तरी तुम्ही आता “ज” चा प्रस्ताव दिला आहे.

प्रशांत दळवी :-

हो तर माझ्यापासून सुरुवात करतो ना.

निलम ढवण :-

तुमच्यासाठी नियम काही बदलणार ना.

प्रशांत दळवी :-

मी प्रशासनाला रिक्वेस्ट केली प्रशासनाने नाही घेतले तर मी “ज” अन्वये आणला प्रस्ताव.

निलम ढवण :-

पण माझे म्हणणे असे आहे तो अधिकार प्रशासनाचा नाही आहे. महासभेत विषय घेणे आहे हा महापौर मॅडमचा अधिकार आहे. त्यामुळे ते शक्य होईल असे नाही कारण सगळे किती तरी विषय आपण..................

जुबेर इनामदार :-

विषय असा आहे की प्रशांत दळवी साहेब ज्या पध्दतीने आता तुमच्याकडे निवेदन करत आहेत की विषय प्रशासनाने पुढच्या वेळी पुढच्या सभेमध्ये घेण्यात यावेत. हा प्रशासनाचा विषय नाही. प्रशासन याला गोषवारा देणार नाही तर का विषय घेता येणार नाही? “ज” चा प्रस्तावामध्ये आर्थिक बाबी घेऊ शकत नाही. धोरणात्मक निर्णय होऊ शकत नाही. प्रशांत दळवी साहेब तुम्ही वेळ घालवू नका. पुढचे सगळे विषय भ्रष्ट्राचारावर अंकुश लावण्याचे आहेत आणि याच्यावर चर्चा होणे गरजेचे आहे. प्रशासनाला लक्ष वेधण्याचे ही एक पध्दत आहे आणि त्याला ठरावाच्या माध्यमातून आपण त्याचा प्रस्ताव फेटाळू शकतो. हा अधिकार पूर्ण सभागृहाचा असल्यामुळे माझी महापौर मॅडम तुम्हाला विनंती हा सभागृहाचा वेळ चर्चेमध्ये घालवू नका. महापौर मॅडम आपण नियमबाह्य रुलींग देऊ शकत नाही. “ज” चा प्रस्ताव आहे. तो तुम्हाला निकाली लावावाच लागेल.

मा. उपमहापौर :-

जुबेर भाई हर कोई निवेदन करे और भी लोकप्रतिनिधी है हर कोई निवेदन करे| कृपया करके कोई भी महापौर मॅडम को आदेश ना दे|

प्रशांत दळवी :-

महापौर मॅडम, आपण आपली रुलींग द्या.

जुबेर इनामदार :-

सचिवांनी सांगावे सचिवांचे निवेदन घ्या. सचिवांनी आपली भुमिका स्पष्ट करा ह्या प्रस्तावासाठी.

निलम ढवण :-

महापौर मॅडम प्रशांतजी ना जर चर्चा करायची नसेल त्या विषयाची आणि प्रशासनामार्फत घ्यायचे असेल...........

जुबेर इनामदार :-

ते त्यांचा विषय मागे घेऊ शकतात.

निलम ढवण :-

इतर सदस्यांचे जे विषय आहेत त्यांना चर्चा करु द्या. मॅडम गिता जैन मॅडमला अनम्युट करा त्यावर त्यांना बोलायचे आहे.

जुबेर इनामदार :-

महापौर मॅडम तसे काय तुम्हाला दुमत असेल तर तुम्ही सचिवांचा अभिप्राय घ्या. तुम्ही अनुभवी आहात तुम्ही घ्या सभा कामकाजामध्ये अनुभवी आहात.........

मा. उपमहापौर :-

जुबेर भाई महापौर मॅडम को बोलने दिजीए|

मा. महापौर :-

आपण सगळे हे विषय जे आणले आहेत ते “ज” चा प्रस्तावाखाली सगळेच विषय चांगले आहेत आणि मला असे वाटते या संदर्भामध्ये सविस्तर आणि व्यवस्थित चर्चा झाली पाहिजे. आता बराच वेळ असा ही झालेला आहे आपण पुढच्या महासभेमध्ये सदरचे विषय प्रशासनाने सविस्तर महासभेमध्ये घेण्यात यावे.

जुबेर इनामदार :-

महापौर मॅडम, प्रशासनावर भ्रष्ट्राचाराचे आरोप आहेत ते कसे घेणार. ते त्यांचा गोषवारा देतील. आमच्या यांनी भ्रष्ट्राचार केलेला आहे. उत्तर आयुक्तांना द्यावे लागेल.

निलम ढवण :-

जुबेरजी प्रशासन नाही देणार महापौर मॅडम देतील महापौर मॅडम रुलिंग देत आहेत महापौर मॅडम देतील ना.

मा. महापौर :-

प्रशासनाच्या माध्यमातून हे विषय विषयपत्रिकेवरती आणावेत.

जुबेर इनामदार :-

मॅडम असे विषय येऊ शकत नाही तुम्हाला निकाली लावावे लागतील.

गिता जैन :-

“ज” चे प्रस्ताव तुम्हाला घ्यावे लागतील महापौर मॅडम.

मा. महापौर :-

आजची ही महासभा...............

जुबेर इनामदार :-

महापौर मॅडम, तुम्ही सभा सपंवू शकत नाही. सचिव महोदय सभा कामकाज....

(सभागृहात गोंधळ)

जुबेर इनामदार :-

सचिव महोदय तुम्हाला हा विषय निकाली लावावा लागणार आहे.

प्रशांत दळवी :-

महापौर मॅडम राष्ट्रगीत चालू करा. सचिव साहेब राष्ट्रगीत सुरु करा.

जुबेर इनामदार :-

प्रशासनाच्या माध्यमातून करावे लागतील. हे चुकीचे आहे ही लोकतंत्र पध्दत नाही झाली. हे होऊ शकत नाही. “ज” चा प्रस्ताव तुम्हाला निकाली लावावा लागेल. हा होऊच शकत नाही अशाप्रकारे सभा कामकाज चालू शकत नाही. महापौर मॅडम, तुम्ही लोकतंत्राचा खुन करत आहेत. तुम्ही महापौर मॅडम लोकतंत्राचा खुन करत आहेत. प्रशासनाने याचे उत्तर द्यावे. प्रशासनाला मदत करणारी सत्ताधारी पार्टी आम्ही यांचा निषेध करतो.

निलम ढवण :-

भारतीय जनता पार्टीचा निषेध असो.

जुबेर इनामदार :-

महापौर मॅडम, लोकतंत्र सोडून कामकाज चालू आहे. सभागृहामध्ये हे तुम्हाला ही पाप आहे. महापौरांच्या पदाला गरीमाला हे शोभत नाही.

मा. महापौर :-

आजची सभा संपली असे मी जाहिर करते.

सही/-

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

(वासुदेव शिरवळकर)

नगरसचिव

मिरा भाईंदर महानगरपालिका